डॉ. बं. न. जाजू

गोष्टी लहान, पण-----

(काही सांगून जाण्यासारख्या)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

गोष्टी लहान, पण---

(काही सांगून जाण्यासारख्या)

डॉ. बं. न. जाजू

a

गोष्टी लहान, पण---

लेखक : डॉ. बं. न. जाजू

पत्ता : पत्ता: डॉ. बं. न. जाजू
ए2/402, शिवरंजन टावर्स
सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे 411008
सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. 8668553115
ई मेल bnjajooin@yahoo. co. in

मुखपृष्ठ- रचित जाजू

रचित जाजू हा लेखकाचा नातू. लेखकाच्या ह्या आधीच्या दोन पुस्तकांची मुखपृष्ठ रचित ने तयार केली होती. आता नुकताच रचितने प्रथम वर्ष अभियांत्रिकी ला प्रवेश घेतला आहे. अभ्यासात चांगला आहे. आणि असे इतर छंद ही जोपासून आहे. वेगवेगळी चित्रं काढून, तर कधी संगणकामधली वेगवेगळी चित्रं मिक्स करून, आकर्षक, आणि थीम ला साजेल असं मुखपृष्ठ डिझाईन करणं हा त्याचा आवडता छंद आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १६ जुलै २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. बं. न. जाजू- 8668553115)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. बं. न. जाजू

जन्म २७ सप्टेंबर १९४३.

हे पुस्तक लेखकाने वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षी लिहिले आहे. त्यासाठी त्यांच्या स्मरणशक्ती व प्रतिभेला सलाम.

जन्म २७ सप्टेंबर १९४३. बुलढाणा जिल्ह्यातील एका शेती आणि व्यावसायिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात अन् एका लहानशा खेड्यात. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागात झालं. पुढे शासकीय अभियांत्रिकि महाविद्यालय, औरंगाबाद येथून,1966 मध्ये, बी. ई. (मेकॅनिकल) आणि नंतर आय. आय. टी, मुंबई येथून एम.टेक. आणि पीएच. डी. पदव्या प्राप्त केल्या. 1966 ते २००१ असे पस्तीस वर्ष, महाराष्ट्र सरकारच्या तांत्रिक शिक्षण विभागात, शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती, पुणे, औरंगाबाद, जळगाव येथे प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्राचार्य अशा अनेक पदांवर काम केलं. त्यानंतर, जी. एच. रायसोनी इंजीनियरिंग कॉलेज, नागपूर येथे पाच वर्ष प्राचार्य आणि पुढे ह.व्या.प्र.मंडळ, अमरावती ह्यांच्या इंजीनियरिंग कॉलेज मध्ये, पाच वर्ष प्राचार्य म्हणून काम केलं. एक ख्याती प्राप्त, विद्यार्थी प्रिय आणि आदरणीय प्राध्यापक व प्राचार्य.

महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच इंडियन अचिव्हर्स फाऊंडेशन इंडिया चा शिक्षाभारती पुरस्कार प्राप्त. सी.वी.रमन अवॉर्ड फॉर एक्सलन्स इन इंजीनीरिंग अँड टेक्नॉलॉजी, इनस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया अमरावती चॅप्टर चा ‘ जीवन गौरव ‘ पुरस्कार,

a
तसेच इनस्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया कलकत्ता चा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड ही मिळाला. महेश सेवा समिती अमरावती ह्यांचा प्रतिभा गौरव पुरस्कार, वरिष्ठ नागरिक समितीचा समाज गौरव पुरस्कार, मिळाला. आण्णाराव टाकळगव्हाणकर प्रतिष्ठान हिंगोली, ह्यांच्या तर्फे सत्कार व कृतज्ञता अवॉर्ड प्राप्त.

राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीयस्तरावर ६५ टेक्निकल शोध प्रबंध प्रकाशित. युरोप, अमेरिका ,ऑस्ट्रेलिया व पोर्तुगल मध्ये, शोध प्रबंध वाचन केलं तसेच काही सेशन ही चेअर केले. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजींनियर्स इंडिया चे फेलो, तसेच Combustion इंस्टीट्यूट ऑफ इंडिया आणि ISTE इंडिया चे आजीवन सदस्य आहेत'.

अमरावती, नागपूर, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मेंबर ऑफ सिनेट, मेंबर ऑफ ॲकॅडेमिक कौन्सिल, डीन ऑफ फॅकल्टी, मेंबर ऑफ बी.यू.टी.आर., मेंबर ऑफ स्पेशल Examination कमिटी म्हणून काम केले. जीवनातील सर्व क्षेत्राशी जवळीक. साहित्य, नाट्य, गित ह्यात विशेष. एक ख्याती प्राप्त वक्ता. आता पर्यंत जवळ जवळ 200 इन्व्हायटेड टेक्निकल Talks दिले. मराठी वर्तमानपत्रात विविध विषयांवर 75 लेख प्रकाशित. एक कविता संग्रह व अकरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी दहा पुस्तकं ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केली आहेत.

ह्या व्यतिरिक्त 2009 मध्ये, त्यांचे, "From entry to Exit—A Treatise on classroom Experiences " हे शिक्षकांना अतिशय उपयुक्त असं पुस्तक इंग्लीश मध्ये आणि " विद्रोह " हा कविता संग्रह हिन्दी मध्ये प्रकाशित झाले आहेत.



Dr. बं न. जाजू यांची
ईसाहित्यवर प्रकाशित पुस्तके













अर्पणपत्रिका

माझे सर्व छंद जोपासून, माझ्या जीवनाला आकार व आधार देऊन,

आयुष्यभर मला यथार्थ साथ देणारी

माझी स्वर्गीय प्रिय पत्नी

प्रेम(प्रेमलता)

हिला

आणि मला नेहमी प्रोत्साहन देणाऱ्या, माझ्या सर्व मित्रांना


डॉ.बं.न.जाजू
गोष्टी लहान,
पण-----
(काही सांगून जाण्यासारख्या)

अनुक्रम :

1 मातम
2 ममता
3 शेवटचं पत्र
4 उधार मिळालेला वेळ
5 देव सर्वांचाच
6 आनंद देण्यातला
7 पश्चाताप
8 मावळतीचा सूर्य
9 बनवा बनवी
10बिन पुस्तकाचं वाचनालय
11 संताबाई
12 आरसा
13 रिकामी खुर्ची
14 हरवलेला संवाद
15 न दिसणारा चांगुलपणा
16 प्लॅटफॉर्म क्रमांक चार वरचा बेंच
17 असं ही होऊ शकतं कधी
18 कोपऱ्यावरचा म्हातारा
19 एक सीट रिकामीच
20 मृत्यू : स्थळ आणि काळ
21 सानप गुरुजी
22 देवाचं गणित
23 अखेरची इच्छा
24 रिकामी जागा
25 पाहता पाहता
26 भुकेची जाणीव
27 शेवटचं खोटं
28 त्या मातीचा सुगंध
29 शल्य
30 न पुसता येणाऱ्या आठवणी
31 भाड्याची खोली
32 फ्रेशर्स नाइट
33 सुपरव्हिजन
34 निर्णय
35 गुपित

गोष्टी लहान, पण-----

मनोगत--

प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक लहान लहान गोष्टी घडतात. काही वेळा त्या प्रत्यक्ष आपल्या आयुष्यात घडतात. काही वेळा त्या आपल्या नातेवाईकांच्या, मित्रांच्या किंवा परिचित-अपरिचितांच्या जीवनात घडलेल्या आपण ऐकतो. काही वेळा त्या कुठे तरी आपल्या ऐकण्या, वाचण्यात किंवा पाहण्यात येतात. कधी कोणत्या तरी वक्त्याच्या भाषणात, प्रवचनकाराच्या प्रवचनात आपण त्या ऐकतो. ह्या गोष्टी किंवा घटना मुळात फार छोट्या छोट्या असतात. पण आपणा सर्वांना ह्याचा अनुभव आहे की त्या छोट्या गोष्टी ही आपल्या मनावर कायम स्वरूपी घर करून जातात, परिणाम सोडून जातात. कधी त्या आपलं मन हेलावणाऱ्या असतात, कधी अंतर्मुख करून जाणाऱ्या असतात, तर कधी त्या आपल्याला क्षणात हसवून जातात. काही काही तर आपल्याला बरंच काही सांगून जातात. शिकवून जातात. अशा लहान लहान गोष्टी, छोटे छोटे प्रसंग मी ही अनुभवले आहेत. मी काही वेळा ते माझ्या मित्रांशी शेअर ही करतो. कधी मुला, नातवंडानाही मी त्या सांगतो.

हे सर्व लिहण्याचा मी आज प्रयत्न करतो आहे. वर लिहल्याल्याप्रमाणे, त्यातल्या काही मी अनुभवल्या आहेत, ऐकल्या-वाचल्या आहेत, तर काही काल्पनिक ही आहेत. त्यांना लघु कथा ही म्हणता येईल. त्या विविध विषयांवर व विविध प्रकारच्या आहेत.

a
वाचकांना त्या मनोरंजक वाटतील असं मला वाटतं. वाचून झाल्यावर आपली प्रतिक्रिया मला कळवली तर मला आनंद होईल.

'ई साहित्य प्रतिष्ठानाचा सर्व परिवार आणि विशेषत: श्री सुनीळ सामंत ह्यांनी आमच्यासारख्या नवोदित लेखकांसाठी आणि वाचकांसाठी हा फार मोठा व अतिशय स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. गेली अनेक वर्ष त्यांनी शेकडो लेखकांची हजारो पुस्तकं वाचकांपर्यंत पोहचवली आहेत. आणि वाचकांचा त्यांना मोठा प्रतिसाद ही मिळतो आहे. मराठी साहित्याची त्यांनी ही, अपरिमित सेवा, नि:स्वार्थपणे केली आहे व ते करीत आहेत. त्यांनी या अगोदर माझी नऊ पुस्तकं प्रकाशित केली आहेत. मला दरवेळी अनेक वाचकांच्या खूप चांगल्या प्रतिक्रिया येतात. आमचे वाचक आमचा हुरूप वाढवतात. म्हणूनच ह्या 83 व्या वर्षी सुध्दा मी लिहतोच आहे. मी, ई साहित्य प्रतिष्ठांनाच्या सर्वांचे आणि श्री सुनीळ ह्यांचे मनापासून आभार मानतो. माझ्या सर्व वाचकांच्या मी कायम ऋणात राहीन. ह्या ही वेळी त्यांच्या प्रतिक्रियेचं मी स्वागतच करीन.

बं. न. जाजू
मोबाईल ---8668553115

मातम

एक दिवस सकाळी चहा-पाणी आटोपल्यावर बायकोला बेसीन वर भांडे घासताना पाहीलं. मी म्हणालो-

'का बरं आज कमला येणार नाही का कामावर?'

बायको म्हणाली 'अरे फार वाईट झालं. काल रात्री तिचा नवरा वारला. आजारी बिजारी नव्हता. पण रोज दारू प्यायचा. आता ह्या दारुड्यांचं केव्हा काय होईल सांगता येत नाही. जे झालं ते वाईटच झालं.' थोडा वेळ मी ही विचलित झालो. कमला जवळ जवळ गेली दहा वर्षं आमच्या घरी काम करायची. अतिशय प्रामाणिक आणि विश्वासू होती ती. रोजच्या प्रमाणे आमचं रुटीन सुरू झालं. जेमतेम तीन दिवस झाले असतील, चवथ्या दिवशी सकाळी फिरून आलो. पाहतो तर कमला काम करत होती. माझ्या मनात चर्र झालं. मी म्हटलं 'कमला, काय घाई होती कामावर यायची. दहा-बारा दिवस आली नसतीस तरी चाललं असतं.' माझी बायको म्हणाली 'मी ही तिला तेच म्हणाले.'

कमला म्हणाली 'साहेब तुमचं ठीक आहे. बाकीच्या घरी लोक दहा-बारा दिवसाचे पैसे कापून घेतील. घरात दोन लहान मुलं आणि आंधळी सासू आहे. त्यांना काय खाऊ घालायचं? आम्हा गरीबांना दु:ख गोंजारत बसायला वेळ कुठे आहे साहेब?' मी सुन्न झालो. किती खरं बोलली ती.

a
त्या दिवशी दिवसभर कमलाचे तेच शब्द कानावर रुंजी घालत होते. रात्री झोपण्या पूर्वी अगदी अस्वस्थ मनानं माझी डायरी अन् पेन हातात घेतलं आणि एका दमात लिहलं—

तपती धूप में सर पर ईंट पत्थर ढोकर,
उस भवन के निर्माण मे
अपना पसीना सिंचती, उस बेवा को देख रहे हो तुम ?
उसका अपना घर उजड़े चार दिन भी नहीं बिते है ।

महाकाल के लंबे हाथों ने पोछ डाला है उसके सुहाग का टीका ।
मौत की आँधी उड़ा ले गयी है उसके मांग का सिंदूर
पर उस दुख को सहलाने को, मातम मनाने को,
उस के पास
समय नहीं है ।

क्योंकि, घर मे अपनी सांसे गिनती अंधी सास है
और भविष्य की आस है वे दो नन्हे,
जिन्हें दूध के बदले आँखके आँसू वह पिला नही सकती ।
गरीब के आँख की गंगा भी,
हिमालयसे नही, रेगिस्तान सेनिकलती है ।

a

क्योंकि उसके बंजर संसार मे, दुखो की तपती धूप,
आँसू धारा को गालोपर उतरनेसे पहले ही खुष्क कर देती है ।
वो तो तुम हम है जो आँसू बहाकर अपना दुख हलका करते है
जिनके आँसुओसे शबनम, सांत्वना के फूलोपर टपकते है ।
गरीब के पास वक्त कहाँ है
आँसू बहाने को और मातम मनानेको ।

क्योंकि एक दुख को मिट्टी में मिलाने तक
दूसरे के अंकुर निकलते है ।
इसीलिये दुखों के ढेर तले दबी हुई वह बेवा,
इट-पत्थर के ढेर ढो रही है ।

और अपना घर उजड़ने पर भी,
किसी और का गढ़ रही है ।

पुन्हा पुन्हा 'गरीब के आंख की गंगा भी हिमालय से नही, रेगीस्थानसे निकलती है' हे शब्द कानावर आदळायला लागले. वाटलं, खरंच आहे हे. गरीबाच्या उजाडलेल्या संसाराच्या, दु:खाच्या उन्हाची तीव्रता, इतकी असते की, डोळ्यातून निघालेले अश्रु, गालापर्यन्त पोहचण्या आधीच सुकून, कोरडे होऊन जातात.

ममता

मला आठवतं, आमच्या खेड्याच्या घरी आमच्या वडीलांनी पाळलेली एक कुत्री होती. आम्ही सर्व तिला लंपी ह्या नावानंच बोलावत असू. तिच्यावर आमच्या वडीलांचाच नाही तर आम्हा सर्व भावा बहिणींचा जीव होता. ती अतिशय प्रामाणिक आणि इमानदार होती. आमच्या परसदारात नेहमी बसलेली असायची. कधी कधी आई स्वयंपाक करत असतांना स्वयंपाकघराच्या छोट्या दाराशी बसायची. समोर आईच्या पोळ्यांची चळत, आणि सगळा स्वयंपाक असायचा. पण लंपीनं कधी तोंड लावल्याचं आम्हाला आठवतं नाही. बाबांनी शेतावर जायला जोडे काढले आणि काठी हातात घेतली की लंपी अंग झटकून बाबांबरोबर निघायला तयार असायची. बरेच वेळा तर खळ्याच्या दिवसात आमच्या गडी माणसाबरोबर शेतात रात्रीला राखणीला असायची.

आमच्या घरात सर्वांना तीचं फार कौतुक होतं. इतकं की लंपी व्यायची तेव्हा माझी मोठी बहीण तिला बाळंतिणी सारखा शिरा करून खाऊ घालायची, तिच्यावर अंथरूण, पांघरूण टाकायची. आमच्या घरासमोरच आमचंच एक जुनं घर होतं. माझे ब्रम्हचारी काका रात्री तिथे झोपायचे. बाळंतपणात लंपीचा मुक्काम त्या घरात असायचा. तिच्या

पिलांना पोटाशी घेऊन ती एका कोपऱ्यात झोपायची॰ काका बाजूला पलंगावर असायचे.

एकदा लंपी व्याली असतांना, अशीच रात्री पिलांबरोबर एका कोपऱ्यात झोपलेली होती. काकाही झोपले होते. बहुदा मध्य रात्र उलटली असेल. लंपी अचानक, एकसारखं जोरजोरानं भुंकायला लागली. तिच्या त्या आवाजानं काका जागे होऊन उठून बसले. ती कोपऱ्यातल्या छताकडे पाहून भुंकत होती. काकांनी कंदिलाची वात मोठी करून कोपऱ्यातल्या छताकडे पाहीलं, तर त्यांची गाळणच उडून गेली. तिथे एक मोठा साप खाली उतरण्याचा प्रयत्न करत होतो. आणि लंपी जोरजोरानं भुंकून त्याला खाली येऊ देत नव्हती. काका घरा बाहेर आले. समोरच्या घरातून माझ्या मोठ्या भावाला बाहेर बोलावलं. आमच्या घराजवळच आमच्या ग्रामपंचायतीचे चपराशी गैबीबुवा राहयचे. भाऊनं त्यांना बोलावून आणलं. ते आपला लांब भाला घेऊनच आले. तसाच भाऊ पुढे मुसलमानवाड्यात गेला आणि तिथून सैयदलाल ला घेऊन आला. हा सैयदलाल साप पकडण्यात/ मारण्यात वस्ताद होता. अशा प्रसंगी लोक हमखास त्याला बोलावून आणायचे. एव्हांना आणखी ही चार-सहा लोक आले. गैबीबुवाकडचा भाला घेऊन सय्यदलाल पुढे सरकला. त्यानं अगदी नेम धरून भाला सापाच्या नरड्यात खुपसून सपाला जमिनीवर आपटला. लंपीनं जोरदार भुंकत त्या सापाला तोंडात धरून क्षणार्धात दाराच्या बाहेर फेकलं. मग धावत जाऊन सय्यद, गैबीबुवा व इतरांनी लाठ्याकाठ्यांनी तो साप मारला.

मग सगळे एकत्र होऊन बोलायला लागले. काकांनी लंपीच्या जोरजोराने भुंकण्यामुळे जाग आल्याचं सांगीतलं. सगळेजण तीचं कौतुक

a
करत होते. लंपीचं भुंकणं आता थांबलं होतं. ती आपल्या पिलाना पोटाशी घेऊन, लांब उसासे घेत चाटत होती. सर्वजण तिच्याकडे पाहत होते. आईच्या ममतेचं एक अद्भुत आणि धैर्यशाली दर्शन त्या दिवशी आम्हा सगळ्यांना झालं. माझ्या बहीणींनं तेवढ्यारात्री गरम गरम भाकर करून लंपी ला खायला दिली. मी त्या वेळी लहान होतो. पण आजही गावाकडच्या आठवणी आल्या की, हमखास हा प्रसंग डोळ्यासमोर येतो.

शेवटचं पत्र

नारायण, पन्नासेक वर्ष वय असलेला, एक पोस्टमन होता. त्या गावच्या शांती नगर भागातलं टपाल वाटण्याचं काम त्याच्याकडे होतं. शांती नगरच्या 27 नंबरचं घर म्हणजे त्याचा शेवटचा स्टॉप. रोज सकाळी दहा वाजेच्या दरम्यान आपली मळकट खाकी रंगाची, पत्रांनी भरलेली बॅग, आपल्या खांद्यावर अडकवून, तो आपल्या सायकलवर टपाल वाटायला निघायचा. तो जेव्हा 27 नंबर च्या घरापर्यंत पोहचायचा, तेव्हा समोर त्या घराच्या जुनाट फाटकापाशी त्याला सत्तर वर्षाच्या कावेरी बाई जाधव, त्याची वाट पाहत उभ्या असलेल्या दिसायच्या. तो पोहचला की रोज त्यांचा तोच प्रश्न असायचा; 'आहे का माझं काही पत्र ?' आणि रोज त्याचं उत्तर असायचं 'नाही. आज नाही.' मग त्या हलकंस हसून म्हणायच्या 'ठीक आहे. उद्या येईल कदाचित.' नारायणला आधी आधी वाटायचं, आपलं 'नाही' हे उत्तर असूनही, ह्या बाई रोज रोज काय हा प्रश्न विचारतात. पण पुढे पुढे ते एक रुटीन झाल्यासारखं त्याच्या अंगवळणी पडलं.

कावेरीबाई एकट्याच त्या जुनाट घरात राहयच्या. पती वारून पाच-सहा वर्ष झालेली होती. दोन्हीही मुलं दूर अमेरिकेत स्थायिक झालेली होती. कधी कधी त्या नारायणला प्यायला पाणी द्यायच्या. कधी हवा-पाण्याबद्दल दोन चार वाक्यं बोलायच्या, तर कधी आपल्या छोट्याशा बागेतील फुलांबद्दल नारायणाशी बोलायच्या. तो फक्त नम्रपणे मान

हलवायचा, आणि आणखी राहिलेली पत्र वाटायला पुढे निघायचा. पण हळू हळू तो कावेरीबाईंच्या फाटकावर थोडं थांबायला लागला. त्यांची विचारपूस करायला लागला. एक दिवस तर त्यानी एक जून मासिक, कावेरीबाईंच्या हातात दिलं. 'तुम्हाला आवडेल हे', तो त्यांना म्हणाला. बाईंचा चेहरा उजळला. म्हणल्या, 'माझ्यासाठी?' त्यांचा तो चेहरा पाहून नारायणाला खूप बरं वाटलं. मग त्याला रोज त्या घराची आठवण व्हायची.

एक दिवस मात्र त्याला बाई फाटकावर दिसल्या नाही आणि घरालाही कुलूप दिसलं. सलग दोन तीन दिवसांच्या सुटी नंतर तो आज पत्र वाटायला आला होता. त्यानं अस्वस्थ होऊन शेजारच्यांना विचारलं. ते म्हणाले, 'त्या दोन दिवसांपूर्वी झोपेतच वारल्या.' 'ओह' तो म्हणाला. त्याचे डोळे पाणावले आणि ऊर दाटून आला. त्या दिवसांनंतर ही नारायणचं रुटीन तसंचं चाललं होतं॰ तीच घरं, तीच पत्र. पण 27 नंबरच्या घराचा तो उदास सन्नाटा त्याच्या मनाला बोचत राहिला. कावेरीबाईंच ते आशाळूभूत नजरेनं त्याची वाट पाहणं, त्यांचं ते हलकंसं हसणं, त्यांचं ते रोज 'काही आहे का माझं पत्र?' असं विचरणं, सगळं सगळं संपलं. बाकी राहिलं फक्त ते किर किर वाजणारं जुनं फाटक. ती कोमेजलेली फुलझाडं.

एक आठ दहा दिवसांनंतर बटवडा न झालेली काही पत्र चाळत असताना, त्याला ' To, The Kind Postman ' असा पत्ता लिहलेलं एक पाकिट सापडलं. त्यानं ते पाकिट मागे पलटून पाहिलं, तर मागे 'From, Kaveri Jadhav' असं लिहलेलं त्याला दिसलं. बराच वेळ ते पाकीट हातात धरून तो बसला आणि नंतर भारावलेल्या मनानं त्यानं ते पाकीट उघडलं. आत एक नीट घडी घालून ठेवलेलं, सुंदर हस्ताक्षरात लिहलेलं पत्र होतं. तो भरभर वाचू लागला—

‘ प्रिय पोस्टमन दादा,

मला माहीत आहे की मी मेल्यानंतरच हे पत्र तुमच्या हाती पडेल. हे लिहताना माझी बोटं थरथरत आहेत. माझे दिवसही आता भरत आले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून मला तुम्हाला काही सांगायचं होतं. तुम्हाला आश्चर्य वाटत असेल की मी रोज तुम्हाला, ‘माझं काही पत्र आहे का’ असं का विचारायची. खरं म्हणजे मी कुठल्याही पत्राची वाट पाहत नसायची. माझी मुलं दूर अमेरिकेत आहेत आणि आताशा त्यांनी मला पत्र लिहणं ही बंद केलं आहे. तुम्ही येऊन माझ्याशी चार दोन मिनिट बोलण्याची, मी वाट बघत असे. तुमच्या सारखं कोणी तरी यावं, माझ्याशी माणुसकीचं, भावनिक नातं जोडवं, माझ्याशी दोन शब्द बोलावं, माझ्या अस्तित्वाची त्याला जाण व्हावी, एवढ्यासाठी मी रोज फाटकावर तुमची वाट पाह्यची. आणि मग तुम्ही आले की मला आनंद व्हायचा. दोन मिनिट का होईना पण तुम्ही माझ्याशी बोलले की मला हायसं वाटायचं. तुमचं ते ‘नाही, आज नाही तुमचं पत्र’ हे ऐकण्याची मी वाट बघत असे. रोज आणि त्या उद्याची पण. मला तुम्ही दिलेल्या त्या मासिकाबद्दल मनापासून धन्यवाद. ते मी अनेक वेळा वाचलं. माझ्यासाठी ती तुम्ही दिलेली अमूल्य भेट होती. तुम्हाला ह्याची जाणीव नसेल, पण तुमच्या त्या पत्र वाटपाच्या घाई गर्दीच्या कामतही तुम्ही मला दिलेली ती दोन मिनिटं ही माझ्यासाठी फार मोलाची होती. मला वाटायचं माझी ही कोणी आठवण ठेवतं. मी तुमची खूप आभारी आहे

कावेरी जाधव

a

नारायण चे डोळे भरून आले. त्याने हलक्या हाताने त्या पत्राची घडी करून ते पाकिटात ठेवलं. संध्याकाळी एकटा बसलेला असताना त्यानं ते पत्र परत वाचलं. त्यानंतर दुसऱ्या दिवशी 27 नंबरच्या घरासमोरून जाताना तो फाटकापाशी थांबला. ती कोमेजलेली बाग, ती बोचरी शांतता ह्याची त्याला दु:खद जाणीव झाली. त्या फाटकावर आपली बोटं फिरवताना अनायासे त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले, 'नाही, आज काही नाही' 'आता नारायण मध्ये आमुलाग्र बादल झाला होता. आपल्या पत्र वाटण्यापेक्षा आणखी ही काही महत्वाचं आहे, ह्याची त्याला जाण झाली. आता रोज पत्र वाटताना तो, आळीत खेळणाऱ्या लहान मुलांना हात हलवून बाय करायचा, दारावर उभ्या असलेल्या कोणी आजी, आजोबांशी थांबून चार शब्द बोलायचा, कोणाला 'कसे आहात भाऊ/कशा आहात बाई असं विचारायचा. कोणाकडे बघून स्मित करायचा. आता नारायण केवळ पत्राचा बटवडा करत नव्हता. आता तो आपल्या येण्याची, आपल्या अस्तित्वाची हजेरी देऊन, आनंदाचा ही बटवडा करू लागला. एका आंतरिक समाधानानं त्याचा ऊर भरून येऊ लागला.

उधार मिळालेला वेळ

गोपाल शर्मा हा एका शहरात, एका मोठ्या कंपनीत, मोठ्या पदावर काम करत होता. तो नेहमी अत्यंत व्यस्त असायचा. नेहमी कामात. आपला एक एक मिनिट आपल्या कामासाठी सदुपयोगी लावायचा असं त्यानं आपल्या डोक्यात भरून ठेवलं होतं. आपल्या कुटुंबाकरताही त्याच्याजवळ वेळ नव्हता. नेहमी मीटिंग्ज, डेड लाइन्स, प्रमोशन हेच त्याच्या डोक्यात असायचं. कुठली करमणूक नाही की सहल नाही. घड्याळाच्या काट्या सारखं त्याच जीवन होतं. जीवनातल्या छोट्याछोट्या गोष्टीसाठी, मनमोकळ्या गप्पांसाठी, तलावाकाठी बसून सूर्यास्त पहाण्यासाठी त्याच्या जवळ वेळ नव्हता,

एकदा तो आपल्या चेकअप साठी डॉक्टर कडे गेला. सगळे रिपोर्ट्स पाहून डॉक्टरांनी सांगीतलं की तुम्ही आता फक्त सहा महिनेच जीवंत राहाल. त्यामुळे त्याला धक्काच बसला. त्याचा त्या सांगण्यावर विश्वासच बसेना. तो फक्त 40 वर्षाचा होता. अगदी स्वस्थ आणि कामाला फिट. मग असं कसं होईल. पण रिपोर्ट्स आणि डॉक्टर चूक असू शकत नाही. आता वेळ त्याच्या साठी जास्त मूल्यवान पण तितकाच ठिसुळ झाला होता. केव्हा हातातून निसटून संपेल सांगता येत नाही; ह्याची त्याला जाणीव झाली. त्या संध्याकाळी जेव्हा तो आपल्या प्रशस्त घरात

खिडकीपाशी बसला होता, तेव्हा त्याला वाटलं, आता काही घाई नाही कामाची. आता कुठेही जायचं नाही आपल्याला. आता काही ही अर्जंट नाही. फक्त सहा महिन्याचा वेळ. दुसऱ्या दिवशी तो कामावर गेला नाही.

एका लहान गावात राहत असलेल्या आपल्या म्हाताऱ्या आई-वडलांकडे तो गेला. त्याच गावात, त्याच घरात तो लहानाचा मोठा झाला होता. दार उघडल्या बरोबर त्याची आई सुखद आश्चर्याने म्हणाली 'गोपाल तू? आणि असा अचानक? आम्हाला आधी कळवलं ही नाही. तो म्हणाला, 'मला तुम्हाला सरप्राइज द्यायचं होतं'. आईचा इतका उजळलेला चेहरा त्यानं अनेक वर्षात पहिला नव्हता. घरात गेल्या बरोबर पहिल्यांदा त्याला आपल्या बापाचं ते हळूहळू चालणं, आईच्या चेहऱ्यावर पडलेल्या सुरकुत्या, त्या शांत घरातल्या भिंतीवरच्या घड्याळाची टिक टिक यांची जाणीव झाली. मग तो तिथे काही दिवस, काही आठवडे राहिला. घड्याळाकडे न बघता आता तो आई-बाबांशी गप्पा करायला लागला. आईच्या हातच्या घरच्या जेवणाची मजा घेऊ लागला. आपल्या शाळेतल्या जुन्या मित्रांना, भेटू लागला. अनेक वर्षांनंतर त्या मित्रांमध्ये तो रमू लागला.' गल्लीत खेळणाऱ्या लहान मुलांना पाहून हसू लागला. आपणही असेच खेळत असल्याचं त्याला प्रकर्षानं आठवू लागलं. सभोवतालच्या टेकड्यांवर जाणं, नदी किनाऱ्यावर भटकणं ह्यापसून त्याला आनंद मिळू लागला. ह्या सर्वांना तो आपल्या घाई-गर्दीच्या जीवनात विसरून गेला होता. आता आपण खरं जगतोय ह्याची त्याला जाण झाली.

एक दिवस नदीच्या किनाऱ्यावर मावळतीच्या सूर्याचं चित्र काढत बसलेला एक मुलगा त्याला दिसला. त्याच्या जवळ जाऊन तो म्हणाला,

a

’काय नाव आहे तुझं, आणि काय काढतो आहेस तू? खूप सुंदर आहे हे चित्र.’ मुलगा म्हणाला ‘मी कबीर. माझी वेळ संपण्याआधी मला ही चित्र पूरी करायचीय. ’गोपाल त्याला म्हणाला ‘म्हणजे?’ कबीर म्हणाला ‘मी आजारी आहे व डॉक्टर म्हणाले आता तू फार दिवस जगणार नाहीस. म्हणून प्रत्येक क्षणाचा मला आता उपयोग करायचा आहे कबीरच्या चेहऱ्यावर गोपाल ला कुठलंही भय दिसलं नाही. दिसली ती केवळ स्वीकृती-acceptance, आणि उद्देश. जे आहे त्याचा स्वीकार करायचा आणि आपल्या उद्देशपूर्तीसाठी काम करायचं.

त्या रात्री गोपालला धड झोप आली नाही. काही आठवडे तिथे राहून तो परत आपल्या शहरातल्या घरी आला. दुसऱ्याच दिवशी फालो अप साठी तो त्याच्या डॉक्टरकडे गेला. डॉक्टर ने त्याचे रिपोर्ट्स पाहिले. त्याला तपासलं. ते बुचकळ्यात पडले. ते म्हणाले ‘ Mr.Sharma something went wrong with your earlier reports. There is nothing wrong with you. You are absolutely fine. गोपाल च्या डोक्यात डॉक्टर च्या त्या शब्दांचे पडसाद पडू लागले. ’फाईन’, हेल्दी. तो दवाखान्याच्या बाहेर आला. ते सहा महीने, ती भीती. तो आपल्यातला बदल. त्याला परत सर्व आठवू लागलं. पण बाहेरची ती लोकांची गर्दी, धावपळ, ते मोबाईलवाले तरुण, त्यांचं ते धावत धावत, घाईने बोलणं. त्याला वाटलं, डॉक्टरचं पूर्वीचं डायगोनोसिस कदाचित चुकलं असेल. पण आपण शिकलेला धडा मात्र चुकीचा नाही. आता तो बदललेला गोपाल होता. त्याच संध्याकाळी त्यानं आपल्या ऑफिसला फोन करून आपला राजीनामा स्वीकारावा असं सांगीतलं. आता त्याला वेगळंच काम करायचं होतं. काही महिन्यांनी त्यानं आपलं एक सेवा केंद्र, कम्युनिटी सेंटर

काढलं. तिथे तो लहान मुलांना शिकवू लागला, मदत करू लागला. वरिष्ठ नागरिकांची कामं करून त्यांना मदत करू लागला. काही एकाकी लोकांशी बोलून त्याचं एकाकीपण कमी करू लागला. ह्या सर्व गोष्टीत त्याला आनंद मिळू लागला.

एक दिवस एकानं त्याला विचारलं, 'What changed your life?' गोपाल म्हणाला, 'I was given time. May be borrowed time, but it changed my life.' त्याला वाटलं, 'We often live as if time is endless, postponing what truly matters. But when we realize how fragile life is, we understand how every moment is a gift- not to be spent or wasted, but to be lived.

' वक्त ' ह्या जुन्या गाजलेल्या चित्रपटातल्या, साधना ह्या नायिकेवर चित्रित आणि आशा भोसलेंनी गायलेल्या, साहिर लुधियानवी च्या गाण्याच्या शेवटच्या दोन ओळी आठवतात-

' जब तुम से मुहोब्बत कियी हम ने,
तब जा के कही ये राज खुला, तब जा के--
मरनेका सलिका आते ही,
जीने का शवूर आजाता है,'.. (चेहरेपे खुशी...)

मरायचं कसं, हे एकदा कळलं की जगायचं कसं हे समजायला लागतं.

देव सर्वांचाच

बरेच वर्षापूर्वीची गोष्ट आहे. मी एकदा महाराष्ट्र एक्सप्रेसनं बडनेरा वरून पुण्याला चाललो होतो. बडनेऱ्याला गाडीत आपल्या जागेवर बसलो. तो आषाढाचा महिना होता. आषाढी एकादशी दोन तीन दिवसांवर आली होती. म्हणून पंढरपूरला जाणारे बरेच लोक गाडीत होते. हे सगळे दौंड वर उतरून पुढे गाडी बदलून पंढरपूरला जाणारे होते. माझ्या समोरच्या सीटवर एक 55- 60 वर्षांचे गृहस्थ बसले होते. साधेसुधेच वाटले. थोड्यावेळात आमच्या डब्यात दोन पोलीस आले आणि त्यांनी नम्रपणे त्या समोरच्या गृहस्थांची चौकशी केली. एका पोलीसांनं फळं वगैरे आणली होती ती त्यांना दिली. ते म्हणाले अरे कशाला ? तर पोलिस म्हणाला असू द्या. प्रवासात लागतील. दुसरा म्हणाला पाणी वगैरे आहे का? ते म्हणाले आहे. गाडी सुटण्याची वेळ झाली तसे ते पोलीस उतरत उतरत म्हणाले ठीक आहे बाबा काळजी घ्या निघतो आम्ही.

गाडी सुरु झाली पुढे अकोल्यालाही एक दोन पोलिस आले. त्या गृहस्थांची विचारपूस केली परत पाणी वगैरे काही आहे की नाही की आणून देऊ असे एकाने विचारले आणि गाडी निघताना नमस्कार करून गेले.. पुढे बोलण्या बोलण्यात कळलं की नागपूरला त्यांचा मुलगा

पोलीसात वरिष्ठ अधिकारी होता. बहुदा एस.पी. वगैरे असावा. त्यांनी जवळपास सगळ्या स्टेशन वर पोलिसांना हे सांगीतलं असावं. कारण ते वृध्द गृहस्थ एकटेच प्रवास करत होते. पुढे भुसावळ आलं तिथे गाडी बराच वेळ थांबली. मग तिथेही परत दोघं-तिघं पोलीस आले आणि थर्मास मध्ये आणलेला चहा त्यांना दिला थोडा वेळ ते डब्यात बसले. त्या वृध्दाची विचारपूस केली. गाडी सुटण्याच्या दोन मिनिट आधी ते पोलीस उठले. त्यातला एक जण म्हणाला " बाबा येतो आम्ही, काळजी घ्या. आणि हो, साधरणत: कोपरगाव पर्यंत रात्रीचे अकरा वगैरे वाजतील. त्या पट्ट्यात खिसे कापण्याचे, सामान उचलून नेण्याचे प्रकार बरेच होतात. त्यामुळे थोडं लक्ष ठेवा बाबा .".

ते गृहस्थ म्हणाले "अरे काय लक्ष द्यायचं. पंढरपूरला जातोय. विठ्ठलाचं नाव घेऊन निघतोय. तोच राखील. तो पोलिस म्हणाला "बाबा ते खरे आहे तुमचं. पण चोरी करणाराही विठ्ठलाचं नाव घेऊनच येतो. अन् येताना म्हणतो "देवा आज चांगला हात मारू दे, चांगला माल मिळू दे. तेव्हा बाबा, त्या विठ्ठलाने कोणाचं ऐकायचं? तुमचं की त्याचं ? तो पोटापाण्यासाठी चोऱ्या करतो. देव त्याचा बी हाये." गाडी सुटता सुटता त्यांनी परत बाबांना लक्ष द्या म्हणून सांगीतलं अन् ते उतरले. मी समोर बसून ही सगळी मजा पाहत होतो, ऐकत होतो. आणि मग मला वाटलं खरंच सर्वांची काळजी घेणाऱ्या परमेश्वरानं कोणाची प्रार्थना ऐकायची, ह्यांची की त्या चोराची? तो ही मनापासून प्रार्थना करून धंद्यावर येतो. वाटलं खरंच जगाचं हे बॅलन्स ठेवताना देवाला किती सर्कस करावी लागत असेल. आणि किती केलं तरी देवाला पाप्यांची काळजी जास्त घ्यावी लागते. पापी आहेत, वाईट करणारे आहेत म्हणून देवाचं नाव घेणारे

पुण्यवान आहेत. सर्वच चांगले असते तर देवाला कोणी विचारलं असतं? पूजलं असतं? त्याला सर्वांचे ऐकणं भाग आहे.

एकदा मी सुधांशू महाराजांचं प्रवचन ऐकत होतो. सुधांशू महाराजांचं प्रवचन, त्यांची शैली चांगली आहे. त्यांचा आवाज, उच्चार व बोलण्याची पद्धत श्रोत्यांना खिळवून ठेवते. ते आपल्या प्रवचना दरम्यान अनेक मनोरंजक उदाहरणं देतात. दृष्टांत देतात. त्यामुळे आपलं म्हणणं ते परिणामकारक रित्या श्रोत्यांवर बिंबवतात. असंच, वरच्या संदर्भातलं त्यांनी दिलेलं एक उदाहरण मला आठवतं. ते हिंदीत बोलतात. मधून मधून इंग्रजीही. म्हणून त्यांच्या भाषेत लिहितो--

" एक दिन राजस्थान के रेगिस्तान में एक ऊंट सवार अपना थोड़ा सा सामान अपने ऊंट के पीठ पर लादकर एक गांव से दूसरे गांव जा रहा था. रेगिस्तान में चलते चलते उसने देखा के रास्ते में एक बूढ़ी औरत अपने सर पर अपनी बड़ी सी गठरी रखकर उसी दिशा में जा रही थी जिसतरफ वह जा रहा था. जैसे ही वह ऊट सवार उस बुढिया के पास आया तो बुढिया बोली " बेटा किस गांव जा रहे हो?' वह आदमी बोला मैं फला फला गांव जा रहा हूं. उसने गांव का नाम बताया तो बुढिया बोली "मैं तेरे वाले गांव से पहले वाले गांव, उधर ही जा रही हूं. बेटा मेरी गठरी थोड़ी भारी है. मुझे चलने में तकलीफ होती है. तुम उधर ही जा रहे हो तो मेरी यह गठरी तुम अपने ऊंटके पीठ पर रख कर ले जाओ. अगले गांव के बाहर ही एक देवी का मंदिर है, वहां मेरी गठरी छोड़ देना. मैं पीछे से धीरे-धीरे आती हूं. आ कर मेरी गठरी ले लूंगी. " वह ऊंटसवार बोला,"मैं मेरे ऊंटपर क्यों तेरे बोझको लादूं ? और तुझे पहले नहीं समझा क्या? इतना सामान क्यों बांधा गठरी में?" ऐसा बोल कर वह सवार आगे तेजी से

निकल गया. थोड़ी सी दूर गया होगा तो उसके मन में आया, बुढिया के गठरी में कुछ तो माल होगा. वह दे रही है तो गठरी लेकर चले जाएंगे. वह तो धीरे-धीरे आ रही है. तेजी से आगे जाकर कीमती माल उसके गठरी में से निकाल लेंगे और बाकी गठरी देवी के मंदिर के पास छोड़ देंगे. बुढिया को पता चलेगा तब तक तो अपन कोसों दूर चले जाएंगे." मन में यह विचार आते ही वह वापस पलटा और बुढीया के पास आ कर बोला, "अच्छा लाओ दे दो गठरी. मैं मंदिर पर छोड़ दूंगा." यह सुनकर वह बुढ़िया बोली "अब मुझे नहीं देनी है मेरी गठरी. मै खुद ही लेकर चले जाऊंगी." वह सवार बोला "क्यों, अभी तो तू बोल रही थी कि तुझे चलने में तकलीफ होती है गठरी के वजह से. तो दे दे. अब क्यों नहीं बोलती है ?

वह बुढ़िया बोली " जिस भगवान ने तुझे यह बुध्दी दी है कि लेले बुढ़िया से गठरी, और हडप ले उसमें का माल. उसी भगवान ने मेरे कानों में यह कहा की, अब इसके मन में बदी आई है. यह तेरा सामान चुराने वाला है. सो अब अगर यह गठरी मांगेगा तो देना मत."

" तो भाइयों और बहनों, भगवान को तो संसार का बैलेंस रखना पड़ता है. यह उसका भी सुनता है और इसका भी. एक को कुबुध्दी उसने दियी, तो दूसरे को सुबुध्दी उसने ही दियी. हिसाब बराबर."

असं असतं परमेश्वराचं. त्यचा हिशेब समजणं अत्यंत कठीण आहे. चार माणसांच्या संसाराचा गाडा

चालवताना आपली किती सर्कस होते. मग त्याला तर जग चालवायचं आहे.

आनंद देण्यातला

साधारण पंचवीस तीस वर्षांपूर्वीची गोष्ट असावी. आम्ही म्हणजे मी, माझी बायको, मुलगा आणि मुलगी सर्वांनी मिळून अमरावतीहून माहूरला देवीच्या दर्शनासाठी जायचं ठरवलं. अमरावतीहून सकाळी साधारण आठ वाजता टॅक्सीने जायचं ठरवलं. आदल्या दिवशी रात्रीच माझ्या बायकोनं आमचा चौघांचा, ड्रायव्हरचा जेवणाचा डबा तयार करून ठेवला. ठरल्या दिवशी सकाळीच साधारण आठ वाजता निघालो. रस्त्यात पुसदच्या इंजिनियरिंग कॉलेज मध्ये थोडं थांबायचं होतं. फिजिक्स डिपार्टमेंट मध्ये माझे जुने मित्र प्राध्यापक शरद लाहोटी, जे माझ्या बरोबर पाचवी ते सातवी एकाच शाळेत होते, ते पुसदच्या इंजिनियरिंग कॉलेज मध्ये पदार्थविज्ञान विभागाचे प्राध्यापक होते. मी ज्या ज्या वेळी पुसद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये भाषणासाठी, कार्यालयीन कामासाठी, परीक्षेसाठी जायचो तेव्हा शरदच्या घरी नेहमी जायचो. मुक्कामाला असलो तर त्याच्याकडेच राहायचो. त्या दिवशी आम्ही ठरवलं की माहूरला जाताना पुसदला शरद च्या घरी अर्धा-एक तास ब्रेक घेऊ. चहापाणी घेऊ आणि पुढे जाऊ. अकरा वाजेच्या दरम्यान आम्ही शरद कडे पोचलो. दोघांची कुटुंब एकमेकांना ओळखत होती व दोन्ही कुटुंबाची चांगली मैत्री होती. बोलण्या बोलण्यातच बराच वेळ गेला. ते सर्वजण म्हणाले आता इथून जेवून जा. आम्ही म्हटलं आम्ही डबा आणलाय बरोबर. माहूरला जाऊन जेवू. शरद ऐकेच ना. नंतर वहिनीने स्वयंपाकाची तयारी केली. मग तिथे जेवून आम्ही पुढे माहूरला निघालो. माहूरला शांततेनं दर्शन वगैरे

झालं. बराच वेळ थांबलो. संध्याकाळी साडेसहा वाजता परत यायला निघालो. मला वाटतं साधारण रात्रीचे नऊ वाजत आले असावेत. नक्की कोणत्या ठिकाणी ते आता मला आठवत नाही पण एका ठिकाणी कारच्या समोर रस्त्यावर दोन जण थांबण्यासाठी अगतिकपणे हातवारे करत होते. रस्त्याच्या बाजूला त्यांचा मोठा टेम्पो, सामान भरलेला, कोलमडून पडलेला होता व एक माणूस बाजूलाच रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. मी आमच्या ड्रायव्हरला कार थांबवायला सांगीतलं. ती दोघं म्हणाली "साब एक्सीडेंट हो गया है. पिछेसे आनेवाले ट्रकने हमारा टेम्पो उडा दिया. एक आदमी करीब करीब मरने के कंडिशन मे खून से भरा पडा है. एक आदमी आगे के गाव मदत मांगने को गया है. साब हमको कुछ तो दो. आम्ही त्यांना पैसे द्यायला लागलो. ते म्हणाले साहेब हमारे पास पैसे है, पैसे नही चाहिये. हमको बहुत भूक लगी है. पास में खाने को कुछ भी नही साब. आजू बाजू कोई भी नही दिखता. हमको कुछ खाने को दो, अशी गयावया करत होते. माझी बायको म्हणाली आपला सकाळच्या सर्व डब्बा तसाच आहे. यांना सर्व देऊन टाकते. घरी गेल्यावर मी आपल्यासाठी करीन काहीतरी. मी म्हटलं खरंच देऊन टाक सर्व त्यांना.

आमच्या सौभाग्यवतीनं सर्व जेवण त्यांना देऊन टाकलं. मी ड्रायव्हर बरोबर समोरच बसलेलो होतो. त्या दोघांनी आम्हाला हात जोडून नमस्कार केला. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहीले, आणि आयुष्यात पहिल्यांदा देण्यातला आनंद काय असतो याची सखोल अनुभूति मला झाली. असं वाटलं आपलं पोट भरलं. मला बरेच वेळा त्या दोघांचा चेहरा अजूनही आठवतो आणि वाटतं किती साध्या साध्या गोष्टीत जीवनाचा आनंद दडलेला असतो. पण तो अनुभवायला आपण मुकतो.

a

एकदा अमरावतीला माझी बायको संध्याकाळी मार्केट मधून आटोरिक्षनं कॅम्पला आमच्या घरी आली. त्यावेळी अमरावतीत शेअरिंग आटो 3-3 रुपये सवारी घेऊन चालवायचे. ही, आमच्या कॉलनी समोर उतरली. घरी आली. मी दार उघडलं तर मला म्हणाली "मैने आज आटो वाले को पाच रुपये दिये." मी म्हणालो "अभी तो तीन रुपये लेते ना ?' ती म्हणाली " हा. दो रुपये वापस दे रहा था तो मैने कहा रहने दो भैया. आप विश्वास नही करेंगे, दो रुपये कोई बडी बात नही, पर उसके चेहरे पर मैने जो देखा उसकी किमत दोन हजार रुपये से ज्यादा थी." मी हसलो. ती नेहमी असं करायची. तिची ती थेअरीच होती. दारावर आलेल्या भाजीवाल्याशी ती कधी भाव किंवा घासाघीस करायची नाही. मला म्हणायची त्याच्या सर्व भाजीपाल्याची किंमत पाचशे रुपये होईल सगळी विकली तरी त्याला शंभर दीडशे च्या वर काय मिळणार. त्यासाठी तो दिवसभर भटकतो. आणि त्यातूनही आमच्यासारख्या दहा-बारा बायांनी भाव करून वाचवले, तर आम्ही किती वाचवणार? वीस तीस रुपये सर्वांचे मिळून. पण त्या बिचाऱ्या चे शंभराचे 80 करणार. त्यापेक्षा घरात काटकसर करायला बऱ्याच जागा आहेत. कपडे, हॉटेल. मग गरीबा बरोबर च भाव कशाला करायचा? एवढंच नाही तर ती रेल्वे स्टेशनवर मला हामालाशी कधी भाव करू द्यायची नाही. ती नेहमी म्हणायची देण्यातला आनंद काय असतो हे अनुभवून पहा. मला ते पटायचं. वाटायचं, खरंच आपण मोठ्या मॉल्समध्ये खरेदी करताना, हॉटेल्समध्ये खाताना अव्वाच्या सव्वा पैसे देतो. तिथे एका रूपयाचं ही बारगेन करता येत नाही. आणि भाजीच्या गाडीवाल्याबरोबर वाद घालतो.

पश्चाताप

काही वेळा व्हाटसॅप वर ही, स्मरणात राहाव्या अशा गोष्टी, मेसेज म्हणून येतात. त्याही मनात घर करून बसतात व एखादा संदेश देऊन जातात. परवा एका मित्रानं अशीच एक सुंदर छोटीशी गोष्ट पाठवली. इथे लिहाण्याचा मोह आवरेना.

पुण्यातील एका मोठ्या स्मशानभूमीत दुपारचे तीन वाजले होते. 35 एक वर्षाचा समीर जो अमेरिकेतल्या एका सॉफ्टवेअर कंपनीत व्हाइस प्रेसिडेंट होता, नुकताच फ्लाइट मधून उतरून थेट स्मशानभूमीत आला होता. त्याचे 75 वर्षाचे वडील सुधाकरराव, काल रात्री वारले होते. त्याच्या डोळ्यावर एक किमती गॉगल आणि पाठीवर लॅपटॉप ची एक महागडी बॅग होती. त्याला घाम फुटला होता आणि तो सारखा आपल्या घड्याळाकडे पाहत होता. तिथे 'मोक्ष इवेंट मॅनेजमेंट' करणाऱ्या एजन्सीचा माणूस मोहन उभा होता. मोहन ने सगळी तयारी करून ठेवली होती. लाकडं रचली होती, भटजी बोलावले होते. आणि सुधाकररावांचा मृतदेह स्वच्छ आंघोळ घालून तयार ठेवला होता.

समीर आला. त्याने वडिलांच्या चेहऱ्यावर एक नजर टाकली. त्याच्या डोळ्यात एक दोन थेंब पाणी आलं. त्यानं मोहनला विचारलं 'मिस्टर

मोहन, सगळं रेडी आहे ना? मला संध्याकाळची सहाची रिटर्न फ्लाइट पकडायची आहे. उद्या महत्वाची मीटिंग आहे. प्लीज लवकर उरका.' मोहनला आश्चर्य वाटलं. ज्या बापाने या मुलाला लहानाचा मोठा केला, त्या बापाच्या चितेजवळ थांबायला ह्याच्या जवळ तीन तास ही नव्हते.

मोहननं शांतपणे मान डोलावली. विधी पार पडले आणि समीरनं भडाग्नी दिला. धुराचे लोट आकाशात गेले. समीरनं मोहनला बाजूला घेतलं आणि चेक बूक काढलं. समीर मोहनला म्हणाला thank you. तुम्ही फार चांगली व्यवस्था केली. तुमचं बिल किती झालं? पन्नास हजार? एक लाख? अमाऊंट सांगा. मी आत्ताच चेक देतो. मला परत येता येणार नाही. अस्थिविसर्जन तुम्हीच करून टाका' मोहननं समीर कडे बघितलं. मोहनच्या चेहऱ्यावर एक विचित्र हसू आलं. त्यानं आपल्या बगलेतल्या पिशवीतून एक जूनी फाइल काढली आणि समीरच्या हातात दिली आणि म्हणाला, 'साहेब बिल द्यायची गरज नाही. तुमचं बिल पेड आहे. समीर गोंधळला. 'पेड आहे? कोणी भरले पैसे? माझ्या काकांनी?' समीर म्हणाला.

" नाही साहेब. पाच वर्षापूर्वी तुमचे वडील, सुधाकरराव आमच्या ऑफिस मध्ये आले होते. ते खूप आजारी होते. त्यांना धड चालताही येत नव्हतं. त्यांनी मला विचारलं, तुमचं पॅकेज काय आहे? माझ्या मुलाला त्रास नको म्हणून तुम्ही सर्व करून देणार का? ' आम्ही त्यांना पॅकेज सांगीतलं. त्यांनी त्याच दिवशी पन्नास हजार रुपये ॲडव्हान्स जमा केला. आणि ही चिठ्ठी मला त्यांनी दिली. त्यांनी सांगीतलं होतं की माझा मुलगा आला की त्याला ही द्या. आणी तो आलाच नाही तर तुम्हीच माझं सर्व करा." मोहननं ती चिठ्ठी समीरला दिली. समीरनं थरथरल्या हाताने

ती चिठ्ठी उघडली. आपल्या कापऱ्या अक्षरात सुधाकररावांनी लिहलं होतं---

प्रिय समीर,

बाळा, मला माहीत आहे की तू फार बिझी आहेस. अमेरिकेत तुला श्वास घ्यायला वेळ नसतो. मला माहीत आहे की माझ्या मरणाची बातमी ऐकून तुला टेंशन येईल. 'सुटी मिळेल का? तिकीट मिळेल का?' हे प्रश्न तुला पडतील. बाळा तुझा वेळ आणि तुझं करियर खूप महत्वाचं आहे. मी तुला वाढवलं ते यासाठीच की तू जग जिंकावंस. एका म्हाताऱ्याच्या प्रेतासाठी तू तुझं नुकसान करून घेऊ नकोस. म्हणून माझ्या मरणाची सोय मी आधीच करून ठेवली आहे. एजंसीला पैसे दिले आहेत ते सगळं करतील.

तू आलास तर बरंच आहे, नाही आलास तरी मला राग नाही. फक्त एकच विनंती—लहानपणी शाळेत जातांना मी तुझा हात कधीच सोडला नव्हता. आज जातांना, अग्नि देतांना तुझा हात थरथरू देऊ नकोस. लवकर परत जा. तुझी बायको वाट बघत असेल

तुझा,

बाबा

चिठ्ठी वाचून समीरच्या हातातलं चेकबुक खाली चिखलात पडलं. त्या स्मशानभूमीत, जिथं लाकडं जाळण्याचा आवाज येत होता, तिथं आता समीरचा अहंकार आणि करिअरचा गर्व जळून खाक झाला होता. तो गुडघ्यावर बसला आणि ओरडला " बाबा मला माफ करा. माफ करा बाबा." समीर नं मोहनचे पाय धरले. 'मोहन मला नाही जायचं अमेरिकेला. मला माझ्या बाबांसोबत राहायचंय. मी करोडो रुपये कमवले

पण मी भिकारी निघालो. माझ्या बापाने मरताना सुध्दा माझ्या मिटिंगचा विचार केला. आणि मी? मी त्यांच्या शेवटच्या दर्शनाचा भाव करत होतो,

त्या दिवशी समीर फ्लाइट पकडू शकला नाही. तो तिथेच त्या जळत्या चितेबरोबर रात्रभर बसून राहिला. आता त्याला समजलं होत की प्री पेड, फक्त सीम कार्ड असू शकतं. बापाचं प्रेम नाही. बापाचं प्रेम हे अनलिमिटेड असतं. त्याची परत फेड जगातील कोणतीच करन्सी करू शकत नाही.

तुम्ही जगात किती ही मोठे व्हा, किती ही पैसे कमवा, पण ज्या आई-वडिलांनी तुमची लंगोट बदलली, त्यांच्या शेवटच्या प्रवासात डायपर बदलाची वेळ आली तर नाक मुरडू नका. एजन्सी अंत्यसंस्कार करू शकते पण एजन्सी जवळ अश्रु नसतात. ते रक्तातल्या माणसालाच वहावे लागतात.

मावळतीचा सूर्य

एका कॉलनीत वरिष्ठ नागरिकांचा 15-20 जणांचा एक ग्रुप होता. रोज सकाळी आणि संध्याकाळी हे लोक कॉलनीतल्या बेंचेसवर एखादा तास एकत्र बसून विविध विषयावर गप्पा मारायचे. एक निवृत्त पोलिस कमिशनर जे सेवानिवृत्त होण्याआधी आपल्या सरकारी बंगल्यात रहायचे, ह्या कॉलनीतील आपल्या स्वत:च्या फ्लॅट मध्ये राहायला आले. त्यांना आपल्याबद्दल खूप अभिमान होता. रोज संध्याकाळी ते कॉलनीतल्या पार्क मध्ये फिरायला यायचे. पण तिथे असलेल्या कोणालाही काही बोलायचे नाही. कोणाकडे पहायचे ही नाही. आपल्याच तोऱ्यात ते फिरत असत. त्यांना वाटायचं हे लोक आपल्या लेव्हलचे नाहीत. एक दिवस फिरता फिरता ते एका बाकावर येऊन बसले' थोड्या वेळानं एक म्हातारा येऊन त्यांच्या शेजारी बसला व त्यांच्याशी गप्पा करू लागला. पण कमिश्नर साहेबांनी त्याच्याकडे अजिबात लक्ष दिलं नाही. ते त्याच्याशी आपल्याच बद्दल बोलू लागले. आपण कोणत्या पदावर होतो, आपली प्रतिष्ठा काय आहे, आपण किती मोठे आहोत हे त्या म्हाताऱ्याला सांगायला लागले. 'मी इथे राहतो कारण हे माझं स्वत:च घर आहे.' असं

त्यांनी सांगीतलं. असं काही दिवस चाललं. म्हातारा शांतपणे ऐकत राहिला.

शेवटी एक दिवस त्या म्हाताऱ्याने बोलायला सुरवात केली; "ऐका कमिशनर साहेब, विजेचा बल्ब असातो ना, तो जोपर्यंत पेटतो तो पर्यंत त्याचं महत्व. पण एकदा का फ्यूज झाला की मग तो 10 वॅटचा असो की 20,40,100 वॅट चा असो, काही फरक पडत नाही. दिसायला तो बल्बच असतो पण प्रकाश देत नाही. साहेब, मी इथे पाच वर्षापासून राहतो, पण मी आजवर कोणालाही सांगीतलं नाही की मी दोन वेळेला संसद सदस्य होतो. " हे ऐकल्यावर कमिश्नर साहेबांच्या चेहऱ्यावरील रंग बदलला. म्हातारा पुढे म्हणाला-

" तुमच्या उजव्या बाजूला जे शर्मा बसले आहेत न, ते रेल्वेमध्ये जनरल मॅनेजर होते. ते समोर हसत हसत बोलणारे सक्सेना साहेब, ते मिलिटरी मध्ये मेजर होते. पांढऱ्या कपाड्यात बसले आहेत ते पांडे साहेब, इस्रो मधून एका मोठ्या पदावरून रिटायर झाले आहेत. पण त्यांनी ही कधी कोणाला हे सांगीतलं नाही. मला एवढंच सांगायचं आहे की इथे असलेले हे सर्व लोक मोठमोठ्या पदावरून आलेले आहेत. पण आज सगळे सारखेच आहेत. मी तुम्हाला आधीच सांगितल्या प्रमाणे सगळे फ्यूज झालेले बल्ब एकाच गटात येतात. कोणताही बल्ब, झीरो वाटचा असो की 10, 20, 60, 100 वाटचा असो, पेटतो तो पर्यंत महत्वाचा असतो. एकदा का बंद झाला की मग एलईडी असो. की सीएफएल हॅलोजन असो, सगळे सारखेच.

आम्ही सगळे ईथे बसलेले, तुमच्या सकट, फ्यूज झालेले बल्ब आहोत. पॉवर गेली की पोलिस कमिश्नर आणि पोलिस कॉंनस्टेबल मध्ये

फरक असत नाही. उगवता सूर्य आणि मावळता सूर्य दोन्ही सुंदरच असतात. पण लोक नमस्कार फक्त उगवत्या सूर्यालाच करतात. मावळत्याला कोणी विचारात नाही. हे वास्तव आपण मान्य केलंच पाहिजे. आपण जे पद, प्रतिष्ठा, सत्ता, यामध्ये जगत असतो, ती, आपली ओळख नसते. ती काही काळापुरती असते. आणि जर आपण त्यालाच आयुष्य समजत असू तर लक्षात घेतलं पाहिजे की एक दिवस हे सगळं संपणार आहे."

बुध्दीबळाच्या डावात राजा, राणी, उंट, घोडा, प्यादं हयांचं महत्व खेळ संपेपर्यंतच असतं. एकदा खेळ संपला की सगळे एकाच पेटीत जातात. डबा बंद. आजचा दिवस चांगला आहे त्याचा आनंद घ्या. उद्याचाही असाच असो ह्यासाठी ईश्वराची प्रार्थना करा. आणि कमिश्नर साहेब, आयुष्यात कितीही मेडल्स, पुरस्कार, सर्टिफिकेट्स मिळाली तरी शेवटचं प्रमाणपत्र सर्वांचं सारखं च असणार आहे. 'मृत्यूच प्रमाणपत्र.'

बनवाबनवी

एका गावात दामोदर अगरवाल नावाचे एक श्रीमंत व्यापारी राहत होते. त्यांच्या घरात सर्व गोष्टींची रेलचेल होती. त्यांना दोन मुली व नंतर उशिरा झालेला एक मुलगा होता. दोन्ही मुलींना त्यांनी चांगलं शिक्षण दिलं. आता मुलगाही शाळेत जायला लागला होता. मुली दिसायला चांगल्या होत्या. फक्त मोठ्या मुलीच्या एका डोळ्यात थोडा दोष होता. ती थोडी चकणी पहाते असं वाटायचं. मुली आता उपवर झाल्या होत्या. मोठ्या मुलीसाठी अगरवाल सेठचं वर शोधणं सुरू झालं. त्यांनी बऱ्याच वर आणि वराच्या माता-पित्यांना मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम केला, ते लग्न ही अतिशय थाटात करतील हे ही सर्वांना माहीत होतं. तरीही आता पर्यंत त्यांना नकारचं मिळत गेला. मुलीच्या डोळ्यात दोष आहे त्यामुळे मुलगी पसंत नाही असं कळायचं. त्यामुळे ते आणि घरचे लोकही हवालदिल झाले. सर्व सुबत्ता असून, भरपूर हुंडा द्यायला तयार असून ही, लग्न जुळेना. आपल्या जवळच्या मित्रांना ते आपली काळजी बोलून दाखवत.

शेवटी त्यांच्या एका मैत्रानं त्यांना एक सल्ला दिला. तो मित्र म्हणाला. " तुझ्या दोन्ही मुली जवळपास सारख्याच दिसतात. वयाने, अंगकाठीने आणि बरेचशा चेहऱ्याने ही. तेव्हा तू आता असं कर, जी पार्टी मुलीला

पाह्यला येतील त्यांना तू धाकटीलाच दाखव. आणि लग्नाच्यावेळी आपण मोठीला बसवून तिचं लग्न लाऊन देऊ. लग्नाच्या वेळी थोडा घुंगट जास्त समोर घेतला की कोणाच्याही लक्षात येणार नाही." दामोदरसेठ त्याच्यावर चिडलेच. म्हणाले 'पुढे लग्नानंतर लक्षात येणारच. मग बोंबलावं लागेल." मित्र म्हणाला 'एकदा लग्न झालं की काही ही होणार नाही. तू एवढा हुंडा देतो आहेस, शिवाय तशी मुलगी दिसायला ही चांगलीच आहे. काही होणार नाही. हळू हळू सगळं सुरळीत होईल. घरातल्यांना आणि दोन्ही मुलींना सांगून त्यांना आधीच विश्वासात घे.' शेवटी दामोदर तयार झाले.

ठरल्याप्रमाणे नंतर जी मंडळी मुलगी पाह्यला आली तेव्हा धाकटीलाच दाखवण्यात आलं. मुलगी सर्वांना पसंत पडली. लग्नाचा मुहूर्त ही निघाला. दामोदरजी ने भरपूर हुंडा दिला. ठरल्या मुहूर्तावर थाटात लग्न झालं. योजनेप्रमाणे सर्व पार पडलं. आता बिदाई म्हणजे बोळवणीची वेळ आली. प्रघाता प्रमाणे नवरी एकेक नातेवाईकाला भेटून, गळा पडून रडत होती. हे सर्व नवऱ्यामुलीचा सात-आठ वर्षाचा भाऊ पाहत होता. तो आपल्या वडिलांचं बोट धरून त्यांच्या बरोबर होता. आपल्या ताईला असं रडतांना पाहून त्यानं आपल्या वडिलांना विचारलं 'पापा, दीदी क्युं रो रही है?' दामोदर म्हणाले 'अरे बेटा वो अब अपने घर को जा रही है. ऊसकी शादी हुयी है.' तो मुलगा म्हणाला 'पापा जीजाजी(नवरदेव) की भी तो शादी हुयी है, फिर वो क्युं नही रो रहे?' त्याचे बाबा चूप राहिले. त्यांनी काहीच उत्तर दिलं नाही म्हणून त्या छोट्या पोरानं परत तोच प्रश्न विचारला. त्यानं दोन तीनदा तोच प्रश्न विचारला, तेव्हा दामोदर सेठ म्हणाले, 'वो(जीजाजी) अब अपने घर को जा कर रोएंगे.'

a

बिन पुस्तकाचं वाचनालय

एका खेड्यात गावाच्या बाहेर, रस्त्याच्या कडेला एक छोटीसी, शाळेच्या एका मोठ्या खोली सारखी दिसणारी लाकडांची खोली होती. तिच्या अंगणात एक मोठं कडूलिंबाचं झाड होतं. त्या झाडाची दाट सावली खोलीवर व अंगणात पडत होती. उघड्या खिडक्यातून पाहीलं तर आत चार पाच लकडी बेंच असलेले दिसायाचे. समोर एका कोपऱ्यात ठळक अक्षरात 'वाचनालय' असा बोर्ड लावलेला होता. पण आत काही आलमाऱ्या किंवा रॅक्स किंवा पुस्तकं, नोटिस बोर्ड किंवा काही पोस्टर्स काहीच नव्हतं. बाहेर एका लाकडी खुर्चीवर एक माणूस बसलेला असायचा. जणू काही त्या लायब्ररी चा तो लायब्ररीयन होता. लोक तो बोर्ड पाहून गोंधळात पडायचे. बरेच वेळा खेळता खेळता मुले तिथे यायची. मुलं आत डोकावून पाह्यची आणि तोंड वेंगाडून म्हणायची हे पुस्तक नसलेलं वाचनालय काय कामाचं? तो माणूस त्यांच्याकडे बघून फक्त हसायचा.

एक दिवस आर्णव नावाचा एक मुलगा भटकत भटकत ह्या लायब्ररीपाशी आला. त्याचे आई-बाबा काही दिवसांपूर्वीच ह्या खेड्यात राहायला आले होते. आर्णवला सगळंच अनोळखी होतं. इथे जुनी शाळा

नाही, मित्र नाही. त्या दिवशी, ह्या खेड्याच्या अनोळखी गोंगाटापासून दूर जावं म्हणून तो ह्या वाचनालयापर्यन्त पोहचला. 'वाचनालय' हा बोर्ड पाहून त्यानं कुतुहलानं आत डोकावून पाहीलं. त्या म्हाताऱ्या माणसानं कुतुहलाने पाहणाऱ्या आर्णव कडे पाहून विचारलं,' काय, पुस्तकं शोधतोय न?'

आर्णव म्हणाला 'इथे तर एकही पुस्तक नाही.' 'हो, कारण हे वेगळ्याप्रकारचं वाचनालय आहे.'म्हातारा म्हणाला. 'मग इथे तुम्ही काय ठेवता?' आर्णवनं विचारलं. 'गोष्टी' तो म्हातारा पुढे म्हणाला॰ 'पण जशा कागदावर लिहलेल्या गोष्टी असतात तशा नाही. अशा गोष्टी ज्या, लोक आपल्या बरोबर घेऊन येतात.' आधी तो म्हातारा काय म्हणतो आहे हे आर्णवच्या लक्षात आलं नाही. पण तो दुसऱ्या दिवशी आणि पुढेही तिथे येत राहिला. त्याच्या ध्यानात आलं की दरवेळी त्या लिंबाच्या झाडाखाली वेगवेगळी माणसं बसलेली असतात. एक थकलेला शेतकरी, तर एक चेहऱ्यावर स्मित असलेली बाई तर कधी त्यांच्या बरोबर खाली पाहत बसलेला एक माणूस. जणू काही तो हरवलेलं काही शोधतो आहे असा. कधी ते सर्व शांत बसलेले असायचे तर कधी कधी बोलू लागायचे. आणि मग जेव्हा एक बोलायचा तेव्हा बाकी सगळे त्याचं ऐकायचे. एक दिवस शेतकरी म्हणाला 'मी ह्या पावसाचा नेहमी राग धरायचो. तो आला की माझ्या सगळ्या पिकांची नासाडी व्हायची. पण एक वर्षी पाऊस आलाच नाही आणि मग मला कळलं की त्याच येणं किती आवश्यक आहे. पाऊस तर आपलं जीवन आहे.'

आर्णव ते ऐकत होता. त्याला वाटलं की एका वर्षी पावसाचं न येणं ही किती महत्वाचं आहे. दुसऱ्या दिवशी एक बाई म्हणाली 'बऱ्याच

वर्षापूर्वी माझा नवरा वारला. मला खूप वाईट वाटलं. वाटलं आता आपलं जीवनच संपलं. पण नंतर मी हळू हळू दुसऱ्यांची छोटी छोटी कामं करून त्यांना मदत करू लागले. आणि माझ्या मनाला शांती मिळाली, मला धीर आला.' काही वेळा कोणीच काही बोलायचं नाही. सर्वजण शांत बसून असायचे. पण ती शांतताही बरंच काही सांगून जायची. लोकांना हलकं झाल्यासारखं वाटायचं. असेच बरेच दिवस, बरेच आठवडे गेले. आता आर्णव तिथे बसणाऱ्यांच्या गप्पा मनलाऊन ऐकू लागला. एके दिवशी त्या म्हाताऱ्याने त्याला विचारलं 'काय शिकला तू इतके दिवस?' आर्णवनं थोडावेळ विचार केला आणि मग तो म्हणाला 'प्रत्येकाजवळ सांगण्यासारखं काही तरी असतंच. '' आणि? " 'आणि ते कोणाला तरी सांगीतलं की हलकं झाल्यासारखं वाटतं.' तो म्हातारा माणूस हसला.

एक दिवस आर्णव आलाच नाही. दुसऱ्याही दिवशी आला नाही. आणि ज्या दिवशी तो आला त्या दिवशी त्याचे डोळे भारी झालेले त्या म्हाताऱ्याला दिसले. तो काहीतरी विचारात आहे असं त्या म्हाताऱ्याला वाटलं व तो म्हणाला, 'आज तुला एखादी गोष्ट हवी आहे का?' आर्णव म्हणाला 'नाही आज मलाच काही सांगायचं आहे. तो म्हातारा काहीच म्हणाला नाही त्याने तिथे बसलेल्या इतरांकडे नजर टाकली. आर्णव त्या लिंबाच्या झाडाखाली बसला आणि थोडा वेळानं सांगू लागला. 'माझ्या पूर्वीच्या शाळेत माझा एक जवळचा, घनिष्ट मित्र होता. प्रत्येक गोष्ट आम्ही दोघं एकत्रच करायचो. जेव्हा आम्ही ते गाव सोडलं तेव्हा मला वाटलं आमची ही गाढ मैत्री अशीच राहील. पण हळू हळू त्याने मला फोन करणं बंद केलं. आताशा तर तो माझ्या पत्रांना उत्तर ही देत नाही. मला तर आता असं वाटायला लागलं आहे की मी त्याला हरवून बसलो आहे. आमची

मैत्री संपुष्टात आली आहे.' त्याचा गळा दाटून आला. मी आता पर्यंत हे कोणालाच सांगीतलं नव्हतं. वाटलं त्यात काय आहे सांगण्यासारखं? पण नाही मी हे सांगायलाच हवं होतं कोणाला तरी. 'सगळे स्तब्ध झाले. तो ही. थोड्या वेळानं तो शेतकरी म्हणाला 'काही दु:खान्ना आवाज नसतो पण तरी ती बोचत असतात.' ती बाई म्हणाली ' आणि हृदया हृदयात पडलेलं हे अंतर मैलात मोजता येत नाही,' आर्णवनं वर पाहीलं. 'आपण एकटे नाही आहोत. आपलं दु:खं ऐकणारं ही कोणी आहे' ह्याची त्याला जाणीव झाली.

त्या संध्याकाळी आर्णव त्या म्हाताऱ्याला म्हणाला ह्या वाचनालयात पुस्तके नाहीत, पण तशी बरीच आहेत. तो म्हातारा म्हणाला, 'इथे येणारा प्रत्येक माणूस आपल्या बरोबर एक गोष्ट घेऊन येतो. एक किस्सा घेऊन येतो. काही गंभीर असतात. काही हळवे असतात. तर काही आशा जागवणाऱ्या गोष्टी असतात. पण त्या प्रत्येक गोष्टीपासून काहीतरी शिकण्यासारखं असतं॰. आणि जेव्हा ते इथून जातात तेव्हा आपलं ओझं हलकं करून, ते थोडे हलक्या मनाने जातात. थोडं शहाणपण शिकून जातात.

अनेक वर्षांनंतरही गावाबाहेर ते बिन पुस्तकाच वाचनालय, तो बोर्ड अजूनही तसाच आहे.

संताबाई

एका 5000 लोक वस्तीच्या खेड्यात एका मध्यम वर्गीय शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. आम्ही सात भावंड होतो. चार भाऊ आणि तीन बहिणी. आमचे अविवाहित काकाही आमच्या बरोबरच राहायचे. काही कारणानं त्यांचं ठरलेलं लग्न मोडलं आणि त्यांनी त्यानंतर लग्न न करण्याचा ठाम निर्णय माझ्या आई-बाबांना सांगीतला. आमचं एक छोटं किरण्याचं दुकान होतं. काका ते चालवायचे. रात्री ते बऱ्याच वेळा तिथेच झोपायचे. मला वाटतं माझ्या जन्माच्या आधीपासूनच संताबाई नावाची एक म्हातारी आमच्या घरी राहायची. त्याच्या ही काही वर्षे आधी ती कुठून तरी आमच्या गावात आली होती. आली तेव्हा ती आमच्या घरापासून जवळच असलेल्या एका धर्मशाळेत रहायची. माझी आई आधी आधी आमच्या बरोबर, संताबाई साठी कधी चहा तर कधी भाजी भाकर पाठवायची. मग काही दिवसाने ती आमच्या घरी येऊन, घर सारवण्याला, कधी भांडे घासायला मदत करू लागली. काम नसलं की ती मण्याची माळ हातात घेऊन जप करीत असे. ती रोज सकाळी सूर्याला नमस्कार करून अर्ध्य द्यायची. तुळसीला पाणी द्यायची. जेवाणापूर्वी गायीसाठी घास काढून ठेवायची. हळू हळू थंडीचे दिवस आले आणि आईने तिला पांघरायला जुनी गोदडी, अंथरायला एक जुनी जाड सतरंजी दिली. पुढे

पुढे तर ती आमच्या घरीच राहू लागली. घरच्या बाहेर एक, वर पत्रे ठोकलेला ओटा होता. तिथेच तिचा संसार. बसणं, उठणं, रात्री झोपण सर्व त्या ओट्यावरच असायचं. जेवतांना बहुदा आई तिला बरोबर घेऊनच बसायची. आम्ही संध्याकाळच्या वेळी तिच्या जवळ ओट्यावर बसायचो. ती आम्हा सर्व भावंडांना खूप जीव लावायची. माझा धाकटा भाऊ तर तिच्याशी खूप मस्ती करत असे. त्याच्यावर तिचा खूप जीव होता. ती छान छान गोष्टी सांगायची. विशेषेकरून भागवतातल्या गोष्टी ती नेहमी सांगायची. गावात वर्षातून एकदा तरी 8-10 दिवस भागवत कथा असायची. ती नियमाने ही कथा सर्व दिवस ऐकायची. मग आम्ही तिला आज काय झालं भागवत कथेत हे तिला विचारायचो. आणि रात्री ती आम्हाला खूप मन लाऊन ते सांगायची. ती अशिक्षितच होती. पण नावाप्रमाणे संत होती. तिने गाडगेबाबा, शंकरबाबा ह्यांची कीर्तनं तसेच तुकड्यादास महाराजांची भजनं ऐकलेली होती. त्या कीर्तनातल्या बऱ्याच गमती जमाती ती आम्हाला सांगायची.

तुकाराम महाराज, नामदेव महाराज, जनाबाई आदिचे अनेक अभंग तिला पाठ होते. दरवर्षी ती बाळाभाऊंच्या पालखी बरोबर, आषाढी एकादशीला पायी पंढरपूरला जायची. खरं म्हणजे ती आमच्या आईपेक्षा बऱ्याच वर्षाने मोठी होती. तिला धड चलता ही येत नसे. पण दर वारीला पंढरीला जायचा आपला नियम तिने मोडू दिला नाही. ती पालखी बरोबर ज्या दिवशी निघायची त्याच्या आधी आई तिची सर्व तयारी करून द्यायची. दोन लुगडी, अंथरायला पांघरयला, थोडासा फराळ असं सर्व तिच्या बरोबर आई द्यायची. तिची पंढरपूरची वारी संपून ती केव्हा एकदा घरी येते ह्याची आम्ही सर्व भावंडं आणि आईही वाट पहायचो. ती परत आली की

मग 8-10 दिवस तिथे काय काय झालं ते आम्हाला रंगवून सांगायची. आमच्या घरची ती जणू एक सदस्यच झाली होती. ती आली की मग चार सहा दिवस मी, माझा धाकटा भाऊ तिचे पाय चेपून द्यायचो. कधी तिच्या तळपायांना खोबऱ्याचं तेल चोळून द्यायचो. ती अतिशय मायेनं आमच्या तोंडावर हात फिरवायची. आमचाही तिच्यावर खूप जीव जडाला होता. आमच्या कुटुंबाचं ती एक अविभाज्य अंग झाली होती.

एका आषाढी साठी, बाळाभाऊंची पालखी नेहमी प्रमाणे आमच्या गावी मुक्कामाला आली. संताबाईची प्रकृती थोडी बरी नसल्याने आम्ही सर्व तिला म्हणालो, 'ह्या वर्षी नको जाऊ पालखीबरोबर.' पण तिनं हट्ट सोडला नाही. 'अरे, विठोबा पाहिल सगळं. तो मला काही ही होऊ देणार नाही.' ती म्हणाली. शेवटी नेहमी प्रमाणे आईनं तिची तयारी करून दिली. आणि ती पालखी बरोबर गेलीच. आषाढी पौर्णिमेच्या दरम्यान पालखीचे लोक परत यायचे. ह्या वेळी पौर्णिमा होऊन दोन तीन दिवस झाले तरी संताबाई परतली नाही. आम्ही सगळे काळजीत पडलो. आमच्या शेजारच्या खेड्यातून ही काही लोक पालखीबरोबर पंढरपूरला जायचे. माझ्या आईनं माझ्या मोठ्या भावाला चौकशीसाठी त्या खेड्याला पाठवलं. भाऊ गेला तेव्हा त्या गावातले दोन तीन लोक नुकतेच पंढरपूरहून आल्याच कळलं. भाऊनं त्यांच्या घरी जाऊन विचारलं तेव्हा ते लोक म्हणाले, 'बरं झालं बेटा तू आलास. आम्ही दुपारी तुमच्या कडे येऊन सांगणारच होतो संताबाई बद्दल. बेटा पांडूरंगाच्या कृपेनं आमचं एकादशीच दर्शन झालं. पण दुसऱ्या दिवशी चंद्रभागेत स्नानाला जातांना ती काठावरच घसरून पडली आणि तिचा श्वासच थांबला. आम्ही आणि पोलिसांनी मिळून तिचा अंत्यसंस्कार केला. ती गेली वैकुंठला.

a

माझ्या मोठ्या भावानं घरी येऊन सर्वांना ही बातमी सांगितली. आम्ही सर्व खूप हळहळलो. आई तर रडायलाच लागली. माझा लहान भाऊ खूप रडला. म्हणाला 'इथे मेली असती तर मीच तिला अग्नि दिला असता. मला आठवतं, आई जीवंत असे पर्यन्त दर आषाढी द्वादशीला ती संताबाईच्या नावानं एका ब्राम्हणीला जेऊ घालायची आणि एक खण ही द्यायची. अशी ही अबोल नाती.

आरसा

आटपाटनगर होतं. गावात कधी काही गोंधळ नाही. गडबड नाही. गाव अगदी शांत होतं. त्या गावात सर्वांच्या परिचयाचा राघव नावाचा एक प्रतिष्ठित माणूस राहयचा. नेहमी नीटनेटके कपडे नेसलेला राघव, सगळ्यांचा आवडता होता. त्याच्या बोलाला लोक मानायचे. त्याचं ते हलक हसणं सर्वांना आवडायचं. वर वर पाहता त्याच जीवन हे सुखी आणि परिपूर्ण होतं.

राघवच्या घरात एका कोपऱ्यात एक मोठा जुना आरसा होता. त्या आरस्याला एक जुनाट लाकडी फ्रेम होती. कुठे कुठे पॉलिश निघालेली ती फ्रेम होती. राघवच्या आजोबांनी त्याला तो आरसा दिला होता. आजोबा त्याला एकदा म्हणाले होते—'हा आरसा नेहमी खरं बोलतो. तुम्हाला जे हवं आहे ते तो तुम्हाला दाखवित नाही, तर जे तुम्हाला समजणं आवश्यक आहे, जे तुम्ही खरं म्हणजे पाहिलं पाहिजे, ते तो तुम्हाला दाखवतो.' ते ऐकून राघव नुसता हसला होता. पण पुढे मोठं झाल्यावर तो हसायचं थांबला.

एका संध्याकाळी आपल्या दिवसभरच्या मीटिंग्ज आणि निरर्थक चर्चा संपल्या नंतर राघव सहज त्या आरशा समोरं उभा राहिला. तो हाताने आपली गळ्यातली टाय ढिली करताना स्वत:कडे पाहू लागला आणि

आवक झाला. आरशातला तो माणूस दुसराच कोणी होता. राघवच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं. त्याचे डोळे थकलेले दिसत होते, अंग जड झाल्यासारखं वाटत होतं. जणू काही त्याच्या डोक्यावर कोणी ओझं ठेवलं आहे. त्यानं स्वत:ला सावरलं आणि नीट ताठ उभा राहिला. विश्वासाने आपल्या कडे पाहण्याचा प्रयत्न करू लागला. पण व्यर्थ. त्याची आरशातली प्रतिमा होती तशीच होती. मरगळलेली. तो अस्वस्थ झाला. 'हे काय चाललंय?' त्याच्या तोंडून शब्द निघाले. आणि पहिल्यांदा आरसा बोलला.'अरे तो तूच आहेस.' "कोण बोललं हे?" राघव म्हणाला." 'मी बोललो', आरसा म्हणाला. 'गेली अनेक वर्षे तू स्वत:ला पाहतो आहेस, पण तू स्वत:ला खरं पाहिलंच नाही. ओळखलंच नाहीस.'हा नुसता पागलपणा आहे. आरसा का कुठे बोलत असतो का?' नकारार्थी मान हलवत राघव बोलला 'ज्यांना खरं ऐकायचंच नाही त्यांच्या साठी हा पागलपणाच आहे' आरशातून आवाज आला. त्या संध्याकाळ पासून राघव दर संध्याकाळी आरशासमोर उभा राहू लागला. मजबूरीने आणि थोड्याशा भीतीने, पण तो आरसा पाहू लागला. आणि प्रत्येक वेळी आरसा त्याला नको असलेलं दाखवू लागला. एका रात्री त्यानं पाहिलं की तो आपल्या वडिलांशी तावातावाने व उध्दटपणे बोलत आहे; बापाने सांगीतलेलं काही एक मान्य न करता. तो आरशाकडे बघून म्हणाला 'मला तर असं काही बोलल्याचं आठवत नाही.' आरसा बोलला 'तुझीस्मरण शक्ति तुझ्यासाठी काम करते आहे. पण जे सत्य आहे ते लपत नाही. ते सामोरं येतंच'. आणखी एका रात्री राघव आरशासमोर उभा राहिला तेव्हा त्याला दिसलं की त्याच्या एका जवळच्या मित्राला त्याच्या मदतीची गरज होती पण 'आपण आता खूप व्यस्त आहोत' असं सांगून त्यानं त्या

मित्राला टाळलं. 'मला एक महत्वाचं काम होतं. 'राघव म्हणाला.' 'कुणासाठी महत्वाचं? तुझ्याच साठी न?' आरशातून आवाज आला. आणि मग ती रात्र आली. तो आरशासमोर उभा राहिला. आणखी काही न आवडणारं ऐकण्याच्या तयारीने. पण आरसा शांत होता. एक शब्द बोलला नाही. राघव ही स्तब्ध उभा. चेहऱ्यावर कुठलेही भाव नसलेला. पण उदास. रिकामे डोळे असलेला. 'का? का दिसतो आहे मी असा?' तो मोठयाने म्हणाला. आरसा मृदू आवाजात उत्तरला, 'कारण तू जसं जीवन घडवलं आहेस, तसं जीवन तू जगतो आहेस, जे दिसायला परिपूर्ण आहे, पण खऱ्या अर्थाने रिकामं आहे.' ते ऐकून राघव एकदम खालीच बसला; काहीही प्रत्युत्तर न देता.

असेच काही दिवस, काही आठवडे गेले. आणि काही तरी बदलत गेलं. राघव आता कान देऊन शांततेनं वडिलांचं बोललेलं ऐकायला लागला. आता तो त्या मित्राकडे आपुलकीने, जिव्हाळ्याने जायला लागला. तो कमी, पण अर्थपूर्ण बोलायला लागला. आणि प्रत्येक रात्री आरशासमोर उभे राहून स्वत:ला न्याहळायला लागला. एका संध्याकाळी त्याने आरशातल्या आपल्या प्रतिबिंबाकडे नजरेला नजर भिडवून पाहिलं. आता ही डोळ्यात त्याला थोडं रिकामं दिसलं पण डोळ्यात काही समाधान ही दिसलं. तो हसला. आरशातलं प्रतिबिंबही हसलं. 'मी बदललो आहे का?' त्याने आरशाला विचारलं. 'बदलाची सुरवात झाली आहे.' आरसा म्हणाला. 'Will I ever be perfect?' राघवने आरशाला विचारलं. 'Perfection is a mask, Truth is a journey.' आरसा उत्तरला. राघव ने मान डोलवली. पहिल्यांदा त्याला आता बोध झाला होता.

अनेक वर्षांनंतर जेव्हा राघव म्हातारा झाला, त्याचे केस पांढरे झाले, तेव्हाही तो आरसा त्या कोपऱ्यात तसाच उभा होता. एक दिवस राघव चा नातू त्या आरशा समोर उभा राहिला आणि म्हणाला 'आजोबा, हा मोडका जुना आरसा तुम्ही कशाला ठेवला आहे?'

'कारण, तो आरसा कधीच खोटं बोलत नाही. आणि खरं बोलणारा फक्त तोच एक आहे.' राघव म्हणाला. आपण दुसऱ्याला चांगलं दिसावं असं जीवन जगण्याचा आयुष्यभर प्रयत्न करत असतो, पण आपण जेव्हा प्रामाणिकपणे आपल्या आत डोकावून आपल्याला पाहतो, तेव्हाच खरं जगायला सुरू करत असतो.

रिकामी खुर्ची

एका शांत घराच्या बाल्कनी मध्ये, जिथे उगवत्या सूर्याचं ऊन चांगल्या प्रकारे येईल अशा ठिकाणी एक जुनी निम-आराम खुर्ची ठेवलेली होती जुनी असली तरी तिचं पॉलिश अजूनही चांगलं होतं. हात गुळगुळीत होते. फक्त खुर्चीची गादी थोडी जुनी झाल्यासारखी वाटत होती. जरी घरातलं कोणी कधी त्या खुर्चीत बसलेलं दिसलं नाही तरी ती खुर्ची मात्र आपल्या जागेवरच होती. ही खुर्ची घरातल्या आजोबांच्या ताब्यात होती, त्यांनी ती बरोबर आपल्या समोरच्या छोट्या टी टेबल च्या दुसऱ्या बाजूला ठेवली होती. ती खुर्ची त्यांच्या दिवंगत पत्नी म्हणजे आजीची होती. त्या ह्या खुर्चीत बसायच्या. रोज सकाळी सहा वाजता, हातात दोन चहाचे कप दादाजी घेऊन यायचे. एक आपल्यासाठी आणि एक आपल्या दिवंगत पत्नी साठी. दोन खुर्च्यांसामोर दोन कप ठेऊन झाले की आजोबा आतून वर्तमान पत्र घेऊन यायचे, आवाज न करता हळू हळू ते वर्तमान पत्र वाचत, चहा पित असायचे. समोरचा कप तसाच भरलेला असायचा, कधी कधी सकाळी त्यांचा नातू, अमोल बाल्कनीत. यायचा आणि त्या भरल्या कपाकडे पाहत आजोबांना विचारायचा 'आजोबा, हा कप तर तसाच भरून आहे अजून?' ते म्हणायचे 'अरे तुझी आजी फार हळू चहा पिते न,

म्हणून तो तसाच दिसतो.' नातावला काही कळायचं नाही. त्याला आजोबा कधी छान छान गोष्टी सांगायचे. कधी वर्तमान पत्रातली एखादी मजेशीर बातमी वाचून दाखवायचे.

काळ पुढे सरकत होता. अमोल ही आता शाळेत जायला लागला. एका सकाळी त्यानं पाहीलं तर खुर्ची रिकामी. आजोबा नाही की वर्तमानपत्र नाही. चहाचा कप नाही. कोणीतरी म्हणालं 'आजोबा देवाघरी गेले.' आता ती शांत बाल्कनी मोठी वाटायला लागली. त्या खुर्च्यांमधून आजोबांच्या खुर्चीला कोणी हात ही लावला नाही. ती तशीच पडून होती. रोज सकाळी अमोल चे बाबा त्या खुर्चीला धरून क्षणभर तिथं थांबायचे. आई खुर्चीला धक्का नं लावता आजूबाजूने झाडून घ्यायची. आता ती खुर्ची नसून एक आठवण, एक अस्तित्व, झालं होतं.

एक दिवस शाळेत शिक्षकांनी अमोलला दाटलं. त्याच्या मित्रांनी ही त्याला चिडवलं, खूप त्रास दिला, घरी आल्यावर त्याचं मन लागेना. रात्री त्याला धड झोपही लागली नाही. सकाळीच उठून तो बाल्कनी त गेला. सूर्याच कोवळं ऊन त्या खुर्चीवर पडलं होत. क्षणेक तो त्या खुर्ची जवळ उभा राहिला. त्याला आवाज आला, 'मला सांग काय झालं ते.' आजोबा नेहमी म्हणायचे तसा तो आवाज त्याला वाटला. अमोल ने काल जे झालं ते सर्व सांगीतलं. काही उत्तर आलं नाही, पण अमोलला हलकं, हलकं वाटायला लागलं. त्याला वाटलं आपण एकटे नाही आहोत.

दुसऱ्या दिवशी अमोलच्या बाबांनी पाहीलं की अमोल आजोबांच्या खुर्चीत बसला आहे व हातात वर्तमानपत्र उलटं धरून वाचतो आहे. त्यांना अनायसे हसू आलं. त्यांनी विचारलं, 'अमोल काही समजतंय का?' 'नाही. पण समजेल हळू हळू'. अमोल म्हणाला. त्याचे बाबा पहिल्यांदा

त्याच्या मागे बसले' वर्तमानपत्राचं दुसरं पान काढून तेही वाचू लागले. असेच दिवस जात होते. पण आता त्या खुर्चीकडे सर्वांचं लक्ष असायचं. अमोलला काही विचार करायचा असला की तो खुर्चीत येऊन बसे. तर कधी दिवसभरच्या कामानंतर बाबा त्या खुर्चीत डोळे मिटून शांत बसायचे. कधी दुपारच्या वेळी आपली सर्व कामं आटोपल्यावर आई ही त्या खुर्चीत बसून आपलं विणकाम करायची. कधी कधी काही आठवून ती स्वत:शीच हसायची. कोणीही त्या खुर्चीवर हक्क बजावत नव्हता, तरी ही खुर्ची आता कधीही रिकामी दिसायची नाही.

काही वर्षांनंतर जेव्हा अमोल म्हातारा झाला, तेव्हा तो ज्या गावी नोकरी करत होता तिथून एकदा आपल्या गावच्या घरी परत आला. घराला आता रंगरंगोटी केलेली होती. बराच बदल दिसत होता. घरातलं फर्निचर ही बदललं होतं. पण ती खुर्ची मात्र तशीच होती. आपल्या जागेवर. अमोल त्या खुर्ची जवळ गेला. खुर्चीत बसला. ह्या वेळी त्याला कळलं होत की ही खुर्ची केवळ आजोबांची बसण्याची खुर्ची नव्हती, तर तिच्या मागे आजोबांच्या अनेक आठवणी होत्या. त्यांचं ते शांतपणे सर्वांचं ऐकणं, हलकसं हसणं. नंतर शहाणपणाच्या गोष्टी मृदू शब्दात सांगणं आणि आणखीही अनेक आठवणी. खुर्चीवर बसल्या बसल्या अमोल ने डोळे मिटले. त्याला वाटलं तो एकटा नाही आहे. कोणी तरी त्याच्या आसपास आहे. खरंच आहे काही लोक जातात, पण ते आपल्या बसण्याच्या जागी, वावरण्याच्या जागी अनंत आठवणी सोडून जातात. खुर्ची दिसते तशी कधीच रिकामी नसते.

हरवलेला संवाद

नारायणराव जोशी यांचा घरातल्या मशीन्स वर भरवसाच नव्हता. त्यांना वाटायचं, हे घड्याळ सारखं धावतच राहतं. टेलिव्हीजन मोठयाने ओरडत असतो. आणि टेलिफोन्स? ते कधीच चूप नसतात. सारखे ओरडत असतात. म्हणून जेव्हा त्यांचा नातू-आरवने त्यांना त्यांच्यासाठी स्मार्ट फोन आणून दिला तेव्हा त्यांनी तो असा हातात धरला की एखादा घाणेरडा रुमाल कोणी त्यांच्या हाती दिला आहे. आरव म्हणाला 'आजोबा आता हा फोन तुमचचा मित्र आहे तो तुमचं जगणं सोपं करून टाकेल.' अरे जीवन इतके सोपं असण्यासारखं असतं तर मग काही विचारायलाच नको.' ते म्हणाले.

त्या दिवशी नारायणरावांना फोन आला आणि त्यांनी त्याची मागची बाजू कानाला लाऊन ऐकण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या दिवशी फोन आला तेव्हा तो उचण्यापूर्वीच ते जोराने ओरडले 'हॅलो'. तिसऱ्या दिवशी त्यांना मोबाईलवरच्या व्हाईस असिस्टंस चा शोध लागला. काळजीपूर्वक ते म्हणाले हॅलो. 'मी ऐकते आहे' फोन उत्तरला. त्यांना अचंबाच वाटला. ते म्हणाले 'अरे, आरव ह्या फोनमध्ये कोणी बाई आहे.' हळू हळू ते आता फोन वापरू लागले. अनलॉक करण्याधीच ते म्हणायचे 'गुड मॉर्निंग' मग फोन ने हवामान सांगितलं की ते 'thank you' म्हणू लागले,

मग एक दिवस दुपारी आरवनं त्यांना मेसेज कसे करावे ते शिकवलं. 'तुम्ही मला केव्हा ही मेसेज करू शकता. मी कामात असलो तरी ही.' तो त्यांना म्हणाला. त्यांनी होकार अर्थी मान डोलावली. संध्याकाळी आरवला त्यांचे मेसेजेस आले. 'आय एम सिटिंग' मग एका मिनिटांनंतर 'नाऊ आय एम standing' नंतर काही मिनिटांनी 'बहुदा तुझ्या रोपट्यांना तहान लागली आहे.' ते मेसेजेस वाचून आरवला हसू आलं; असे रोज त्यांचे मेसेजेस सुरू होते. ' आज मी चहा केला. तो तुझ्या आजीने जसा बिघडवलेला चहा केला असता तसा झाला.' ' घर अगदी शांत आहे आज. अगदी पंख्याचा सुध्दा आवाज येत नाही आहे.

एका रात्री आरव कामावरून उशिरा आला. त्याला आजोबांचे तीन मेसेजेस दिसले.' मी तुझ्या आवडीचं वरण करून ठेवलंय. मी ते खाल्लं. आता ते थंड होईल तू येई पर्यंत'. आरव हळू हळू डायनिंग टेबलापाशी गेला. तिथे एक प्लेट धुऊन ठेवलेली दिसली. दुसऱ्या दिवशी सकाळी तो आजोबांजवळ बसला. 'आजोबा, तुम्ही प्रत्येक गोष्ट मला मेसेज करून सांगितली पाहिजे असं नाही.' 'मला ठाऊक आहे' आजोबा म्हणाले. 'मग का पाठवता?' आरव म्हणाला. नारायणराव आपल्या मोबाईल कडे पाहत म्हणाले; 'अरे तुझी आजी जीवंत होती तेव्हा ती आपल्या कामात असली तरी मी तिच्याशी बोलतच असायचो. About nothing. About everything. कधी आम्ही दोघं तासन्तास एकमेकांशी बोलायचो, तर कधी मी एकटाच बोलत असे. आता मी असं भिंतीशी बोलू लागलो तर लोक म्हणतील, ह्याला वेड लागलं आहे. म्हणून मी आता तुझ्याशी बोलतो. जरी तू नंतर वाचत असलास तरी; असं वाटतं कोणीतरी माझं बोलणं ऐकलं आहे. मला हलकं झाल्यासारखं वाटतं.'

a

एकदिवस दुपारी आरवला आजोबांचा मोठयाने हसण्याचा आवाज आला. आरव ने विचारलं 'कोण होतं ते, आजोबा?' 'माझा एक जुना मित्र. आम्ही जवळ जवळ 20 वर्षांनंतर एकमेकांशी बोललो.' आरव हसला. त्याने आजोबला नुसता मोबाईलच दिला नव्हता, तर त्याने आपल्या आजोबांना एक कनेक्शनच जणू दिलं होतं. त्यांचं हसू, त्यांना आपला हरवलेला संवाद दिला होता. आता ते मित्रांशी तासन्तास गप्पा मारू शकत होते. त्यांना समोरासमोर पाहू शकत होते. आजीच्या फोटोला समोर धरून तिच्याशी बोलून आपलं मन हलकं करू शकत होते. त्यांच्यासाठी ही फार मोलाची गिफ्ट होती.

न दिसणारा चांगुलपणा

त्या गावातल्या एका भागातलं ते मेडिकल स्टोअर होतं. त्या 'शर्मा मेडिकल स्टोअर' मध्ये ग्राहकांची बरीच वर्दळ असायची. दर गुरुवारी संध्याकाळी त्या दुकानाच्या काऊंटरवर कोणी तरी अज्ञात इसम एक पाकीट सोडून जायचा. त्याला कोणीच कधी पाहिलेलं नव्हतं. त्या पाकीटात अगदी जास्त नाही तर अगदी थोडे ही नाही असे पैसे असायचे, व त्याच्या बरोबर काही दोन तीन नावं लिहलेला एक कागद असायचा व प्रत्येक नावासमोर काही रक्कम लिहलेली असायची. आणि खाली एक नोट लिहलेली असायची- 'ह्यांच्या पेंडिंग मेडिसीन बिलासाठी.' पहिल्यांदा जेव्हा तो एव्हलप मिळाला तेव्हा मालक शर्माना वाटलं कोणीतरी विसरून गेलं असावं. दुसऱ्यांदा त्यांना वाटलं कोणी तरी हे दान दिलं आहे. दोन तीन महिन्यांनी शर्मांना वाटलं कोणीतरी भला माणूस हे मदतीच काम जाणून करतो आहे, त्यांनी कधीही कोणालाही हे सांगीतलं नाही. पण ते त्या आतल्या कागदावरच्या सूचना कटाक्षानं पाळायचे.

एकदा शांतबाई नावाची बाई आपल्या नवऱ्यासाठी नेहमीची डायबेटीसची औषधे घ्यायला आली. ती म्हणाली 'शर्माजी आज पुरेसे पैसे नाही माझ्याजवळ. शर्मांनी रजिस्टरमधून तिचं पान काढलं आणि पाहिलं तेव्हा ते म्हणाले तुमचे सर्व पैसे, आजचे धरून, आधीच कोणी दिलेले

आहे. नंतर एक दिवस समोरचा ऑटो रिक्शा चालवणारा आला. त्याच्या जवळ मुलाच्या साठी लागणाऱ्या अँटीबायोटिक्स साठी पुरेसे पैसे नव्हते, तेव्हा शर्मा म्हणाले 'अरे ते कोणीतरी आधीच देऊन टाकलेले आहे.' लोकांना वाटलं, ही तर देवाचीच कृपा होते आहे. कोणी म्हणालं हा तर चमत्कारच आहे. पण शर्मांना मात्र ठाऊक होतं की कोणीतरी ग्राहकांचं बोलणं ऐकतो आहे॰ त्यांच्या कडे लक्ष देतो आहे.

शर्माच्या दुकानासामोरच, रस्त्याच्या त्या बाजूला एका शिंप्याच्या दुकानावरच्या एका लहान खोलीत माधव राहायचा. तो एक तीसेक वर्षाचा अगदी साधा सुधा माणूस होता. एका ट्रान्सपोर्ट ऑफिस मध्ये तो कारकून होता. साधं जीवन होतं त्याचं. रोज तेच रुटीन असायचं. राहणी ही साधीच. तीच जुनाट शबनम पिशवी, तेच रोजचं साध जेवण. कधी कधी तर पैसे वाचविण्यासाठी तो रात्री जेवायचा सुध्दा नाही. बरेच वेळा त्याच्या ऑफिसला तो बसने न जाता पायी चालत जायचा. पण हे कोणाच्याच लक्षात आलेल नव्हतं. इतरांना मदत करायला तो अशाप्रकारे पैसे वाचवायचा. शर्मांच्या दुकानाकडे तो नेहमी चक्कर मारायचा त्यामुळे कोणाची काय अडचण आहे ते त्याला ऐकता, पाहता यायचं. मग तो दर गुरुवारी त्याच्या डायरीतलं एक पान फाडून त्याच्यावर यादी लिहायचा—

शांतबाई----------480

इमरान रीक्षेवला----------250

एक म्हातारा काप भरलेला-------220 या सर्वांना तो व्यक्तिगत ओळखत नव्हता. फक्त चेहरे त्याला ठाऊक होते. ह्या लोकांचं बोलणं, संभाषण तो दुकाना जवळ ऐकायचा, एवढंच. औषध घेण्यापूर्वी कोण आपल्या जवळचे पैसे दोनदा मोजून पाहतो आहे ह्या कडे त्याचे लक्ष

असायचे. बस, हे ही पुरेसं होतं त्याला. तो मग ते पैसे, ती नावांची यादी पाकिटात टाकून ते पाकीट बंद करायचा आणि कोणाच्याही लक्षात येणार नाही अशा तर्हेनं शर्मांच्या काऊंटरवर ते, दर गुरुवारी सूर्यास्तानंतर सोडून यायचा. आपण केलेल्या मदतीचा त्याला गवगवा नको होता. मदत सहजतेनं पोहचावी बस हाच त्याचा उद्देश असे.

आणि हळू हळू तिथे बदल होऊ लागला. ह्या चांगुलपणाची लागण तिथे होऊ लागली. नेहमी ओढाताणीत असणारी शांतबाई आता कुत्र्यासाठी किंवा देवळाजवळ बसलेल्या म्हाताऱ्यासाठी एक भाकर आणू लागली. रीक्षेवाला आता शाळेतल्या मुलांकडून, पावसाच्या दिवशी, भाडे न घेता त्यांना मोफत शाळेत सोडू लागला. शर्मा स्वत: ग्राहकांच्या बिलावर डिसकाऊंट देवू लागला. अशी झाली लागण, पण ती माधव शिवाय कोणालाच कळली नाही'

हिवाळ्यात एका संध्याकाळी माधवच आजारी पडला. आधी खोकला, कफ, ताप आणि नंतर अशक्तपाणा. त्यांनी पैसे खर्च होतील म्हणून स्वतं:साठी औषध आणलं नाही. ते आपल्या नेहमीच्या कामासाठी त्याने जपून ठेवले. पण शरीर साथ देईना. एक दिवस तर तो आपल्या खोलीच्या समोर पडला. त्याची शुध्द हरवली. त्याने जेव्हा डोळे उघडून पाहिले तेव्हा तो दवाखान्यात एका पलंगावर होता. त्याला आश्चर्य वाटलं. 'तू आता जागा झालास. तू बेशुध्द झाला होतास.' बाजूला उभ्या असलेल्या शर्मांचे शब्द त्याच्या कानी पडले. 'त्या चहाच्या टपरिवाल्याने तुला दवाखान्यात भरती केलं आणि मग आम्हाला सांगीतलं. तू आधीच तब्येत दाखवायची होती.' 'ते परवडण्या सारखे नव्हतं.' माधव म्हणाला. शर्माने काहीच न बोलता बाजूच्या टेबलवरची फाइल माधवच्या हातात

दिली. आत हॉस्पिटल ची आणि औषधाची बिल्स होती. आणि त्यावर पेड असा स्टॅम्प ही होता. माधव म्हणाला 'कोणी केलं हे सर्व?' ' ते पुरतं मलाही नाहीत नाही. मागच्या आठवड्यापासून काऊंटरवर पाकीट येण्याचं थांबलं आणि मग सर्वांच्या लक्षात आलं. सर्वांना हळहळ वाटली. आणि प्रत्येकजण मदतीसाठी पुढे आला. चहावाला, रिक्शा चालक, शांताबाई ह्यांच्या लक्षात आलं की तू त्यांच्या आजूबाजूला असायचा. मग त्यांनी मला सांगीतलं.' शर्मा म्हणाले. माधवने डोळे मिटून घेतले. त्या खोलीत शांतता पसरली. आता प्रत्येक जण काउंटरवर पाकीट सोडायला लागला होता.

"As one lamp lights another, nor gets less, so nobleness enkindleth nobleness."

प्लॅटफॉर्म क्रमांक चार वरचा बेंच

रोज संध्याकाळी सहा वाजता अरुण प्लॅटफॉर्म नंबर चारच्या त्या लाकडी बेंचवर येऊन बसायचा. तो कोणाचीही येण्याची वाट पाहत नसे॰ दिवसभरच्या त्याच्या कामाच्या आणि हालचालीच्या भाऊगर्दीतून थोडं वेगळं होऊन काही वेळ शांत बसण्यासाठी त्याने हे ठिकाण निवडलं होतं. आपल्या नेहमीच्या विचार गर्दीतून बाहेर पडायला त्यानं हे ठिकाण निवडलं होतं॰ इथे बसून जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांकडे तो पाहत राही आणि त्याला खरंच विरंगुळा मिळायचा. त्याच बेंच च्या एका काठावर ती बसलेली असायची. तीच नाव मीना होतं. उतारवयाला सुरवात झालेली, पांढऱ्या केसांचा बुचडा बांधलेली ती, बेंचच्या एका काठाशी बसलेली असायची. येणाऱ्या जाणाऱ्या ट्रेन्सकडे पाहत राहयची.

पहिले 3-4 दिवस अरुण तिच्याशी काही बोलला नाही. पाचव्या दिवशी अरुण ने आपली हातातली वही तिच्या पायाजवळ पाडली आणि ती उचलायला तो वाकला. तिनं थरथरत्या हातानं ती वही उचलून त्याच्या हातात दिली. ‘तुम्ही लिहता?’ तिने अरुणाला विचारलं. ‘हो; मधून मधून लिहतो’ अरुण म्हणाला. ‘चांगलं आहे. कोणाची साथ -सोबत नसली की शब्दांची साथ पुरी असते. दुसऱ्यादिवशी तो येतांना चहाचे दोन कप घेऊन आला. त्यानं तिच्या हातात कप देत म्हटलं, ‘तुम्ही चहा घेता की नाही मला

माहीत नाही, पण मी आणला. तुम्हाला आवडलं की नाही माहीत नाही.' 'आता ह्या वयात प्रामाणिकपणे कोणी काही ही दिलं तरी मला आवडत.' ती म्हणाली. अशी ही त्यांच्या संभाषणाची सुरवात झाली. ती गेल्या एक वर्षापासून प्लॅटफॉर्म नंबर तीनच्या त्या बेंचवर येऊन बसत असे. हळू हळू ती अरुणला हे सर्व सांगायला लागली. 'माझा मुलगा खूप प्रवास करायचा. तो नेहमी ह्याच प्लॅटफॉर्म वरून गाडी पकडायचा.' 'पकडायचा, म्हणजे----?' अरुण ने विचारलं. ती काही उत्तरली नाही. आपल्या जवळच्या डब्यातून एक लाडू काढून तिनं अरुणला दिला. तो हळूच हसला. पहिल्यांदा तिने अरुणला नीट पाहीलं. असेच दिवस चालले होते आणि हेच आता त्या दोघांचं रुटीन झालं होतं. अरुण यायचा, कधी त्राग्याने, कधी वैतागलेला. कधी थकलेला. मीना तिथे आधीच बसलेली असायची. मग ते छोट्या छोट्या गोष्टींवर बोलायचे. एक दिवस शेवटी अरुण ने तिला विचारलंच, 'तुम्ही रोज इथे का येता? तुम्ही मला कधीच सांगीतलं नाही.' ती थोडा वेळ स्तब्ध होती. नंतर म्हणाली, 'माझा मुलगा तीन वर्षापूर्वी ह्याच प्लॅटफॉर्म वरून गाडी त बसला. एका आठवड्यात परत येईन असं तो म्हणाला, पण आता तीन वर्ष झाली. आला नाही.' 'काही गडबड, अपघात वगैरे झाला का?.' अरुणने विचारलं 'नाही. काही पत्र नाही, निरोप नाही. शांत बसून फक्त वाट पहाणं.'

आता पर्यंत हळू हळू चालत असलेल्या पावसाचा जोर वाढला. मीना पुढे म्हणाली, 'मला वाटत होतं, जर खरंच तो परत आला आणि मी इथे दिसले नाही तर? त्याने मला शोधले तर ? एकदा का होईना?' अरुण काही बोलला नाही .त्या संध्याकाळी त्या पडत्या पावसात, पहिल्यांदाच अरुण मीनाच्या बरोबर तिच्या घरी गेला. घर लहानच होतं. अगदी

नीटनेटकं लावलेलं. भिंतीवर तिच्या तरुण मुलाचे अनेक फोटो लावलेले होते. थोड्या वेळाने तो जायला उठला तेव्हा ती म्हणाली, 'तू रोज मला सोडायला यायची काही आवशकता नाही' 'हो मला माहीत आहे ते. पण आता मला रोज यावंसं वाटतं.' असेच काही दिवस, काही आठवडे गेले. अरुण मध्ये आता थोडा बदल होत होता. तो आता रोज लक्षपूर्वक तिचं बोलणं ऐकू लागला. मीनाही आता कधी हलकसं हसायची तर एखाद वेळ जोरानं ही हसायची.

एका संध्याकाळी अरुण उशिरा आला. बेंच रिकामाच होता. त्याच्या मनात पाल चुकचुकली. त्यानं पाच मिनिट वाट पाहीली. नंतर दहा. ट्रेन्स येत होत्या, जात होत्या. ती मात्र आली नाही. दुसऱ्या दिवशी तो सरळ तिच्या घरीच गेला. दाराला कुलूप होतं. शेजाऱ्याने अरुणकडे पाहीलं आणि विचारलं 'मीनाबाईंना शोधताय काय?' 'हो मी त्यांना रोज स्टेशन वर भेटतो. काल त्या आल्या नाही म्हणून आज सरळ घरीच आलो.' अरुण म्हणाला. 'त्या काल सकाळीच वारल्या' शेजारी म्हणाला. अरुणला भरून आलं. 'गेले काही दिवस त्यांना बरं नव्हतं. पण त्यांनी कोणालाही सांगीतलं नाही. नेहमी म्हणायच्या की मला संध्याकाळी एका ठिकाणी जायचं असतं.' अरुण गलबलून गेला. 'मीनाबाईंनी हे पाकीट तुम्हाला द्यायला सांगीतलं.' शेजऱ्याने पाकीट पुढे करत म्हटलं. थरथरत्या हातानं अरुणनं ते पाकिट घेतलं आणि उघडून पाहीलं. आत एका छोट्याशा कागदावर लिहलं होतं—

' अरुण,

मला माहीत नाही की माझा मुलगा कधी परत येईल की नाही. पण ज्या दिवसापासून तू माझ्या बाजूला येऊन बसू लागला त्या दिवसापासून

मी त्याची वाट बघणं सोडून दिलं. मी एकटी नाही आहे, मी विस्मृतीत गेलेली नाही आहे, ह्याची मला तू जाणीव करून दिलीस. Thank you for coming back every day.'

मीना

हातात पत्र घेऊन अरुण बराच वेळ तसाच उभा राहिला. त्याला काही सुचेना. त्याच्या डोळ्यात पाणी आणि चेहऱ्यावर हलकं हसू आलं. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ठरल्या वेळी तो प्लॅटफॉर्म क्रमांक चार च्या त्या बेंच वर जाऊन आपल्या जागी बसला. आता तो कशाचीच वाट पाहत नव्हता. शून्यात पाहून काही आठवणीनं, परत त्याच्या मनात करुणा दाटून आली.

असं ही होऊ शकतं कधी

2008 च्या ऑगस्ट महिन्यात अमेरिकेतील फ्लोरिडा स्टेट मधील जॅक्सन व्हॅली येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधल्या सहा विषयांवर एक मोठी जागतिक कॉन्फरन्स होणार होती. त्या कॉन्फरन्स मधिल हीट ट्रान्सफर या विषयासाठी मी व माझ्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. केलेला डॉक्टर आशिश महल्ले, हा विद्यार्थी, दोघांनी मिळून एक शोधप्रबंध पाठवला होता. त्यांच्या स्क्रुटीनी कमिटीने तो पेपर स्वीकारला अन् आम्हाला तो प्रेझेंट करण्यासाठी अमेरिकेला बोलावलं. नेमका त्याच वेळी माझा मुलगा इन्फोसिसच्या एका प्रोजेक्टसाठी दोन वर्षासाठी शिकागोला गेलेला होता. त्याची बायको आणि मुलगाही बरोबर होता. मग मी विचार केला आणि तसा मी माझ्या बायकोला म्हणालो की कॉन्फरन्सचं ही आपलं काम होईल आणि मुलाकडे आपल्याला अमेरिकेला जाऊन दोन-तीन महिने राहता येईल. कॉन्फरन्स जॅक्सन व्हॅलिला पाच ते आठ ऑगस्ट 2008ला होती. आम्ही विचार केला की चला या निमित्तानं मुलाकडे राहू. आणि नातवालाही पाहता येईल. मग आम्ही एक जुलैलाच शिकागोला पोहोचलो. तिथे मुलांनं माझा प्रोग्राम ठरवून टाकला होता. त्यांनं आधीच कॉन्फरन्स ची रजिस्ट्रेशन फीस भरून ज्या हयात हॉटेलमध्ये कॉन्फरन्स

होणार होती त्याच हॉटेलमध्ये माझी रूमही बुक करून ठेवली होती. मग त्यांनं आमच्या सर्वांची म्हणजे मी सौभाग्यवती, ती दोघं आणि नातू ह्यांची एक ते चार ऑगस्ट या कालावधीसाठी ओरलांडो ची ट्रिप ठरवली. ओरलंडोला, डीस्नेवल्ड , युनिव्हर्सल स्टुडिओ,सी वर्ल्ड असं बरंच काही पाहण्यासारखं आहे. ओरलंडो हून 4 ऑगस्टला मी पुढे बसने जॅक्सन व्हेली ला जायचं(हे अंतर 140 मैला चं होतं) व बाकीच्यांनी शिकागोला परत यायचं असं ठरवलं. तसं त्यानं 8 ऑगस्टचं माझं जॅक्सन व्हँली ते शिकागो असं परतीचं विमानाचं तिकीटही करून ठेवलं. ती फ्लाइट संध्याकाळी सहाची होती. आणि शिकागोला दोन तासानं पोहोचणार होती. आमच्या ठरल्याप्रमाणे ओरलंडोला कार्यक्रम झाल्यावर मी बसनं संध्याकाळी पाच वाजता तिथून निघालो. बरोबर सव्वा सात वाजता जॅकसन व्हॅली ला पोहोचलो. बस स्टेशन पासून हयात हॉटेल जवळच होतं. पायीच चालत गेलो, कारण माझ्याजवळ स्ट्रोलरची चाकाची सूटकेस होती. बुकिंग अगोदरच होतं म्हणून लवकरच मला माझी रूम मिळाली. प्रचंड मोठं हॉटेल होतं ते. सतराव्या मजल्यावर मला रूम मिळाली. सुदैवानं त्या सतराव्या मजल्यावर आणि सोळाव्या मजल्यावरच सहा मोठ्या हॉलमध्ये आमची कॉन्फरन्स होणार होती. पोचलो तसाच रूम मध्ये फ्रेश होऊन वेलकम डिनरला गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजताच कॉन्फरन्स चं उद्घाटन झालं. टी ब्रेक नंतर चार वेगवेगळ्या हॉलमध्ये आमचे चार वेगवेगळ्या विषयांवरचे टेक्निकल सेशन्स सुरू झाले. चार दिवस भरगच्च प्रेझेंटेशन झाली. चौथ्या दिवशी माझी संध्याकाळी सहाची फ्लाइट असल्याने मी साडेतीन वाजताच हॉटेल सोडून एअरपोर्टवर जाणार होतो. मी स्वागत कक्षावर म्हणजे हॉटेलच्या

रिसेप्शनवर तशी नोंद करून ठेवली होती व मला त्या दिवशी तीन वाजताच टॅक्सी बोलून द्यायला सांगून ठेवलं होतं. सगळं कॉम्प्युटर मध्ये एंटर केलेलं होतं. एवढं मोठं जगभर चेन असलेलं हयात हॉटेल होतं ते. तिथे सगळं टाईम टू टाईम चाललेलं. अत्यंत शिस्तबद्ध. पण अशा ठिकाणीही असं काहीतरी होऊ शकतं याची आपण कल्पनाही केलेली नसते. काय झालं, शेवटच्या, चौथ्या दिवशी आमची कॉन्फरन्स दुपारी तीन ला संपणार होती. सकाळी 9 लाच रोजच्यासारखी सुरू होणार होती म्हणून मी तिसऱ्या दिवशी रात्रीच सामानाची थोडी आवराआवर करून ठेवली होती. सकाळी उठलो, सर्व आटोपून तयार झालो. सोबत कॉन्फरन्सला एक पाऊच म्हणजे छोटी पर्सच म्ह्णाना, फक्त, मला न्यायचा होता. परत तीन वाजता आल्यावर घाई गर्दी होऊ नये म्हणून मी माझं पाऊच सोडून सर्व सामान सुटकेसमध्ये भरलं आणि तिला लॉक केलं. उद्देश असा की तीन वाजता आल्याबरोबर सूटकेस उचलली की चालले. गडबड नको. आणि बरोबर नऊला आमच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये गेलो. रूम लॉक करून घेतली. अकरा वाजता पहिला टी ब्रेक झाला तेव्हा मला आठवलं की आपण आपली सकाळची बी पी ची गोळी घेतलीच नाही. ती रूम मध्ये सुटकेसमध्ये होती. त्याच मजल्यावर माझी रूम होती म्हणून मी गोळी घेण्यासाठी रूम मध्ये गेलो. लॉक उघडून पाहतो तर रूम मध्ये माझी सुटकेस नाही. गायब. सगळं पाहीलं. पलंगाखाली .सोफ्या खाली. बाथरूम मध्ये. पण पत्ता नाही. मी घाबरलोच. तरी बरं, सर्व पैसे आणि पासपोर्ट माझ्या जवळच्या पाऊस मध्येच होते. (तसं मी नेहमीच करतो. मी जवळ जवळ अकरा देश फिरलो आहे. पण प्रत्येक ठिकाणी मी माझा पासपोर्ट आणि पैसे माझ्या अंगावरच्या पाऊच मध्येच ठेवतो.) आता काय

करायचं म्हणून ताबडतोब खाली रिसेप्शन काऊंटरवर गेलो व त्यांना सांगीतलं. ते म्हणाले रूम क्लीन करायला जी लेडी येते तिनं ठेवली असेल, ती तिथेच विंगमध्ये दुसऱ्या कुठल्या खोलीत काम करत असेल. जस्ट चेक॰ अवर अटेंडंट विल कम इन फाईव्ह मिनिट्स. मला कुठे दम, मी परत लिफ्टने सतराव्या मजल्यावर गेलो. परत एकदा रूम उघडून पाहीली. बाहेर येऊन कॉरिडॉरमध्ये पाहीलं तर एका रूम समोर काही सॅनिटरी मटेरियल दिसलं. मी तिथे जाऊन उभा राहिलो. सुदैवानं एक आफ्रिकन बाई हातात झाडू बाटल्या घेऊन बाहेर पडली. हीच ती क्लिनर किंवा स्विपर असावी असं समजून मी तिला इंग्रजीत माझा रूम नंबर सांगून माझ्या सुटकेस बद्दल विचारलं. ह्या स्विपर लोकांकडे एक मास्टर की असते. त्या बाईंनी त्या की नी रूम उघडून माझी रूम साफसफाई करून ठेवली होती. मी जेव्हा तिला माझ्या सुटकेस बद्दल विचारलं, तिनं कपाळाला हात लावला अन् म्हणाली अरे तुमची सुटकेस? तुम्ही अजून इथेच आहात काय? गेला नाहीत? मला वाटलं सगळी पॅक केलेली सूटकेस तुम्ही विसरलात आणि निघून गेलात, म्हणून मी आत्ताच तुमची सुटकेस खाली सिक्युरिटी मध्ये देऊन आले. मी म्हटलं 'आय ऑल रेडी नोटेड ऑन रिसेप्शन माय चेक आउट टाईम. तिची चूक झाली होती. तिनं, जास्तीचा कारभार करून ठेवला होता. मग ती घाईघाईनं मला सिक्युरिटी ऑफिस मध्ये घेऊन गेली. तिथल्या ऑफिसरनं नुकतंच माझ्या सुटकेसच लॉक उघडून त्यातील एकेका सामानाची, कपड्यांची यादी करायला सुरुवात केली होती. ती बाई त्या सिक्युरिटी ऑफिसरला म्हणाली,"आय एम सॉरी. लगेज बीलॉन्ग्ज टू धिस जंटलमन. त्या बाईनं पुन्हा पुन्हा माझी माफी मागीतली. सर्व सामानासह माझी सुटकेस मला दिली. मी तक्रार

केली असती तर त्या बाईची नोकरी गेली असती पण मला तसं काहीच करायचं नव्हतं .पण जवळजवळ दीड तास ह्या चिंतित अवस्थेतून ज्याला आपण अंक्शास मोमेंट्स म्हणतो, त्यातून मला जावं लागलं. त्यात माझा एक टेक्निकल सेशन् ही बुडाला.' पुढे सर्व ठीक झालं पण असंही होऊ शकतं. हयात सारख्या जागतिक, इतकं मोठं नाव असलेल्या इतक्या मोठ्या फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये असं होऊ शकतं. खरं म्हणजे ह्या हॉटेलमध्ये चेक इन अँड चेक आऊट टाईम ची नोंद असते त्या दिवसापासून मी मात्र एक धडा शिकलो की हॉटेलातून अगदी निघेपर्यंत पूर्ण सामान पॅक करून ठेवायचं नाही. किमानपक्षी अंडरवियर बनियन तरी सुटकेस वर वाळत ठेवायचे. वाळलेले असले तरी.

कोपऱ्यावरचा म्हातारा

अशोक एक बारा तेरा वर्षाचा मुलगा होता. रोज संध्याकाळी आईच्या भांडे घासण्या, धुण्याचा आवाज आला की अशोक उठून स्वयंपाक घरात जायचा व पोळीच्या डब्यातली एक पोळी आणि एक चमचाभर भाजी तो आपल्या छोट्याशा स्टीलच्या डब्यात भरायचा व फिरायला जातोय असं आईला सांगून तो घराच्या बाहेर पडायचा. जवळच असलेल्या एका मार्केटच्या एका कोपऱ्यावर एक फाटके कपडे नेसलेला, दाढी वाढलेला म्हातारा बसलेला असायचा. त्याच्या जवळ जाऊन डब्यातली भाजी पोळी आणि कधी कधी मिठाईचा एखाद तुकडा तो त्या म्हाताऱ्याला द्यायचा. अगदी पहिल्या दिवशी जेव्हा अशोकनं त्याला हे दिले तेव्हा त्या म्हाताऱ्याने त्याला जवळ बोलाऊन हसत हात जोडून नमस्कार केला. एका पावसाच्या दिवशी अशोकने आपल्या बाबांबरोबर घरी जाताना त्या म्हाताऱ्याला पहिल्यांदा पाहीलं. पावसात तो म्हातारा एका कोपऱ्यातल्या पत्र्याच्या शेड खाली भिजत थरथरत होता. अशोक आपल्या बाबांना म्हणाला 'बाबा त्याला कोणी मदत का करत नाही?' बाबा म्हणाले 'अरे लोकांना आपली कामं, आपले उद्योग असतात.' अशोकला त्याची फार दया आली आणि त्या संध्याकाळ पासूनच त्याने हा कार्यक्रम सुरू केला. रोज न चुकता तो म्हाताऱ्याला

भाजी पोळी देई. म्हातारा आनंदून जाई. अशोकचं हे रोजचं गुपित होतं. त्याने आपल्या आई-बाबांना ही ह्या बाबत सांगीतलं नाही. त्याला वाटलं ते त्याला थांबवतील. असे बरेच दिवस झाले. आता कधी कधी तो म्हाताराबाबा अशोकशी बोलू लागला. आज तुला शाळेत काय शिकवलं वगैरे विचारू लागला. मला आज गणित शिकवलं अशोक म्हणायचा. गणित माणसाला शांत कस राहावं हे शिकवतं. तसंच आयुष्यही शिकवतं,' म्हातारा म्हणायचा. त्या बाबाने कधीही आपल्या आयुष्याबद्दल तक्रार केली नाही किंवा देवाला दोष दिला नाही.

हिवाळ्याच्या एका रात्री त्या बाबाला खूप खोकला झाला. औषधाला त्याच्याजवळ पुरेसे पैसे ही नव्हते, अशोक ने दुसऱ्या दिवशी आपल्या बचतीच्या डब्यातले पैसे त्या बाबाला दिले. तो म्हातारा म्हणाला 'नको हे तुझे बचतीचे पैसे आहेत. अशोक ने आग्रहाने त्याला दिले. त्या म्हाताऱ्याचे डोळे भरून आले. असेच काही महीने गेले आणि मग एक दिवस अशोक गेला तेव्हा त्याला तो म्हातारा तिथे दिसलाच नाही. अशोक फार काळजीत पडला. त्याने बाजूच्या दुकानदारांना विचारलं पण कोणालाच काही माहीत नव्हतं त्या बाबाबद्दल. त्याला खूप वाईट वाटलं.

आठवडयानंतर अशोक शाळेतून परत आला तेव्हा त्याला आपल्या घरच्या फाटकावर एक स्वच्छ कपडे घातलेला, दाढी केलेला माणूस दिसला. त्याच्या हातात एक कागदी पिशवी पण होती. अगोदर अशोकने त्याला ओळखलंच नाही. नंतर तो ओरडला 'म्हातारबाबा तुम्ही?'

'होय, मीच. बेटा तुझ्या दयाळू पणाबद्दल ऐकून एका व्यापऱ्याने मला त्याच्या ओळखीने एका मंदिरात नोकरीवर लावून दिलं. आता मी तिथे साफ सफाईचं काम करतो. ते लोक मला पगार देतात. म्हणून हे कपडे

घेऊ शकलो. जेवण ही तिथेच मिळतं॰ हे घे बेटा तुझ्यासाठी.' म्हाताऱ्याने आपल्या हातातली पिशवी अशोकला दिली व म्हणाला, 'बेटा, माझ्याकडे कोणी ढुंकूनही पाहत नव्हतं तेव्हा तू मला रोज जेवण देऊन माझ्यावर किती उपकार केलेस. मी त्या उपकाराची फेड तर कधीही करू शकणार नाही. पिशवीत एक सुंदर वही आणि पेन आहे. खूप शिक. खूप मोठा हो आणि अशीच गोरगरीबांची मदत करत रहा.' फाटकावरचा आवाज ऐकून अशोकचे आई-बाबा बाहेर आले. बुचकळ्यात पडत त्यांनी म्हाताऱ्याला विचारलं, 'कोण तुम्हो ?' म्हाताऱ्यानं अशोकाच्या आईवडीलांना पहिल्यापासून सगळं सांगीतलं. अशोकला वाटलं आता आईबाबा आपल्याला दाटतील. पण उलट त्याच्या आई-बाबांचे डोळे भरून आले. दोघांनीही त्याला जवळ घेत त्याच्या पाठीवर हात फिरवला. त्याचे बाबा म्हणाले 'बेटा तू आम्हाला फार मोठी गोष्ट शिकवलीस.'

नंतर ते त्या म्हाताऱ्याला घरात घेऊन गेले. अशोकच्या आईने छानसा स्वयंपाक केला आणि मग सर्वजण बरोबर जेवले. कधी कधी लहान मुलंही मोठ्यांना चांगल्या गोष्टी शिकवून जातात.

एक सीट रिकामीच

शहराच्या त्या गर्दीच्या सिटी बस टर्मिनल वर रोज संध्याकाळी बरोबर 7.15 वाजता ती जुनी लाल बस लागायची. ती लागल्या बरोबर ऑफिस मधून घरी जाणारे लोक, शाळा कॉलेज मधून घरी परतणारे विद्यार्थी, किराणा घेऊन जाणाऱ्या बायका असे अनेक प्रवासी बस मध्ये घुसण्यासाठी गर्दी करायचे. ती बस नेहमी फूल व्हायची. सर्व जागा भरून उभे राहणारे ही बरेच असायचे. पण कोणीही त्या एका सीट वर बसायचे नाही ती नेहमी रिकामीच असायची. शेवटातून तिसऱ्या रांगेतली खिडकीजवळची ती जागा-सीट नेहमी रिकामीच. कोणीही तिच्यावर बसायचं नाही. ती सीट काही मोडलेली, फाटलेली नव्हती की काही घाणेरडी नव्हती. तरीही. लोक तिथे बसायचं टाळायचे.

रवी त्या बसवर आलेला नवीन कंडक्टर होता. त्याला कोडंच पडायचं की लोक असं का करतात; 'काही जादूटोणा आहे का त्या सीट वर की काय त्याला कळेना. त्याच्या पहिल्या दिवशी तो ओरडला, 'सरका पुढे सरका, तिसऱ्या ओळीतील एक सीट रिकामी आहे. पण कोणीही तिथे बसेना. उभे असलेले प्रवासी सुध्दा बसायला तयार नव्हते. रवी लोकांना म्हणाला 'काय झालं तुम्हाला, का बसत नाही कोणी त्या सीटवर? लोक चूप. बसचा चालक शंकर म्हणाला 'जाऊ दे. सोड पिच्छा.'

‘का? काही भूतबीतं आहे का त्या सीटवर?‘ रवी बोलला. शंकरनं काही उत्तर दिलं नाही. रवी आणखीनच चिडला. पुढच्या दिवशी, त्याच्या पुढच्या दिवशी, तेच. आठवड्याच्या शेवटी रवीची उत्सुकता शिगेला पोहचली. शेवटी त्याने एका वृध्द माणसाला विचारलं,’ त्या जागेवर कोणीही का बसत नाही?’ तो माणूस म्हणाला ‘तू नवीन आहेस म्हणून तुला माहीत नाही.’ ‘हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही’ रवी म्हणाला.’ तो म्हातारा उत्तरला, ‘तीन वर्षापूर्वी एक मुलगी त्या सीट वर नेहमी बसायची. एका संध्याकाळी ती आपल्या कामावरून परत आली होती. त्या रात्री पावसामुळे चालकाचा त्या पुलाजवळ, बसवरचा ताबा सुटला. व अपघात झाला त्यात अनेक जण वाचले, पण ती मुलगी मेली. बस मध्ये शांतता पसरली. ’ रवीने चालकाकडे पाहिलं. ‘त्या सीटवरचं कोणीतरी मेलं म्हणून आता कोणी तिच्यावर बसत नाही. असंच न?’ रवी म्हणाला. पण त्या रात्री पासून रवीला विचित्र अनुभव यायला लागला. तो त्या सीट पासून जातांना त्याच्या अंगात थंडीने हुडहुडी भरावी तसे व्हायला लागलं. ती सीट जवळची खिडकी आपोआप उघडते आहे असं त्याला भासू लागलं. एकदातर त्याला ‘एक्सक्युज मी’ असा मुलीचा आवाज आला. त्याने पालटून पाहीलं तर कोणी नव्हतं.

पुढच्या स्टॉपला त्यानं शंकरला विचारलं ‘तू तिला ओळखत होता?’ दीर्घ श्वासघेऊन शंकर म्हणाला ‘ती माझीच मुलगी होती.’ रवी आवाक झाला. शंकर पुढे म्हणाला, ’ तिला नुकताच कुठे जॉब मिळाला होता. तिला नेहमी खिडकी जवळची जागा आवडायची.’ शंकराचा कंठ दाटून आला. त्या रात्री पाऊस पडत होता. मी खूप जोराने बस चालवत होतो. गाडीचे ब्रेक ही चांगले नव्हते. एक छोटीशी चूक झाली माझी, आणि----

-’ शंकर पुढे बोलू शकला नाही. काय बोलावं रवीला ही कळलं नाही. ‘आम्ही तिला दवाखान्यात घेऊन गेलो. पण तिथे पोहचण्याआधीच तिचा मृत्यू झाला.’ शंकर म्हणाला, आज पहिल्यांदा रवीला शंकरच्या सीट च्या बाजूला लागलेला त्या मुलीचा फोटो दिसला. एक छोटी तरुणी. विशीच्या आतली. भावुक डोळ्याची. शंकरनं हळूच फोटोवरून हात फिरवला. ‘त्या अपघाता नंतर लोकांनी स्वत: होऊन त्या जागेवर बसणं सोडलं.’ शंकर म्हणाला. रवीने वळून त्या रिकाम्या सीटकडे पाहिलं. आता त्याला भीती वाटत नव्हती. पण आत खोलवर तो फार दु:खी झाला होता.

मध्ये बरेच दिवस गेले आणि मग एका संध्याकाळी तसाच जोराचा पाऊस सुरू झाला. रस्त्यावरून नदी वाहावी तसं पाणी वाहू लागलं. विजा कडकडायला लागल्या. तशातही ती बस हळू हळू पुढे चालली होती. आणि अचानक मोठा आवाज झाला आणि एक ट्रक त्यांच्या बसवर येऊ लागला. आतले सर्व प्रवासी दचकले. तो ट्रक आता बस वर येऊन आदळतो की काय असं वाटायला लागलं. शंकरनं जोरानं स्टीयरिंग व्हील उलट दिशेला फिरवलं. तरी बस तिरपी झाली. क्षणभर मृत्यूच अंगावर येतोय की काय असं रवीला वाटलं. आणि मग ते स्टेयरिंग व्हील आपोआप जर्क घेऊन फिरलं. बस ट्रक पासून दुसऱ्या बाजूला गेली आणि रोड डिव्हायडरला लागून थांबली. अपघात टळला. कोणालाच काही लागलं नाही. प्रत्येक जण श्वास रोखून बसला होता. पण जीवंत. शंकर आपल्या थरथरत्या हाताकडे पाहून जोराने म्हणाला,’मी व्हील फिरवलं नाही ते आपोआप तिकडे फिरलं आणि आपण सर्व वाचलो. रवीने हळूच त्या रिकाम्या जागे कडे पाहीलं. तिच्या बाजूची खिडकी उघडी होती. बस मध्ये थंड वारं वाहू लागलं. आणि रवीला ती दिसली. हो तीच. त्याच सीटवर.

आपल्या वडिलांकडे पाहून हलकंसं हसत बसलेली॰ हळू हळू ती रवीच्या दृष्टी आड झाली.

दुसऱ्या दिवशी बरोबर 7.15 वाजता बस लागली. प्रवासी आत घुसू लागले. आता ती सीट रिकामी नव्हती. आज त्या सीटवर एक फुलांचा हार वाहिलेला होता.

मृत्यू स्थळ, आणि वेळ

शिरीष कणेकरांची आठ दहा पुस्तक मी वाचली असतील. त्यांची शैली मला आवडते. त्यांच्या लिखाणात हलकं फुलकं विनोदी व्यंग तर असतंच पण बऱ्याच ठिकाणी हृदयाला भिडणाऱ्या, आपल्याला अंतर्मुख करणाऱ्या, जीवनाचं एक वेगळं दर्शन घडवणाऱ्या साहित्याची त्याला जोड असते. मला पुस्तकाचं आणि त्या लेखाचं नाव आठवत नाही पण त्यांनी त्यांच्या एका लेखात मृत्यूच्या स्थळा काळाबद्दल दोन सुरेख गोष्टी लिहिल्या आहेत. एका गोष्टीत त्यांनी लिहिलं आहे-- एक चिमणीचं पिल्लू एका झाडाच्या फांदी वर भीतीने थरथर कापत बसलेलं असतं, वरून उडत जाणारा गरुड ते पाहतो अन् त्या पिल्लाजवळ जाऊन त्याला विचारतो' ' अरे असा भीतीने थरथर का कापतो आहेस? काय झालं तुला? ते पिल्लू म्हणतं, "ते पहा तिकडे त्या समोरच्या मोठ्या झाडावर यम बसला आहे. अन् तो सारखी मला भीती दाखवतोय की तो मला घेऊन जाणार आहे. मी मरणार आहे." ते ऐकून गरुड म्हणाला "असं काय, मी बघतो, यम तुला कसा नेतो ते, मी तुला माझ्या चोचेत उचलून दूर हिमालयात नेऊन सोडतो. पाहू कसा येतो यम तिथे." असं म्हणून गरुड खरंच त्या पिल्लाला हळूवार, चोचीत धरून उडतो आणि दूर हिमालय पर्वतात जाऊन त्या पिल्लाला सोडून येतो. गरुड उडत उडत परत त्याच

झाडाजवळ येतो जिथे तो यम बसलेला असतो. गरुड जाऊन यमाला म्हणतो ' त्या चिमणीच्या पिल्लाला मी दूर हिमालयात सोडून आलो आहे. आता बोल. जोराने हसून यम गरुडा ला म्हणतो ' अरे त्या पिलाची मृत्यूची वेळ ठरलेली होती. पण त्याचा मृत्यू हिमालयात लिहिला होता. मी मघापासून काळजीत होतो की आता येवढ्या थोड्या वेळात त्याला हिमालयात कोण घेऊन जाणार? गरुडा तू माझं काम सोपं केलं. तू त्याला हिमालयात सोडून आलास आणि तू त्याला तिथे सोडताच ते तिथे मेलं."

कणेकरांनी मृत्यूच्या स्थळाबद्दल सांगीतलेल्या या गोष्टी बरोबरच म्रूत्युच्या वेळेबद्दल लिहिलेली एक सत्य घटना ही पुढे दिली आहे. त्यांनी लिहिलंय- एक ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू (त्याचं नाव त्यांनी दिलेलं आहे. पण मला ते आठवत नाही), इंग्लंडमध्ये क्रिकेट खेळायला गेला. ज्या दिवशी खेळ नव्हता त्या दिवशी त्या क्रिकेटपटूनं एक कार बाहेर काढली आणि दोन-तीनशे बैलाच्या लाँग ड्राईव्ह वर जायला निघाला. भरधाव वेगाने तो कार चालवत होता. एका वळणाच्या की कशा तरी ठिकाणी त्याची कार कलंडली. दोन-तीन पलट्या मारून रस्त्याच्या कडेला आडवी पडली. तो बाहेर आला. आश्चर्य म्हणजे त्याला कुठेही काही लागलेलं नव्हतं. पण कारचं बरंच नुकसान झालं म्हणून तो कमरेवर हात देऊन कारची पाहणी करण्यासाठी खाली वाकला अन् तेवढ्यात मागून एका भरधाव येणाऱ्या कारनं त्या खेळाडूला उडवलं. उंच उडून तो खेळाडू रस्त्यावर आपटून मरण पावला.

स्थळ तेच. मृत्यू तिथेच झाला. पण त्याच्या स्वतःच्या कारनं पलटी मारली तेव्हा वेळ यायची होती. वेळ दोन मिनिटं नंतरची होती. म्हणून स्वत: कारमधून सुरक्षित बाहेर आलेला तो, दोन मिनिटाने दुसऱ्या कारच्या

उडवण्यानं मरण पावला. मृत्यूचा हा असा अजब खेळ असतो. म्हणूनच म्हणतात, स्थळ आणि काळ चुकत नाही. मग कारणही काही लागत नाही. नियतीचा खेळ अजब असतो.

27 जानेवारी 2016 ला माझे मोठे भाऊ डॉक्टर एस. एन. जाजू, माजी प्राचार्य, विदर्भ महाविद्यालय अमरावती, हे अमरावती ऊन नागपूरला कारनं चालले होते. त्यांच्या कारला कोंढाळी जवळ प्राणघातक अपघात झाला. कार मध्ये मागच्या सीटवर भाऊ आणि वहिनी बसल्या होत्या. ड्रायव्हर कार चालवत होता. कोंढाळी जवळ मागून भरधाव येणाऱ्या एका ट्रकनं ओव्हरटेक करताना आमच्या भावाच्या कारला धक्का मारला. त्यामुळे कार 3-4 पलटी मारून रस्त्यावर कलंडली. आजूबाजूचे लोक धावत आले, त्यांनी कारचं दार उघडून सर्वांना बाहेर काढलं. ड्रायव्हरला काही म्हणजे काहीच लागलं नव्हतं. वहिनीना ही थोडंफार खर्चटलं होतं. पण भावाच्या मणक्याला जबरदस्त मार बसलेला असावा. त्यांना असह्य वेदना होत होत्या. आणि उठता येत नव्हतं. थोड्याच वेळात मागून अमरावती वरून नागपूर ला जाणारी कोणाची तरी मोठी कार आली. त्यांना विनंती करून, माझे भाऊ आणि वहिनी ह्या दोघांना नागपूरला नेलं आणि तिथे त्यांना धंतोली मध्ये न्यूरॉन हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आलं. भाऊ पाहत होते, बोलत होते, ओळखत होते. पण त्यांच्या हातापायाची हालचालच बंद झाली होती. 28 जानेवारीला भाऊचं त्या हॉस्पिटलमध्ये दोन-तीन तासाचं मोठं ऑपरेशन झालं. ऑपरेशन यशस्वी झालं असं डॉक्टरांनी सांगीतलं. मग तीन-चार दिवस भाऊंना तिथेच आयसीयू मध्ये ठेवण्यात आलं, नंतर त्यांना सर्विस रूम मध्ये शिफ्ट केलं. डॉक्टर म्हणाले ही रिकवरी फार हळूहळू होईल.

यांना रिकव्हर व्हायला कमीत कमी तीन-चार महिने लागतील .हॉस्पिटलमध्ये माझ्या वहिनी, माझा पुतण्या त्याची बायको हे सर्वजण भाऊंच्या जवळ होते. सहाव्या दिवसापासून भाऊंना बरेच नातेवाईक, मित्र,मी आणि माझी बहिण असे सगळेजण भेटायला गेलो. तिथे गेल्यानंतर भाऊ सर्वांशी बोलायचे, सर्वांना ओळखायचे पण त्यांच्या हाताची आणि बोटाची हालचाल अजूनही होत नव्हती. 9 फेब्रुवारीला सकाळी भाऊच्या हृदयाचा रक्तपुरवठा बंद होऊन त्यांना मोठा हार्ट अटॅक आला आणि त्यांचा मृत्यू झाला॰ 76 वर्षांचे होईपर्यंत ज्या माणसाला एकदाही कुठल्याही कारणासाठी एक दिवसही दवाखान्यात ऍडमिट करावं लागलं नाही त्या माणसाला दवाखान्यातच मृत्यूनं असं हिरावून नेलं.

खरं म्हणजे 27 जानेवारीला सकाळी दहा वाजेपर्यंत नागपूरला जायचा भाऊचा काही विचार नव्हता. जाण्यासाठी काही महत्त्वाचं कारणही नव्हतं. पण अकरा वाजता जेवण झाल्यानंतर सहज वहिनीचं आणि भाऊचं ठरलं की जर ड्रायव्हर अँवेलेबल असेल तर " आपण आज नागपूरला जाऊन आपल्या त्या नातेवाईकाला भेटून येऊ. ते आजारी होते तेव्हापासून आपल्याला जायचं होतं. आज मला सवड आहे दुसरं, काही कामही नाही, रात्रीपर्यंत परत येऊ." मग भाऊंनी त्यांच्या नेहमीच्या ड्रायव्हरला फोन केला. तू रिकामा आहेस का म्हणून विचारलं. नागपूरला जायचं रात्री परत येऊ असं त्याला सांगीतलं. तो हो म्हणाला. मग भाऊनी त्याला ताबडतोब आपल्या घरी यायला सांगीतलं आणि मग अर्ध्या तासात भाऊ वहिनी आणि ड्रायव्हर कार घेऊन नागपूर साठी रवाना झाले. काळ आणि वेळ आणि स्थळही चुकत नाही. त्या दिवशी काही कारण नसताना

त्यांना नागपूरला जायची बुद्धी झाली. ती नेमकी अशावेळी ज्या वेळी तो ट्रक मागून येऊन त्यांच्या कारला धक्का मारणार होता. म्हणतात ना की काळ आणि मृत्यूचं स्थळ हे अगदी ठरलेलं असतं. मग त्याप्रमाणे त्या दिवशी अशा घटना घडत गेल्या आणि त्या ठरलेल्या ठिकाणी भाऊच्या कारला तो अपघात झाला. काळ क्रूर, निर्दयी असतो असं म्हणतात. पण तो वक्तशीर ही असतो ?

सानप गुरुजी

त्या गावाच्या एका कोपऱ्याशी असलेल्या एका सरकारी शाळेत सानप गुरुजी नोकरी करायचे. त्यांची राहणी अत्यंत साधी. बोलणं ही जास्त नसायचं. त्या सरकारी शाळेत येणारी मुलं बहुतेक गरीब मुलंच असायची. कोणाचा शर्ट थोडा फाटलेला तर कोणाचा जोडा किंवा चप्पल फाटलेली. कोणाचं दफ्तर जुनाट झालेलं. सानप गुरुजी रोज सरळ आपल्या वर्गाला जायचे. दुसऱ्या शिक्षकांशी गप्पा मारण्यात त्यांना रस नव्हता. विद्यार्थ्यांच्या अंगावर कधी जोराने ओरडायचे नाहीत, त्यांना रागवायचे नाही की मोठ मोठयाने भाषण देऊन अक्कल शिकवायचे नाही वर्गात आले की आपला विषय ते मन लावून, सुंदर रीतीने शिकवायचे. भूगोल हा त्याचा विषय होता.

त्यांच्या वर्गात राघव नावाचा विद्यार्थी होता. राघव फार गरीब विद्यार्थी होता. त्याच्या शर्ट-पॅंटला थिगळं दिसायची. त्याचं दप्तर जुनाट आणि थोडं फाटलेलं असायचं. पण राघव अभ्यासात खूप चांगला व नियमित होता. बरेच वेळा त्याला वेळच्या वेळेवर फी भरता येत नसायची. मग शाळेतला कारकून त्याला दाटून त्याला फी भरेपर्यन्त वर्गात बसायचं नाही असं बजावून सांगायचा. एका पावसाळ्याच्या दिवशी, शाळा सुटून सर्व मुलं गेली तरी राघव जिन्याखाली हिरमुसला होऊन एकटा बसलेला

होता. सानप गुरुजींनी त्याला तिथे पाहीलं व विचारलं, 'तू गेला नाहीस? इथे का बसलास असा?' राघव म्हणाला, 'माझी फीज भरलेली नाही म्हणून शाळेचा कारकून मला वर्गात बसू देत नाही. तिकडे आई म्हणते, वर्गात बसू देत नाहीत तोपर्यंत घरी ही येऊ नको.' सानप गुरुजींना ते शब्द ऐकून फार वाईट वाटलं. पुढे दोन दिवस त्यांनी चौकशी केली तेव्हा त्यांना कळलं की राघवचे वडील काही वर्षापूर्वीच वारले. त्याची आई घरी दिवस रात्र लोकांचे कपडे शिवून घर चालवते. पण अशात तर ते काम ही, कमी मिळू लागलं आहे. एखादे दिवशीतर त्यांना उपाशी पोटी झोपावं लागतं. त्यानंतर 4-५ दिवसांनी राघवची सर्व थकीत फीज सानप गुरुजींनी भरली. त्यांनी कारकुनाला सांगून ठेवलं की हे कोणालाही सांगायचं नाही. शाळेच्या मुख्य अध्यापकाला वाटलं की कोणीतरी राघवच्या नातेवाईकने ती भरली असेल. आईला वाटलं कोणीतरी ही मेहरबानी केली. राघवला वाटलं त्याच्या आईनं कोणाकडून ते उधार घेतले आहेत. त्यानंतर दरवर्षी फीज न भरणाऱ्यांची नावं नोटिस बोर्डावर लागण्यापूर्वीच राघवची शाळेची, परीक्षेची फीज, पुस्तकाचा खर्च सर्व भरलेलं असायचं. कोणीही फार खोलात गेलं नाही. सानप गुरुजी राघवला नेहमी म्हणायचे,' तू आणखी चांगलं करू शकतोस. जास्त मेहनत कर.'

अशीच काही वर्ष गेली, राघवने 10वीत तर शिष्यवृत्ती मिळवली बारावीतही शिष्यवृत्ती मिळवून तो जिल्ह्यात पहिला आला. नंतर त्याला इंजीनियरिंग कॉलेज मध्ये दुसऱ्या शहरात प्रवेश मिळाला. त्या कॉलेज ला जाण्यापूर्वी तो सानप गुरुजींच्या पाया पडायला गेला व त्यांना म्हणाला, 'सर माझ्यावर तुम्ही सर्वात जास्त विश्वास ठेवला आणि मला प्रोत्साहित केलं.' सानप सर म्हणाले, 'आता खूप अभ्यास कर आणि माझा तो

विश्वास सार्थ ठरव. मगच मला खूप आनंद होईल.' मग तो इंजिनियरिंग ला गेला व काही वर्षातच चांगल्या तऱ्हेने इंजीनियर झाला.

त्याला चांगली मोठ्या पगाराची नोकरी मिळाली. काही वर्षातच त्याने आईसाठी शहरात मोठा फ्लॅट विकत घेतला व आईबरोबर राहू लागला. आता त्याचं खूप छान चाललं होतं. फक्त राहून राहून त्याच्या मनात, 'आपली फीज कोण भरायचं ह्याची रुखरुख असायची. तो जेव्हा जेव्हा आपल्या आईला फीज बद्दल विचारायचा तेव्हा तेव्हा त्याची आई त्याच्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं टाळायची. म्हणायची 'परमेश्वरानेच आपली मदत केली आहे.' जवळ जवळ 15 वर्षाने राघव आपल्या शाळेच्या वर्धापन दिनानिमित्य गावी आला. आला तसाच आधी आपल्या शाळेत गेला. शाळा आता फार जुनी झाली होती. कुठे भिंती थोड्या पडलेल्या तर कुठे रंग गेलेला' तो स्टाफ रूम मध्ये गेला. सानप गुरुजी आता रिटायर झाले होते, तिथे त्याला कळलं की त्याची फीज सानप गुरुजी भरायचे. मग तो शाळेच्या ऑफिस मध्ये जाऊन, आता म्हाताऱ्या झालेल्या त्या कारकुनाला भेटला. त्या कारकुनाने राघवला जुने रजिस्टर व फीज च्या पावत्या दाखवल्या. सर्व पावत्यांवर सानप गुरुजींच्या सह्या होत्या. त्या कारकुनाने त्याला सांगीतलं की गुरुजी जुनाच, कॉलर वर फाटलेला सदरा घालायचे. जुनीच छत्री वापरायचे व अशातऱ्हेने बचत करून ते राघवचे पैसे भरायचे. राघवचे डोळे भरून आले. मग तो गुरुजींच्या घरी गेला. गेल्या गेल्याच तो गुरुजींच्या पाया पडला आणि म्हणाला ' गुरुची तुम्ही माझ्यासाठी इतकं सर्व केलं, इतका त्याग केला, पण मला सांगीतलं का नाही' गुरुजी म्हणाले 'अरे असं सांगीतलं असतं तर ती च्यारीटी झाली असती. मी तुला मदत केली, च्यारीटी नाही. मी माझे पैसे दान न करता

तुझ्यात इन्व्हेस्ट केले. राघव परत गुरूजींच्या पायावर डोके ठेवून रडला. गुरुजी अजून ही गरिबीतच राहत होते. त्यांनी गुरुजींना विचारलं 'तुम्ही कुणा कडून मदत का मागीतली नाही?' ते म्हणाले, 'अरे शिक्षकाचं काम देणं असतं. घेणं नाही.'

आठ दिवसांनंतर सर्व गावात ही बातमी पसरली की राघवने शाळेची नवीन इमारत बांधण्यासाठी मोठी देणगी दिली आहे तसेच 'सानप गुरुजी ट्रस्ट' नावाचा एक ट्रस्ट काढून त्यात मोठी रक्कम जमा केली आहे, व त्या ट्रस्ट च्या पैशाच्या व्याजातून दरवर्षी एका गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा सगळा खर्च करण्यात यावा असं शाळेच्या ऑफिस मध्ये लिहून दिलं

देवाचं गणित

परमेश्वराचं गणित समजणं अत्यंत कठीण आहे. चार माणसांच्या संसाराचा गाडा चालवताना आपली किती सर्कस होते. मग त्याला तर जग चालवायचं आहे. तो सर्वांची काळजी वाहतो आहे. म्हणून आपल्याला जरी त्यावेळी ते कळत नसलं तरी ज्या ज्या वेळी तो जे जे करतो ते आपल्या भल्यासाठीच करतो, असं मानायचं अन् पुढचं पाऊल उचलायचं. काही आढ्य माणसांना, मस्तवाल माणसांना उद्देशून लिहिलेला, प्रसिद्ध उर्दू शायर जौक यांचा एक शेर आठवतो---

जालीमो अपनी किस्मत पे नादां न हो,
दौर बदले गये, वक्त की बात है.
वो यकिनन सुनेगा सदाये मेरी,
क्या तुम्हारा खुदा है, हमारा नही ?

थोडासा विनोदाचा भाग म्हणून हे सर्व वरवर पाहता खरं वाटलं तरी, मेट्स लीक ह्या लेखकांनी आपल्या 'डज गॉड हिअर युवर प्रेयर इन सिन' या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे वाईट काम करणारी ही माणसंच असतात. पण त्यांच्यामध्ये सद्गुणांचा, परमेश्वरी इच्छेचा अभाव असतो. सिल्क न पुढे म्हटले आहे की परमेश्वर सर्वज्ञाता आहे. तो सर्वांच्या प्रार्थनेला प्रतिसाद देतो. तो ऐकतो. प्रश्न फक्त आहे की माणूस वाईट काम करताना किंवा पाप करताना जेव्हा देवाची प्रार्थना करतो, तेव्हा देव प्रतिसाद देतो

a
का? तो म्हणतो, आपण जेव्हा पापात असतो तेव्हा देवांच्या गैर मर्जीत असतो. त्यांच्या मर्जीत नसतो. देवानं जर आपल्या प्रार्थनेला हाक द्यायची असेल तर आपण त्याच्या मर्जीत असायला पाहिजे. आपल्या स्वतःच्या मर्जीत नाही. जेव्हा आपण पाप करतो तेव्हा आपण आपली मर्जी चालवतो, देवाची नाही. मग अशात देवानं जरी आपली प्रार्थना ऐकली तरी तिला तो प्रतिसाद देत नाही. पण वाईट काम करणारा ही जर पश्चाताप करत असेल, जर तो देवाची माफी मागत असेल, तर परत देव त्याची प्रार्थना स्वीकारतो. तो शेवटी क्षमाशील आणि दयाळू आहे. खरं म्हणजे वाईट हे चांगल्याचं अवांछनीय अंग आहे. त्याला वेगळं अस्तित्व नाही. माणसातल्या चांगल्या गुणातली कमी म्हणजे दुर्गुण. चांगल्याचा अभाव म्हणजे वाईट. तो पुढे म्हणतो चांगला मार्ग धरायचा की वाईट धरायचा हे परमेश्वरानं आपल्यावर सोपवलेलं आहे. बऱ्याच वेळा देवांनं आपल्यावर अन्याय केला असा आपल्याला वाटतं. माझंच का असं व्हावं, मीच का, असा आपण टाहो फोडतो. तेव्हा आपण सोयिस्कर पणे हे विसरतो की देवानं बरेच वेळा इतरांना डावलून फक्त आपल्यावर न्याय केला आहे. परवा सकाळी मला व्हाट्सअप वर एक सुंदर मेसेज आला. तो इंग्रजीत होता. त्याचं भाषांतर मी इथे देतो आहे. त्याचं शीर्षक होतं “मीच का?” जगप्रसिद्ध टेनिसपटू आर्थर अँश (विम्बल्डन पटू) ला त्याच्या एका हार्ट सर्जरी च्या वेळी चुकून इनफेक्टेड रक्त देण्यात आलं. त्यामुळे त्याला आजार झाला. तो आसन्नमरण असताना त्याला त्याच्या हजारो चाहणाऱ्याचे मेसेज, शुभेच्छा आल्या. काहींनी हळहळ व्यक्त केली. त्यापैकी एकाने लिहिलं की या जीवघेण्या आजारासाठी देवाने तुझीच का निवड केली? त्याच्या उत्तरात आर्थरनी लिहिलं की, “ पाच कोटी मुलं

टेनिस खेळायला लागली. त्यापैकी पाच लक्ष जणान्ना व्यवसायिक टेनिस खेळायला जमलं. त्यापैकी पन्नास हजार सर्किट मध्ये आले. त्यापैकी पाच हजार ग्रँडस्लॅम ला पोहोचले. त्यापैकी 50 विम्बलडनला पोहोचले. त्यापैकी फक्त चार सेमी फायनल ला पोहोचले. त्या पैकी दोन फायनल ला पोहोचले. आणि शेवटी फायनल जिंकून विम्बल्डन कप हातात घेऊन उंचावताना, मी देवाला नाही विचारलं की फक्त मीच का?" कधीकधी परमेश्वराने जे आपल्याला दिलं त्यात आपण समाधानी नसतो. आणि दुसऱ्यापाशी जे आहे ते आपल्यालाही मिळालं पाहिजे, त्याच्या सारखं आपल्याला ही जगता आलं पाहिजे असं आपल्याला वाटत असतं पण अनेकदा ईश्वरानं इतर अनेकांना डावलून ते फक्त आपल्यालाच दिलं आहे हे आपण सोयीस्करपणे विसरतो.

शेतात काम करणारा एखादा मुलगा आकाशात उडणारं विमान पाहतो अन् त्यालाही आकाशात उडावं वाटतं आणि त्याच् विमानाचा पायलट खालचं हिरवगार फार्महाउस पाहून, कधी आपल्या घरी परतून आपल्या फार्महाऊसवर जाता येईल याचं स्वप्न पाहतो. याला जीवन ऐसे नाव. जे मिळालं त्यात मजेत राहा. जर दौलत हे सुखाचं मूळ आणि रहस्य असेल तर श्रीमंत लोकं रस्त्यावर नाचताना दिसली असती. पण फक्त गरीबच मुलं रस्त्यावर नाचताना दिसतात. जर सत्ता, ही सुरक्षित जीवनाचं रहस्य असतं तर व्हीआयपी लोक, राजकारणी, अंगरक्षकांना घेऊन फिरले नसते. जे साधेपणानं राहतात ते सुखाची झोप झोपतात. असं आहे विधात्याचं गणित. अगदी सोपं पण समजायला अतिशय अवघड. आणि अनुसरायला त्याहूनही अवघड'

अखेरची इच्छा

जेव्हा हॉस्पिटल मधून फोन कॉल्स गेले तेव्हा त्या तिघांपैकी ताबडतोब कोणीही उत्तर दिलं नाही. हॉस्पिटलवाल्यांनी सर्वात आधी विजयला फोन केला. विजय मीरा व अजय हे तिघं सख्खे भाऊ बहीण पण तिघं वेगवेगळ्या शहरात राहायचे. विजय सर्वात मोठा, मग मीरा मग अजय. गेल्या 3-4 वर्षापासून ते एकमेकांना भेटले सुध्दा नाही. प्रत्येक जण आपआपल्या कामात मश्गुल. चार वर्षापूर्वी प्रोपर्टी च्या वाटणी संबंधात त्यांच्यात आपसात कटूपणा आला व दरी पडली. ह्या तिघांना जोडणारा एकच दुवा होता. त्यांचे वडील मोहनराव. सर्वार्थानं, म्हणजे पैशा अडक्यानं चांगले, तब्येतीनं धड धाकट मोहनराव आता हॉस्पिटल मध्ये पलंगावर आपली शेवटची घडी मोजत होते. तिन्हीही मुलं त्यांना दुरावलेलीच होती. तिघंही वडिलांना फारसे भेटत नसत. मोहनराव एकटे आपल्या शहरात आपल्या घरी राहायचे. खूप आजारी झाले म्हणून त्यांना दवाखान्या ॲडमिट केलं होतं. त्यांच्याच विंनंतीवरून दवाखान्यावाल्यांनी त्या तिघांना फोन केले होते.

सर्वात आधी विजय आला. वडील 405 नंबर च्या खोलीत होते. त्यानं आधी रूमच्या काचे मधूनच वडलांना पाहीलं. ते फार रोडावले आहेत असं त्याला वाटलं. मग तो हळूच दार उघडून खोलीत गेला. मोहनरावांनी त्याला किलकिल्या डोळ्यांनी पाहीलं आणि एक दुर्बल हास्य केलं. 'कसे आहात?' विजयनं विचारलं. 'तूही आता म्हातारा व्हायला

लागला आहेस‘ ते हळू आवाजात विजयला म्हणाले.’ मोहनरावही हसले. विजय हसला. क्षणभर जणू मधली 20 वर्ष गायब झाली. दोन तासानंतर मीरा आली. ती ऑफिसच्या कपड्यातच होती. कामाचा थकवा तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. विजय ला पाहून ती क्षणभर खोलीच्या दारातच उभी राहिली मग आत आली. आल्या आल्या काही बोलली नाही मग थोड्या वेळानं विजयला म्हणाली, ‘कसे आहेत ते?’ ‘अजूनही तसेच आहेत. माझी अजूनही उडऊ शकतात असे.’ विजय म्हणाला. तिला पाहताच मोहनरावांचे डोळे भरून आले. त्या दुरावल्याचा सल त्यांच्या डोळ्यात दिसत होता. ‘तू तुझे केस कापलेत?’ मोहनरावांनी तिला विचारलं. ‘तुमच्या लक्षात आलं ही?’ मीरा म्हणाली. ते कडवटपणे म्हणाले ‘माझ्या सर्व लक्षात येतं.” ‘तुमच्या सर्व लक्षात येतं हाच तर करा प्रॉब्लेम आहे. फक्त जे लक्षात यायचं तेच तुमच्या लक्षात येत नाही’ ती मनातल्या मनात म्हणाली.

जवळ जवळ मध्यरात्री अजय आला. वयाच्या 19व्या वर्षीच तो घर सोडून गेला होता, नंतर फारसा घरी कधी आलाच नाही. रिकाम्या हातानं तो आला. हातात काही फुलं नाही, गुच्छ नाही. चेहऱ्यावर थोडा ही विषाद नाही. त्याला पाहताच मोहनवर म्हणाले, ’ तू अजून रागात आहेस? ’ अजय म्हणाला ‘तुमची हुकूमत, हेकेखोरपणा अजून ही सुरू आहे?’ मोहनराव हलकंसं हसले. पुढचे दोन दिवस ते तिन्हीजण वेटिंग रूम मध्ये थांबले. एकत्र नाही, फक्त एकमेकांजवळ म्हणता येईल असे. फारसं आपसात संभाषण नाही. फक्त औपचारिक; औषधानबद्दल, औषधांच्या देण्याच्या वेळे बद्दल, विम्या बद्दल, डॉक्टर च्या अपडेत बद्दल. जुन्या

जखमांन कोणी छेडलं नाही. खरं म्हणजे त्यावर बोलून मन मोकळं करणं आवश्यक होतं तिघांसाठी'

तिसऱ्या दिवशी मोहनरावांच्या खोलीत ती तिघं आली तेव्हा मोहनराव म्हणाले 'माझी एक शेवटची इच्छा आहे' त्या तिघांनी एकमेकांकडे पाहीलं. खिडकी जवळच्या कपाटाकडे बोट दाखवत ते उघडायला त्यांनी सांगीतलं. एक कॅसेट आहे ती काढून ह्या बाजूच्या कॅसेट प्लेयरवर लावा.' मोहनराव म्हणाले॰ 'वरच्या ड्रॉवर मधली कागदांच्या खाली असलेली ती कॅसेट विजयने काढली. तिच्यावर तारीख लिहलेली होती, 13 जून 2002. 'काय आहे ते?' मीरानं विचारलं. 'That is my apology' मोहनराव म्हणाले. विजयनं टेप लावली. थोडा खर्र आवाज आल्यानंतर मोहनरावांचा आवाज आला; 25 वर्षापूर्वीचा. स्पष्ट आणि कणखर आवाज.

" मला ठाऊक नाही की मी हे सर्व तुमच्याशी डायरेक्टली बोलू शकेन की नाही. बहुदा नाहीच बोलू शकणार, म्हणून हे मी आज रेकॉर्ड करून ठेवतोय. आज सकाळीच अजय म्हणाला, 'आय हेट यू'. आणि कदाचित त्यानं तसं म्हणावं असंच वागत होतो मी त्याच्याशी. त्याला उगाचच वाटायचं की घरात आपल्याशी कोणी धड वागत नाही की बोलत नाही, मग तो सारखा बराच वेळ घराबाहेर राहायचा. मला तर कधी कधी काळजी वाटायची की हा परत घरी येईल की नाही. आणि म्हणून मी त्याच्यावर रागावायचो. विजयशी मी नेहमी कठोर वागायचो. त्याने अगदी शिस्तीत राहावं असं मला वाटायचं. तो लेचापेचा होऊ नये, तो ही कडक व्हावा हा माझा उद्देश असायचा. मीरा चं ते सारखं चित्र काढत बसणं, ते पेंटिंगचं फॅड, मला मुळीच आवडायचं नाही. ते काही उपजीवेकेचं साधन

होऊ शकत नाही असं मला वाटायचं म्हणून मी तिच्यावर राग काढायचो. माझे वडील माझ्याशी कधी प्रेमानं बोलायचे नाही. प्रेमानं बोलणं ही ही एक जबाबदारी आहे असं त्यांना वाटायचं. त्यांचं बोलणं म्हणजे, 'टेबलवर जेवण ठेवलं आहे. किंवा तुझी पुस्तकं आणली आहे' बस असंच असायचं. मुलांशी मृदु बोलावं हे मी शिकलोच नाही.' एक मोठा पॉज टेप मधुन गेला आणि परत ती पुढे सुरू झाली. ' खरं म्हणजे तुमच्यावर प्रेम कसं करावं हे तुमच्या आईला बरोबर माहीत होतं. मला फक्त काळजी पोटी तुम्हाला कसं दाटावं हेच माहीत होतं॰ म्हणून मी तुमच्याशी कधी प्रेमानं बोललोच नाही. आणि तुम्ही माझ्यापासून, एकमेका पासून दूर होत गेलात. म्हणून म्हणतो जेव्हा मी मरेन तेव्हा माझ्या ह्या चुका बरोबर नेऊ नका. त्या विसरून जा. परत आपुलकीनं एकमेकांच्या जवळ या; एकमेकाला जीव लावा.' टेप थांबली. रूम मध्ये शांतता पसरली. काही क्षण कोणीच काही बोलला नाही.

नंतर अजय हळूच उठला आणि बाहेर गेला. त्याच्या पाठोपाठ मीरा आणि मग विजय गेले. बाहेर जिन्यापाशी अजय उभा होता त्याच्याजवळ जात मीरा म्हणाली 25 वर्षापूर्वी त्यांनी हे रेकॉर्ड करून ठेवलं. म्हणजे तेव्हाही त्यांना हे माहीत होतं.' 'तोच तर खरा प्रॉब्लेम आहे' अजय म्हणाला. 'आणि त्याचंच तर वाईट वाटतं.'

थोडंसं हसत अजयकडे पाहून मीरा म्हणाली 'तुझी ती नीळी सायकल आठवते तुला?' त्या सायकलीनं तू एकदा देवळाच्या भिंतीला धडक मारली. आणि मग बाबा रागावतील तुला म्हणून विजयने ते आपल्या अंगावर घेतलं. गेल्या अनेक वर्षांनंतर त्या आठवणी तिघांच्या आठवणी झाल्या. त्या रात्री बराच वेळ ते तिन्हीजण जुन्या आठवणी

काढून एकमेकाबरोबर बोलू लागले. आणि मग हळू हळू त्या दुराव्याच्या भिंती कोसळू लागल्या. जखमा भरू लागल्या. अर्थात हे सर्व एका रात्रीत पूर्ण होणार नव्हतं.

सकाळ होण्याआधीच मोहनरावांचा देहांत झाला. सर्व शांत शांत झालं. अनेक वर्षांनंतर एकाच खोलीत झोपलेले ते तिघं भाऊ-बहीण, पेशंटच्या खोलीत आले व त्यांनी बाबांच्या शवा ला एकसाथ नमस्कार केला. मोहनरावांच्या अन्त्यसंस्कार नंतरचे विधी, एक एक करून पूर्ण झाल्यानंतर सर्व नातेवाईक निघून गेले. आणि आज तीन आठवड्यानंतर तिघांनी मिळून घरचा एक एक कोपरा फिरून पाहीला. अनंत जुन्या आठवणी सारखी प्रत्येक गोष्टीवर, वस्तूवर धूळ साचली होती. अजय च्या सायकलजवळच्या टेबलवर त्याने पाठवविलेली सर्व पत्र टाचण करून ठेवलेली होती. दुसऱ्या खोलीत मीराच्या रंगाच्या सुकलेल्या बाटल्या, छोटे मोठे चित्रकलेचे ब्रश, लहानसा त्या साठीचा बोर्ड ई. पडलं होतं. विजयच्या खोलीत त्याच्या टेबलवर पडलेल्या कॉलेज च्या, हॉस्टेल च्या फिज च्या पावत्या. काही मोठी पुस्तकं पडलेली होती, मोहनरावांच्या सर्व आठवणी तिघांच्या मनात दाटून आल्या. थोड्या वेगळ्या प्रकारे का होईना, पण मोहनरावांनी आपल्या मुलांवर पूर्णपणे प्रेम केलं ह्याची तिघांना जाणीव झाली. ज्या संध्याकाळी ती तिघं आपआपल्या ठिकाणी जायला परत निघाली तेव्हा बाबांच्या टेबलवरच्या रेकॉर्ड प्लेअर जवळ एक छोटासा कागद त्यांना दिसला. तिघांनी तो एकत्रच पाहीला. त्यावर लिहलेलं होतं

‘ If you are standing together while reading this, then my last wish came true.

आणि गेल्या अनेक वर्षात पहिल्यांदा, तिघं जड अंत:करणानं एकत्र घराबाहेर पडली.

रिकामी जागा

भानापूर नावाच्या गावातली ती एक सरकारी शाळा होती. त्याच शाळेत 9 व्या 'ब' च्या वर्गाला अशोक देशमुख हे शिक्षक इतिहास हा विषय शिकवायचे. दरवर्षी सत्र सुरू झालं की त्यांचा क्लास पहिल्या दिवसापासून सुरू व्हायचा. त्यांचा एक खाक्या अजबच होता. ते वर्गात कधी ही मुलांची हजेरी-अटेंडेंस घ्यायचे नाही. इतर सर्व शिक्षक वर्गात यंत्रवत सगळ्या विद्यार्थ्यांची नावं पुकारून हजेरी घ्यायचे. पण देशमुख सर वर्गात आल्यावर आपली कातडी बॅग टेबलवर ठेऊन सरळ शिकवायला लागायचे. वर्गात किती आणि कोण विद्यार्थी आहे नाही ह्याचं त्यांना काही सोयरसुतुक नव्हतं. आले की 'सर्वजण पान 45 उघडा' अशी त्यांची सुरवात असायची. काही इतर सूचना, शिस्तीविषयी वगैरे ते कधीच बोलायचे नाही. आल्या आल्या काही प्रश्नंही मुलांना विचारायचे नाही. मुलांची मजाच व्हायची. कोणी कधीही हजर तर कधीही गैरहजर राहायचं. तर कोणी उशिरा वर्गात येऊन बसायचं. देशमुख सरांची काही तक्रार नसायची. पावसाळ्याच्या दिवसात तर अर्धा वर्ग रिकामा असायचा तरी ते त्याच आवडीनं आणि उत्साहनं वर्गात शिकवायचे.

पण हळूहळू देशमुख सरांच्या काही विशिष्ट गोष्टी विद्यार्थ्यांच्या ध्यानात यायला लागल्या. रोज वर्ग सोडण्यापूर्वी ते खोलीतल्या शेवटच्या

बेंचपाशी जाऊन थोडा वेळ उभे राहायचे. नेहमी त्याच बेंच जवळ. काही वेळा त्यांच्या चेहऱ्यावर विषादपूर्ण हलकंसं हसू उमटलेलं दिसायचं. एक दिवस वर्गातला एक खोडकर मुलगा अरुण, देशमुख सरांना चिडवण्यासाठी त्या बेंचवर जाऊन बसला. देशमुख सरांनी वर्गात येतांना जेव्हा हे पाहीलं तेव्हा ते थोडसं चिडून अरुणाला म्हणाले, 'दुसरीकडे बस' सगळा वर्ग हसला. 'का बरं सर? ही जागा काय प्राचार्यासाठी रिझर्व आहे का?' सरांनी बेंचकडे थोडावेळ पाहिलं आणि म्हणाले 'होय'. त्या दिवसानंतर वर्गाची त्या बेंच विषयीच उत्सुकता अधिकच वाढली. 'कोण बसत असेल त्या बेंचवर?, का बरं देशमुखसर एवढी काळजी घेतात त्या बेंचची?' असे प्रश्न मुलांना पडू लागले. पण, आपघातानंच मुलांना ह्या कोड्याचं उत्तर मिळालं.

वार्षिक साफसफाई च्या दिवशी काही मुलांनी स्टोअर रूम मधलं सामान बाहेर काढलं. एका पोत्यात काही जुनी हजेरी रजिस्टर्स त्यांना दिसली. त्यांनी ती बाहेर काढली. त्यात 20 वर्षापूर्वीचं 9-बी वर्गाचं नेमकं इतिहास ह्या विषयाचं रजिस्टर त्यांना मिळालं. उत्सुकतेपोटी त्यांनी ते उघडून पाहीलं. आत एक सोडून प्रत्येक मुलाच्या नावासमोर हजर किंवा गैरहजर, A किंवा P अक्षराने मार्क केलेलं होतं. फक्त रमेश मिश्रा च्या समोर काहीच नव्हतं. मुलांनी दुसऱ्यादिवशी ते रजिस्टर आणून देशमुख सरांना दाखवलं. पाहता क्षणीच सरांच्या चेहऱ्याचा रंग बदलला. 'कुठे सापडलं तुम्हाला हे?' त्यांनी मुलांना विचारलं. 'स्टोअर रूम मध्ये सर.' मुलं म्हणाली. म्हातारे देशमुख सर खाली बसले आणि म्हणाले. 'रमेश खूप हुशार मुलगा होता. इतिहास हा तर त्याचा आवडता विषय होता. इतिहासातल्या तारखा, सन त्याला माझ्यापेक्षा ही चांगले आठवायचे. त्या

a
शेवटच्या बेंच वर तो बसायचा. खूप गरीब होता. त्याचे वडील बऱ्याच वर्षापूर्वी वारले होते. आई एका विटाच्या भट्टीवर काम करायची. तो स्वत:ही रात्री एका कारखान्यात काम करून आपलं शिक्षण करायचा एक दिवस प्राचार्यानी हजेरी रजिस्टर चेक करायला बोलावली. 75% पेक्षा कमी हजेरी असलेल्यांना शिष्यवृत्ती मिळत नसे. रात्रपाळीचे कामामुळे व दिवसा झोप येत असल्यामुळे रमेशचे बरेच वर्ग मिस झाले होते. म्हणून मी त्याला सर्व ठिकाणी हजेरी दिली व रजिस्टरमध्ये पी असं लिहलं. मला वाटलं मी त्याची मदत करतो आहे.' आता रूम मध्ये संपूर्ण शांतता पसरली होती. सर्व मुलं सरांकडे कान देऊन ऐकत होते. देशमुख सर पुढे म्हणाले,' एका संध्याकाळी तो माझ्याकडे आला. मी काय केलं आहे हे त्याला कळलं होतं' 'तो काय म्हणाला मग?'. समोरच्या एका मुलानं विचारलं. 'तो खूप रडला' सर म्हणाले 'सर मी जर असा खोटेपणाने पास झालो तर ते मला आयुष्यभर बोचत राहील.' रमेश मला म्हणाला. दुसऱ्या दिवशी पासून तो शाळेत आलाच नाही.' 'काय झालं?' मुलं एकदम म्हणाली. देशमुख सर चूप बसले व मग थोड्या वेळानं म्हणाले, ' तो मला भेटला त्याच्या तिसऱ्याच दिवशी तो ज्या कारखान्यात काम करायचा तिथे बॉयलर चा मोठा स्पोट झाला आणि 3-4 माणसाबरोबर तो ही त्या स्फोटात मेला.' वर्गात भयाण शांतता पसरली.

सर पुढे म्हणाले 'एका आठवड्या नंतर त्याची शिष्यवृत्ती मंजूर होऊन आली' सरांच्या चेहऱ्यावर खिन्न हसू उमटलं. 'शेवटी हवी असलेली हजेरी त्याला मिळाली.' वर्गात शांतता पसरली. त्या मागच्या बेंच जवळच्या एका विद्यार्थ्यांनं विचारलं ' पण सर तुम्ही आता हजेरी का घेत नाही?' सरांनी हातातल्या जुन्या रजिस्टरकडे खिन्नतेने पाहीलं आणि

म्हणाले ‘कारण अनेक वर्ष ही हजेरी, हे मार्क्स हे पेर्सेंटेज, रेकॉर्ड, रिपोर्ट्स ह्या आकड्यांवर मी विश्वास ठेवला. पण तरीही खऱ्या अर्थानं माझा रमेश हा विद्यार्थी ज्याला मी हजर म्हणून लिहित होतो, तो नापास झाला. त्याला हजेरी देऊनही तो जीवनात नापास झाला. आणि मग माझा ह्या आकड्यांवरचा विश्वासच उडाला.

त्या दिवसांनंतर वर्ग 9-बी चं स्वरूपच बदललं. प्रत्येक विद्यार्थी वर्गात हजर राहून मन लाऊन शिकायला लागला. त्या मागच्या बेंचवर अजूनही कोणीही बसत नसे. ही बॅच जाऊन पुढची बॅच आली की आलेल्या नवीन मुलांना जुने विद्यार्थी त्या रिकाम्या जागेचा इतिहास सांगायचे.

पाहता पाहता

पाहता पाहता सगळ्याच गोष्टी बदलल्या. दिवाळी दसऱ्याची आठवण आली की आताही मन रोमांचित होतं. पण तेव्हा कसं आतुरतेनं वाट पाहयचो आम्ही दिवाळी-दसऱ्याची. (मी सातव्या वर्गात असेपर्यंत खेड्यातच होतो.) वर्षातून एकदाच नवे कपडे मिळायचे. ते म्हणजे दसरा दिवाळी आली की॰ मग दसऱ्याच्या दिवशी, कोराकरकरीत पायजमा-शर्ट, अगदी एम्प्रेस किंवा मोरारजी मिल्स च्या निळ्या अक्षरातील शिक्या सह अंगात घालायची मजाच काही और होती. एवढंच काय, वर्षभर कधी अंगाला साबण न लावणाऱ्या आम्हा मुलांना दिवाळीच्या दिवशी सुवासिक साबणानं अंघोळ करायला मिळायची. आणि सुवासिक साबण कोणती तर, हमाम, लक्स किंवा रेक्सोना. (आता रोजच्या स्नानाला, पियर्स, डोव्ह, मोती काय काय असतं. पण ती मजा नाही.) दिवाळीच्या तीन दिवसात सकाळी चारला उठून अर्धा-अर्धा तास, आई, चोळून चोळून अंगाला उटणं लावायची अन् वर्षभर अंगावर साठलेला मळ काढायची. (पुन्हा पुढचं एक वर्ष अंगावर मळ चढवायला मोकळे.) बाबांनी आणलेले शंभर-दोनशे रुपयांचे फटाके आम्हा तिघा लहान भावानमध्ये वाटले जायचे. मोठे भाऊ खूप मोठे असल्यानं त्यांना काही मिळायचं नाही. दिवाळीच्या आदल्या

दिवशी, इकडून-तिकडून तोडून आणलेल्या झेंडूंच्या फुलांचे हार ओवण्याचा मोठा कार्यक्रम असायचा॰ प्रत्येक दाराला एक हार आणि प्रत्येक देवाच्या फोटोला एक, असे लहान मोठे पन्धाएक हार तरी ओवावे लागायचे. गोडधोड तर घरात सणावारालाच व्हायचं. आता त्याचं काही कौतुक राहिलं नाही॰ सगळं थ्रिल हरवलं.

पोळ्याला नदीच्या दरडीची माती काढून तिथेच नदीवर लहान मोठ्या आकाराचे बैल बनवायचो आम्ही. मग ते घरी दोन तीन दिवस वाळले की त्यांना चुना, गेरू, शेंदुर, शाई ह्यांनी रंगवायचो. गणपतीचं तर विचारूच नका. दहा दहा दिवस अगोदर पासून हातानं नदीच्या मातीच्या मूर्ती बनवणं, वाळू देणं, मग त्याला रंग देणं हे कार्यक्रम चालू असायचेच. अन् एवढं करून ही गणेश चतुर्थीच्या दिवशी, गावातल्या कुंभाराकडून मोठा गणपती आणला जायचाच. आपआपल्या परीनं आम्ही गणपती समोरची सजावट करायचो॰ सकाळी पाच वाजता उठून, गावाच्या पांढरी च्या शेतात असलेल्या एकुलत्याएक पारीजाताच्या झाडाची फुलं वेचून आणण्याची तर स्पर्धाच असायची. मग तिथे लोटालोट, मारामाऱ्याही व्हायच्या. लहानपण च्या खेड्यातल्या गणपतीची मजाच वेगळी होती.

मागे वळून पहिलं तर आमच्या लहानपणीच्या, तरुणपणीच्या, आणि आताच्या गणेश उस्तवात ही किती बदल झाला आहे. नृत्यांचे कार्यक्रम, अन् मंडपातून घरी येईपर्यंत विसरून जावित (किंबहुना विसरतोच) अशी गाणी. अन् हे सगळं कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात. इतकं बदललंय सगळं. परवा गणेश उत्सव संपता संपता माझ्या एका मित्रानं मला एक पोस्ट फॉरवर्ड केली. ह्यात झालेल्या बदलाचं अगदी वास्तव आणि अंतर्मुख करायला लावणारं ते लिखाण व ती कविता आहे.

खाली लेखकाचं नाव नाही. 'अज्ञात' असं लिहलं आहे. ती ज्या कोण्या व्यक्तिनं लिहली असेल त्या व्यक्तिचं अभिनंदन करून, आणि परवानगीनं मी ती पोस्ट जशीच्या तशी देतो आहे.

' एक कडवट सत्य '

"एके काळी 20-22 वर्षापूर्वी आम्ही आई-बाबांचं बोट धरून लालबागचे गणपती पाह्यला जायचो. चिंचपोकळी पूल, रंगारी बदक चाळ, टेजुकाया, गरमखाडा, गणेश गल्ली, मार्केटचा गणपती, नरे पार्क, लाल मैदान --- मार्केटच्या गणपतीला बाहेरच्या मैदानात जत्रा भरायची. मग हे माग, ते माग, हट्ट कर ---पेटीत पैसे टाका चमत्कार बघा. कांबळी चलत चित्र प्रदर्शन हे त्यावेळचं मुख्य आकर्षण असायचं. बघता बघता गणपतीचं मार्केटिंग सुरू झालं. तो नवसाला पावू लागला. राजा झाला---पेटी मोठी झाली, चमत्कार सुद्धा मोठे झाले. रांग वाढली, भाव वाढला, प्रसिद्धी वाढली, पैसा वाढला, आकर्षण वाढलं--अगदी बाप्पांचा आकार ही वाढला----काळ बदलला, समजलंच नाही. काळाच्या ओघात कांबळी लुप्त झाले. सगळं बदललं पण भाविक बदलले नाहीत. आज मी जातो मार्केटचा गणपती दाखवायला, बोट धरून. आता डोकी आपटतात, घाई करतात, अगदी हकलतात सुद्धा, कुणावरही हात उचलायला मागे पुढे पाहत नाहीत----साधी रांग, नवसाची रांग, व्ही.आय.पी. रांग----पायाचं दर्शन, पडद्याचं दर्शन, खालून दर्शन, वरुन दर्शन ----प्रत्येक दर्शनाचा भाव (भावना नव्हे) निराळा----मला आठवतं, कोणे एके काळी त्या बाप्पाची दुपारची कोणी आरती पण करत नसे, परिसरातली लहान मुलं दुपारची शाळा सुटली की जायची आणि आरती कराची. आता रहिवाशांना तिकडे

जाता येत नाही. श्रद्धा तेवढीच राहिली, पण पेटी ऐपतीपेक्षा मोठी झाली. मला देवाची आठवण येते, त्याला माझा चेहरा आठवत नाही का? नसेल कदाचित. कारण आता 'राजा', अंबानी, तेंडुलकर, बच्चन, फडणवीस आणि सेलिब्रेटीज मध्ये व्यस्त आहे. 'VIP' झाला आहे बाप्पा. आता मी लालबागच्या तमाम गणपतींना घरच्या गणपतीत शोधतो—माझी सर्व श्रद्धा घरच्या गणपतीच्या पायावर ठेवतो---'राजा'ला माझा इथूनच साष्टांग दंडवत.

' एक गणेश भक्त गोंधळलेला '

' हात येथूनच जोडतो '---

देवा तुझ्या दारापुढे उभी मोटारीची रांग, पायी आलो दर्शनाला, आत कसा येऊ सांग ? देवा तुझ्या दर्शनाला मंत्री आणि नेते येती, बंदुका रे आम्हावरी, त्यांचे रक्षक रोखती . देवा तुझ्या दर्शनाला फळे मिठाईची दाटी, कुठे लपवावी सांग, गूळ-खोबऱ्याची वाटी . देवा तुझ्या मुकुटात, सोने आणि लाख हिरे, माझ्या हातातले नाणे ओशाळून मागे फिरे . देवा तुझ्या अंगावर रोज नवीन दागिना, समजेल का तुला माझी उपाशी वेदना . देवा तुझ्या पायाखाली, आता चांदीची रे वीट । तुझा पुजारी फाडे तुझ्या दर्शनाचे तिकीट . देवा तुझ्या मंदिराची वाट जुनी ही सोडतो । तुला ठेवतो हृदयी, हात येथूनच जोडतो. "

भुकेची जाणीव

भिवापूर नावाच्या त्या गावात एक जुनं बस स्टेशन होतं॰ त्या बस स्टेशन च्या बाहेरच्या एका कोपऱ्यात एक जुनी चहाची टपरी(फूड स्टॉल) होती. टपरी बरीच मोठी होती. तिथे चहा बरोबर नाश्त्याचे पदार्थ, अंडाकरी, चपाती, पुलाव हे सुध्दा मिळायचं. एक विधवा-शांताबाईंची ती टपरी होती. रोज संध्याकाळी बरोबर 7.15 वाजता एक काळ्या रंगाची लक्झरी कार त्या टपरीवर यायची. ती कार आली की सभोवतालची खेळणारी मुलं, बाजूचे चहावाले, दुकानदार सर्वजण कुतुहलाने त्या कार कडे पहायचे. कार थांबली की मागच्या सीट वरुनं त्या गावाचे सर्वात श्रीमंत गृहस्थ संग्राम सेठ खाली उतरायचे. संग्राम सेठ म्हणजे सुतगिरण्या, अनेक हॉटेल्स, गोडाउन चे मालक. त्यांना वाटलं तर ते सभोवतालचं सर्व मार्केट खरेदी करू शकले असते एवढे ते श्रीमंत होते. तरी ही ते रोज संध्याकाळी शांताबाईच्या त्या फूड स्टॉल वर यायचे, काहीतरी खायचे व नंतर एक कप चहा घ्यायचे. शांताबाईचा तो स्टॉल फार मोठा नव्हता, समोर 3-4 बेंच टाकलेले असायचे, त्यांच्या कडचा मेनू म्हणजे, पोहे ,पुलाव, अंडाकरी, सुक्या चपात्या आणि चहा. पण संग्राम सेठ रोज काहीतरी खायचे व झालं की पैसे देऊन निघून जायचे. सगळ्या गावात ह्या त्यांच्या खाण्याची चर्चा व्हायची. तिथे ते खायला का येतात हे

लोकांसाठी एक गुढच होतं. एक करोडपती माणूस तिथे रोज का येतो ह्याबद्दल लोकांची आपापली कुजबूज चालायची. कोणाला वाटायचं तिथले खाद्यपदार्थ फार चविष्ट असावेत. कोणाला वाटायचं शांताबाई ही त्या सेठची एकेकाळची प्रेयसी असेल. कोणाला तर असंही वाटायचं की संग्राम सेठचं काही तरी मोठं गुपित शांताबाईला माहीत असावं. एकदा तर वर्तमानपत्राचे बातमीदार सेठची मुलाखत घ्यायला तिथे आले व सेठला त्यांनी बरेच प्रश्न विचारले. पण सेठनी काही ही उत्तर देण्याला नकार दिला. ते म्हणायचे, 'बस इथले खाद्य पदार्थ मला आवडतात.' पण कोणीही त्यांच्या ह्या उत्तरावर विश्वास ठेवला नाही.

जवळ जवळ 15 वर्ष हे असं सुरू होतं. रोज संध्याकाळी सेठचं येणं, काहीतरी खाणं आणि निघून जाणं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते फार काही खायचेही नाही. एक प्लेट पोहे, चहा, बस एवढंच.

आणि मग पावसाळ्याच्या एका संध्याकाळी ती काळी लक्झरी कार आलीच नाही. कोणाचं फारसं लक्ष नव्हतं. शांताबाईनं एक स्टील ची प्लेट काढून ठेवली होती. पण 7.15, 7.30, 8.00 वाजले तरी संग्राम सेठ आलेच नाही. इतक्या वर्षात पहिल्यांदा लोकांना शांताबाईच्या चेहऱ्यावर प्रतीक्षा दिसली. शांता अगतिकतेने त्यांची वाट पाहत होती. 8.15 वाजता एक पांढऱ्या रंगाची मोठी कार आली. सुटाबुटातली तीन माणसं तिच्यातून उतरली व शांताबाईकडे गेली. त्यातला एक म्हणाला, 'बाई आता ह्याच्यापुढे सेठ कधीच येणार नाही. संध्याकाळीच त्यांचं हॉर्ट अटॅकनं निधन झालं. सगळ्या स्टॉल वर व आजूबाजूला शांतता पसरली. दुसऱ्यादिवशी तर वर्तमानपत्रात त्यांच्या निधनाची मोठी बातमीच आली

सर्व गाव हळहळलं. शांताबाईचं रोजचं काम सुरूच होतं. ती 7.15 वाजता रोजच्यासारखी एक प्लेट लाऊन ठेवायची.आणि वाट बघायची.

तिसऱ्या दिवशी वकिलांनी संग्राम सेठचं मृत्यूपत्र वाचलं. आणि सर्वांना धक्काच बसला. सेठनी आपल्या मालमत्तेचा जवळ जवळ 75% हिस्सा शांताबाईच्या नावे केला होता लोकांना वेड लागण्याची पाळी आली. शांताबाईच्या स्टॉल/टपरी जवळ खूप गर्दी झाली. सगळे रस्ते ब्लॉक झाले. प्रत्येकाला आता शांतबाई कडून सगळ्या प्रश्नांची ऊत्तरं हवी होती. त्यांचं तिच्याशी काय नातं होतं, ह्याची लोकांना उत्सुकता होती. अगोदर शांताबाईने तोंड उघडलं नाही पण लोक खूप मागे लागल्यामुळे शेवटी त्या बोलू लागल्या.

" 42 वर्षापूर्वी एक माणूस ह्या आमच्या स्टॉलवर खायला यायचा, तेव्हा तो श्रीमंत नव्हता, फक्त भुकेला असायचा. शेजारच्या अन्नधान्य बाजारात तो सफाईगार म्हणून काम करायचा. फाटके कपडे, फाटक्या चपला घातलेला तो माणूस म्हणजेच आजचे संग्राम सेठ. चहा नाश्त्यालाही त्याच्या जवळ पुरेसे पैसे नसायचे. एक दिवस तर माझ्या नवऱ्याने त्याला खूप दाटलं. त्याच्या गरिबीचा अपमान केला. त्याला खूप टाकून बोलला माझा नवरा. मी फक्त मागे उभी राहून पाहत होती. ऐकत होती. नवऱ्यासमोर मला काही बोलता येणं शक्य नव्हतं. पण टपरी बंद होण्याआधी मी त्याला, माझ्या नवऱ्याची नजर चुकवून उरलं सुरलं खायला दिलं. मग मी त्याला रोज उशिरा यायला सांगीतलं. तो आला की नवऱ्याची नजर चुकवून मी रोज त्याला खायला देऊ लागले.

काही वेळा तर खाता खाता त्याचे डोळे भरून यायचे. एका रात्री तर त्याने मला एक विचित्रच प्रश्न विचारला. तो म्हणाला ' कधी काळी मी जर

श्रीमंत झालो तर असा क्रूर होऊ नये म्हणून मी काय करायला पाहिजे?' आणि मग मी म्हणाले, ह्या भुकेची चव, ह्या भुकेची जाणीव कधीच विसरू नको.'

अनेक वर्षानी आपल्या कठोर परिश्रमानी व मेहनतीनं संग्राम सेठ खूप श्रीमंत झाले. पण इतके श्रीमंत झाल्या नंतर ही ते रोज संध्याकाळी माझ्या ह्या टपरीवर येत राहिले. माझ्या नवऱ्याच्या मृत्यू नंतर मीच इथलं सर्व काही पाह्यला लागले. ते रोज संध्याकाळी इथे खायला यायचे ते त्यांना हे खाद्य पदार्थ आवडायचे म्हणून नाही, किंवा त्यांना इथली सवय झाली होती म्हणून नाही, तर आपल्या ह्या आत्ताच्या ऐश्वर्यात, श्रीमंतीत आपल्याला त्या गरिबीच्या दिवसांचा विसर पडू नये म्हणून. रोज त्याची आठवण राहावी म्हणून. पडत्या पावसातल्या त्या भुकेची आपल्याला झालेली जाणीव टिकून राहावी म्हणून, त्या भुकीची चव हरवू नये म्हणून. ही श्रीमंती आपल्या डोक्यात चढू नये म्हणून."

सर्व ऐकणारे स्तब्ध झाले. एक विचित्र शांतता त्या एवढ्या मोठ्या समुदायाला चूप करून गेली. शांताबाई पुढे म्हणल्या ' ही एवढी अलोट संपत्ति त्यांनी माझ्यासाठी नाही सोडली काही. ज्या कारणासाठी त्यांनी ही सोडली आहे त्याच साठी हिचा उपयोग होईल ' हळू हळू लोक पांगले.

पुढच्या महिन्यातच त्या टपरीच्या आजूबाजूची सर्व जागा शांतबाई ने विकत घेऊन तिथे एका भव्य इमारतीचं काम सुरू केलं. ते काही कोणत्या मोठ्या हॉटेल साठी नाही की एखाद्या मोठ्या मॉल साठी माही. तिथे होणार होतं एक मोठं कम्युनिटी सेंटर व एक भव्य फूड कोर्ट. सर्व गरीबांसाठी. सर्व भुकेल्यांसाठी. मोफत. आता त्या शहरातलं कोणीही उपाशी पोटी झोपू नये म्हणून केलेली ती मोठी योजना होती.

शेवटचं खोटं

रुबी हॉस्पिटलच्या 307 नंबर च्या रूम मध्ये पलंगावार कमला मेहता आपला शेवटचा श्वास घेत पडल्या होत्या. डॉक्टरांनी सगळ्या नातेवाईकांना सांगीतलं होतं की आता त्या जगण्याची काही आशा नाही. त्यांचे पती राजीव मेहता त्यांचा मुलगा अनिल आणि मुलगी नैना व इतर नातेवाईक हळू आवाजात त्यांच्या रूम मध्ये बोलत होते. गेली 40 वर्षा सर्व कुटुंबाला एकत्र धरून ठेवणाऱ्या कमलाबाईंवर सगळ्याचा फार जीव होता. आता पलंगावर शेवटच्या घटका मोजणाऱ्या त्यांची साडी अत्यंत टापटिपेने नेसलेली, केसांचा आंबाडा व्यवस्थित बांधलेला होता. अगदी मरतेवेळी ही व्यवस्थित आणि शांत दिसत होत्या त्या. तशा त्या नेहमीच टापटिपेने राह्यच्या. दवाखान्यातल्या मशीन्सचा व बाहेर पडणाऱ्या हलक्या पावसाचा हळू आवाज येत होता. त्या बरोबर् च त्यांच्या हळू आणि अनियमित श्वसनाचा आवाज येत होता. सर्वजण रूम मध्ये स्तब्ध उभे होते.

मध्यरात्रीच्या सुमारास कमलबाईंनी डोळे किलकिले केले व त्या हळू आवाजात म्हणल्या फक्त अनिल सोडून सर्वजण बाहेर जा. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व बाहेर गेले व जाता जाता त्यांनी हळूच दार अडवं करून घेतलं. जाण्यापूर्वी नैना अनिलला म्हणाली, ‘गरज पडली तर

आम्हाला बोलावं०' छताकडे पाहत हळू आवाजात कमलाबाई बोलू लागल्या. 'एका गोष्टी बद्दल मी खोटं बोलत राहिले आणि तुला अंधारात ठेवलं अनिल.' 'आता काही जास्त बोलू नको आई; अनिल म्हणाला. 'नाही मी बोललंच पाहिजे आणि तू ऐकलं पाहिजे.' आपल्या कापत्या हातांनी त्यांनी बाजूचं ड्रावर उघडलं आणि आतून एक सीलबंद पाकीट काढून अनिल च्या हातात दिलं. 'मी मेल्यानंतर तू हे पाकीट तुझ्या बाबांना दे.' कमलाबाई म्हणाल्या. 'काय आहे ते?; अनिलनं विचारलं . 'एक सत्य' त्या म्हणल्या. 'सत्य? कुठलं सत्य? कशाचं सत्य?'अनिलनं विचारलं . तो त्यांच्या बाजूला जाऊन बसला. डोळ्यात पाणी आणून त्यां म्हणाल्या 'तू राजीवचा मुलगा नाहीस'. सर्व एकदम शांत झालं. अनिलनं बुचकळ्यात पडून त्यांच्याकडे पाहिलं. 'नाहीऽऽ' तो एकदम म्हणाला. कमलबाईंनी डोळे मिटले व त्या सांगू लागल्या-'माझ्या लग्न अगोदर मी कबीरशी प्रेम करत होते. आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो होतो. तो दुसऱ्या जातीचा असल्यानं माझ्या आईबाबांनी आमच्या लग्नाला नकार दिला. ते म्हणाले मला त्यांना मुकावं लागेल जर मी हट्ट केला तर. नंतर माझ्या लक्षात आलं की मला दिवस गेलेले आहेत. त्याच्या दोनच आठवड्या नंतर माझं राजीव शी लग्न झालं' 'त्यांना काहीच माहीत नव्हतं?' अनिल म्हणाला. कमलाने नकारार्थी मान हलवली. 'तुझा जन्म थोडा आधी झाला आहे असं राजीवना वाटलं.' त्या म्हणाल्या. अनिल एकाएकी उभा राहिला. गेले अडतीस वर्ष तो राजीव आपले बाबा आहेत असंचं समजत होता. आणि आता त्याच्या आईनं त्या विश्वासाच्या चिंध्या करून टाकल्या. तो म्हणाला, ' तू आता का सांगते आहेस हे मला? 'कमलाबाई त्याच्याकडे पाहत म्हणल्या,' कारण खोटं काही दिवसांनी सडू लागतं. ते जास्त दिवस टिकत

नसतं. ' तू त्यांना सांगायला हवं होतं ' तो रागानं म्हणाला. कमलबाईंनी फक्त मान डोलावली. अनिलने दोन्ही हातानं आपल डोकं घट्ट दाबलं. तो वडलांचा फार लाडका होता, हे सर्वांना माहीत होतं. आपला बिझिनेस, अनिलचं शिक्षण ह्याच्यासाठी त्यांनी आपलं सर्व आयुष्य खर्ची घातलं होतं. आणि आता हे सत्य? त्याला वाटलं बाबांना कळलं तर ते कोलमडून जातील. 'नको देवूस त्यांना ते पाकीट' कमलाबाई म्हणल्या. ' पण आत्ताच तर तू म्हणालीस---'अनिल बोलला. 'मी मरण्यापूर्वी मला ते कोणाला तरी सांगायचं होतं' त्या म्हणल्या. 'पण तुझ्या बाबांनी तुझ्यावर खूप प्रेम केलं.' 'मग कशाला हे सर्व लिहलं तू?' तो म्हणाला. आयुष्यात पहिल्यांदा त्याला आपली आई फार लहान व सामान्य वाटली. थोड्याच वेळात कमलाबाईचा जीव गेला. सर्व अन्त्य विधी पार पडले.सगळे कमलबाईंची खूप तारीफ करत होते. त्यांचा त्याग, त्यांची माया हयाबद्दल बोलत होते.

ते पाकीट अनिलच्या कोटाच्या खिशात तसंच पडून होतं. तीन दिवस त्याला धड झोप लागली नाही. मग चवथ्या रात्री तो राजीवच्या खोलीत गेला. ते कमलाचा फोटो हातात घेऊन खिडकीजवळ बसले होते. 'तुम्ही झोपा आता बाबा' अनिल त्यांना म्हणाला. हलकंसं हसत राजीव म्हणाले 'चाळीस वर्ष एकत्र होतो आम्ही. मला अजूनही कळत नाही की तिच्याविना मी एक दिवस तरी राहू शकेल का?' अनिल ला ते शब्द बोचले' खिशातलं पाकीट त्यानं जोरानं चुरगळत बाहेर काढलं. 'आता बाबांना सत्य कळलं च पाहिजे.' असं पुटपुटत तो पुढे आला व म्हणाला 'बाबा तुम्हाला एक विचित्र गोष्ट माहीत आहे का?' 'हो. तू जेव्हा जन्मलास तेव्हाच मला सगळं माहीत होतं' राजीव म्हणाले'. 'काऽऽय?'

अनिल ओरडला. राजीव त्या फोटोकडे एकटक पाहत बोलू लागले. ‘ तुझ्या आईनं लग्ना पूर्वीच हे सगळं मला सांगीतलं होतं.’ अनिल च्या हातातून ते पाकीट खाली पडलं. तो म्हणाला, ‘तिने तुम्हाला सांगीतलं होतं?’ राजीव पुढे सांगू लागले. ‘खरं म्हणजे तिला हे लग्नचं रद्द करायचं होत. असं खोट्यावर रचलेलं जीवन मला नको आहे असं ती म्हणाली. पण तो पर्यन्त माझंच तिच्यावर प्रेम जडलं होतं. आणि तू जन्मल्यानंतर मी जेव्हा पहिल्यांदा तुला हातावर घेतलं तेव्हा तू फक्त एक निरागस मुल आहे असं मला वाटलं. तू कोणाची चूक नाही आहेस ह्याची मला जाणीव झाली. तुझ्यात कोणा दुसऱ्याचं रक्त वाहत आहे असं क्षणभर देखील मला वाटलं नाही.’ रूम मधली शांततेच आता भयाण वाटत होती. ‘मग इतके दिवस हे लपवूनच का ठेवलं तुम्ही दोघांनी?’ अनिल म्हणाला. ‘कारण अशी एक वेळ असते जिच्या नंतर खऱ्या खोट्यात काही भेद राहत नसतो. ते सत्य कळलं काय आणि नाही काय काही बिघडत नाही.’ राजीव म्हणाले’ अनिलनं ते पाकीट फोडून त्यातला कागद पाहिला. ‘तिनं तुला चॉइस दिला आहे, नाही?’ राजीव म्हणाले. अनिलनं मान डोलावली. ‘हे सत्य आपलं सगळं जीवन उधळून लावेल, आपलं कुटुंब उध्वस्त करून टाकेल, ही भीती पोटाशी बाळगूनच ती आयुष्यभर जगत राहिली.’ राजीव म्हणाले.

आणि सगळ्यात गमतीचा भाग म्हणजे ‘ मला काहीच माहीत नव्हतं अस तुला सांगणं’, हे तिचं शेवटचं खोटं.’

त्या मातीचा सुगंध

सारंगपूर हे एक छोटंसं गाव होतं. थोडासा पाऊस पडला की गावच्या मातीचा सुगंध आसमंतात दरवळत असे. पावसानं गावातल्या नाल्या वाहायला लागल्या की मुलं कागदाच्या छोट्या छोट्या होड्या करून नाल्यांच्या वाहत्या पाण्यात सोडायचे. थोडा हिवाळा संपत आला की संक्रांतीसाठी पतंग बनवण्याची लहान मोठ्यांमध्ये स्पर्धा सुरू व्हायची, एकदा का पतंग आणि त्यांच्या मांज्याच्या चकऱ्या तयार झाल्या की मुलं-माणसं घरांच्या गच्चीवरून पतंग उडवायचे. व पतंग काटण्याची स्पर्ध्याच सुरू व्हायची. पुढे होळीच्या दिवसात तर शेणाच्या चाकोल्या करून त्यांच्या माळा तयार करण्यातं मुलांना मौज वाटायची. रंगपंचमी साठी मुलं शेजारच्या जंगलात फुललेली पळसाची केशरी फुलं आणून त्याचा बादल्या बादल्याभर रंग तयार करायची.

राजेश ह्याच सारंगपूरचा राहणारा. आता मुंबईसारख्या मोठ्या शहरात मोठा व्यापारी होता, खेड्यातून घरून तो शहरात पळून आला. पुढे खूप मेहनतीनं पैसा मिळवला. चांगलं घर, गाडी घेतली. सर्व काही होतं त्याच्यापाशी, फक्त मन:शांती नव्हती. आज पंचवीस वर्षांनंतर तो आपल्या गावी सारंगपूरला चालला होता. जसं गाव जवळ आलं तसं त्यानं गावाच्या बाहेरच आपली गाडी थांबवली आणि खिडकीचा काच खाली

a
केला. तोच चिरपरिचित मातीचा सुंगध त्याच्या मनाला प्रसन्न करू लागला. त्याच्या ओठांवर हसू फुटलं आणि डोळ्यात पाणी आलं. हळूच त्यानं गाडी परत सुरू केली. गाव खूप बदललं होतं. कच्चे रस्ते पक्के झाले होते. जुनी दुकानं, घरं नवी झाली होती. पण आळीच्या शेवटी कोपऱ्यावर असलेलं त्याचं जुनं घर तसंच होतं. शांत आणि त्याची वाट पाहत असलेलं. तो घराजवळ आला घराला कुलूप होतं. कारचा आवाज ऐकून शेजारच्या आजी बाहेर आल्या. त्यांनी लगेच राजेश ला ओळखलं आणि घरातून त्याच्या घराची चाबी आणून त्याला दिली. त्यांनी राजेशाच्या तोंडावरून हात फिरवला. आजीचे डोळे भरुन आले.

' तुझ्या बाबांनी शेवटपर्यंत तुझी खूप वाट पाहीली ' आजी म्हणल्या. ते ऐकून राजेशची मान खाली गेली. पंचेवीस वर्षापूर्वी तो ह्या घराशी भांडून निघून गेला होता. त्याच्या वडिलांची खूप इच्छा होती की त्यांनी आपली गावातली शेती करावी. परंतु राजेशाला वाटत होतं की आपण शहरात जाऊन खूप मोठा माणूस व्हावं. त्याच्या बाबांचं म्हणणं होतं की शहरात जाऊन माणसं दुरावतात. आपलंपण हरवून जातं. राजेश्च म्हणनं होतं की गावात राहून सगळी स्वप्न भंगून जातात. आयुष्यात काही करता येत नाही. त्या रात्री दोघांचं खूप कडाक्याच भांडण झालं व राजेश आपली बॅग घेऊन कायमचा घराबाहेर पडला. मग त्याने मागे परतून सुध्दा पाहीलं नाही. आधीचे काही दिवस, काही महीने बाबांची पत्र यायची व तो उत्तरही पाठवायचा, पण पुढे पुढे त्यानं उत्तर देणं ही बंद केलं. आणि मग पत्रव्यवहार थांबलाच. शेजारच्या आजीने दिलेल्या चाबीने त्यानं घर उघडलं. आजी म्हणल्या, ' तुझे बाबा रोज घराची झाडपूस करायचे. म्हणायचे माझा बेटा एक न एक दिवस येईल.'

दार उघडताच राजेशचं सारं बालपण त्याच्या डोळ्या समोर उभं राहिलं. समोर तोच जुना पलंग, भिंतीवरचं तेच जुनं घड्याळ, कोपऱ्यातला तोच जुना रेडिओ. तो पुढे आला तसा त्याला खिडकीजवळ अर्धवट बनवलेला पतंग दिसला. त्यानं थरथरत्या हातानं तो पतंग उचलला. तो गेला त्याच्या आधीच्या दिवशी तो व बाबा तो पतंग बनवित होते. आणि त्याच रात्री राजेश निघून गेला व तो पतंग तसाच अर्धवट राहिला. घरच्या दुसऱ्या कोपऱ्यात एका कागदी डब्यात त्याला बरीच लिहलेली पत्र दिसली. पत्रव्यवहार बंद झाल्यावरची ती पत्र बाबांनी त्यालाच लिहली होती. त्याने एक पत्र उघडलं. त्यात लिहलं होतं,'बेटा शहर कसं आहे? इकडे पहिला पाऊस येऊन गेला. पावसापासून जप.' दुसऱ्या पत्रात लिहलं होतं, ' आज तुझी आई खूप आजारी होती. सारखं तुझं नाव घेत होती.' तिसऱ्यात लिहलं होत, 'मला माहित आहे तू नाराज आहेस. पण बेटा घराचं दार आजही तुझ्या साठी उघडं आहे.' शेवटचं पत्र वाचता वाचता त्याचे डोळे भरून आले. त्यात लिहलं होतं, 'आता आपली भेट बहुतेक होणारच नाही. एकदा आला असतास तर बरं झालं असतं. तुझा आवाज एकदा ऐकायचा होता.' ह्या पत्रावर तारीख नव्हती. त्याचे बाबा वारले त्याच दिवशीचं ते पत्र असावं. राजेश जमिनीवर बसून ओक्साबोक्सी रडू लागला. इतक्या वर्षात त्याला पहिल्यांदा जाणीव झाली की त्यानं शहर जिंकल पण तो आपलं घर हरला.

संध्याकाळ होत आली. बाहेर लहान मुलं पतंग उडवित होती. राजेशनं तो अपुरा राहिलेला पतंग हातात घेतला. व त्याला पुरं करण्यासाठी समानाची जुळवाजुळव केली. आणि तो पतंग बनवू लागला, अगदी बाबांनी शिकवला होता तसा. त्याचे डोळे पुन्हा भरून आले. पतंग

तय्यार झाल्याबरोबर, तो घेऊन राजेश वर गच्ची वर गेला. हवा बऱ्यापैकी जोराने वाहत होती. त्यानं आकाशात पतंग सोडला. पतंग वर वर होत गेला तसतसे राजेशचे आसू जास्त जास्त वाहू लागले. त्याला वाटलं आकाशातून दुरून त्याचे बाबा हसत हसत पाहत आहेत. हवे मध्ये तोच मातीचा परिचित सुगंध दरवळत होता.

शल्य

प्राध्यापक वसंतराव कानेटकरांच्या ' रायगडाला जेव्हा जाग येते ' ह्या पुस्तकाच्या सुरवातीलाच त्यांनी लिहलेलं एक गीत/एक कविता आहे. त्या गीताच्या पहिल्या दोन ओळीच सर्व सांगून जातात.

' युगायुगांची रात्र संपली,प्रभात झाली,
गिरिशिखरेही उन्हात न्हाली
सह्यगिरीच्या कुशीत निजल्या रायगडा हो जागा,
शिवरायांच्या हृदयांतरिचे शल्य मला सांगा.

हिंदूपदपातशाहीची स्थापना करणाऱ्या शिवाजी महाराजांसारख्या युगपुरुषाच्या अंत:करणालाही जन्मभर कुठलं तरी शल्य बोचत होतं.

हे संपूर्ण नाटक पाहिल्यावर आणि वाचल्यावर आपल्या लक्षात येतं की, मनमोकळेपणे आपल्या मनातलं व्यक्त न केल्यामुळे दोन युग पुरुष असलेल्या पितापुत्रामधिल गैरसमज, हे ते शल्य असावं. ह्या नाटकाचे संवाद प्रा.कानेटकरांनी खूपच भावस्पर्शी आणि सुंदर लिहले आहेत. उदाहरणा दाखल, संभाजीराजे आणि येसूबाई आणि शिवाजी महाराज आणि येसूबाई ह्यांच्या मधले दुसऱ्या अंकातील कानेटकरांनी लिहलेले संवाद

a

‘खुल्या दिलानं बोलणं न झाल्यानं मनामध्ये वाढत गेलेली तेढ, निर्माण झालेले दुरावे- हे आणि आणखी काही प्रसंगी पितापुत्रामध्ये निर्माण झालेले गैर समज, हे, ते खुपणारं शल्य असावं,’ “आमच्या जुन्या जखमा अद्याप भळभळा वाहताहेत इथं’ हे येसुबाईंजवळ शंभुराजांनी प्रकट केलेलं दुखणं, किंवा ,”राजांच्या पाठीवरून पित्याच्या ममतेचा आमचा हात कधी फिरला नाही. ‘ हे आणि “ शिवाजीला दूसरा शिवाजी घडवता आला नाही, हे शिवाजीच्या हृदयातलं फार मोठं शल्य आहे हंबीर. “ असं खुद्द शिवाजीमहाराजांनीच हंबीरराव मोहितेंना सांगणं हे किती मोठं शल्य होतं. महाराजांसारख्या किंवा संभाजीमहाराजांसारख्या युगपुरुषांना देखिल शेवटच्या क्षणापर्यंत बोचणारी ही शल्य होती. पितापुत्रामध्ये असलेले गैर समज, त्यांची टोचणी, ही, तुम्हा आम्हा सारख्या अनेक सामान्यांनी शेवट पर्यन्त भोगली आहेत.

मी अधून मधून यू ट्यूब वर काही शॉर्ट फिल्म्स पाहतो. कधी त्या माझ्या कोणी मित्रानं रिकमेंड केलेल्या असतात तर कधी अनायासे पाहण्यात येतात. काही महिन्यापूर्वी, ओढ, आमाद, काश अशा तीन चार शॉर्ट फिल्म्स पाहिल्या. ‘ आमाद ‘ ही ह्या विषयाशी निगडीत असलेली होती. ‘ आमाद ‘म्हणजे आगमन, Arrival. असंच, वेळीच मोकळेपणी न बोलल्यानं, थोडंसं झुकतं न घेतल्यानं झालेली दुखणी मृत्युच्या दारापर्यंत माणसाला कशी बोचत राहतात हे अतिशय सुंदर रितीनं ह्या फिल्म मध्ये दाखवलं आहे. अगदी आसन्नमरण अवस्थेत असलेल्या बापाला भेटायला विदेशात असलेला त्याचा मुलगा येतो. घरात फक्त आई-बाबाच असतात. त्याचे बाबा हे एक नावाजलेले नर्तक असतात॰ आल्याआल्याच तो मुलगा आपल्या आसन्नमरण पित्याच्या पलंगपाशी जावून त्यांचा हात आपल्या

हातात घेण्याचा प्रयत्न करतो, पण त्या अवस्थेतही बाप आपला हात मागे ओढून घेतो. तिथून खिन्नपणे उठून हा मुलगा आपल्या बेडरूम मध्ये जाऊन जेव्हा आपलं कपाट उघडतो तेव्हा त्याला समोरच आपली घुंगरांची पेटी दिसते आणि त्याला मागचं सर्व आठवतं. त्याचे बाबा आपल्या घरी बऱ्याच मुलींना भरत नाट्यम शिकवत असतात. आपल्या मुलानंही भरत नाट्यम शिकावं, त्यात पारंगत व्हावं असं त्यांना वाटतं. म्हणून त्या मुलींबरोबर आपल्या मुलालाही ते शिकवतात. पण त्या मुलाचे मित्र त्याला चिडवतात. शिवाय मुलाला मुळातच पाष्च्यात्य नृत्याची आवड असते. त्याचे वडील त्याला एक दिवस आपल्या गुरूसमोर नृत्य करून दाखवायला सांगतात, तेव्हा हा त्यांच्या समोर पाश्चिमात्य नृत्य करतो. त्यामुळे ते गुरु आणि त्याचे वडील खूप दुखावले जातात. त्या मुलाची आई त्याला जेव्हा म्हणते ' तुम्हें शर्म नहीं आयी ऐसा करते हुये? पहले पापा की माफी मांगो। ' तेव्हा तो मुलगा म्हणतो ' मै क्यू पापासे माफी मांगू? मैंने पहले ही बोला था मुझे भरत नाट्यम पसंद नहीं। 'आणि तावातावाने निघून जातो. त्या वेळी त्याचा बाप आईला म्हणतो ' रहने दो। माफी मांगने के लिए, गलती का अहसास होना जरूरी है। ' तिथेच मनात पडलेली आढी मरण येईतोवर तशीच राहते. शेवटपर्यंत ते दुख: सलत राहतं. त्याच वेळी मनमोकळे पणानं मुलानं माफी मागीतली असती, अन् तितक्याच मनमोकळेपणानं बापानं ती दिली असती तर हे सर्व तिथेच विरून गेलं असतं. पण हीच खरी मनुष्य स्वभावाची कमजोरी आहे. म्हणून तर ही बोचरी शल्य आयुष्यभर बोचत राहतात. हे रेग्रेट्स शेवटच्या क्षणीही अस्वस्थ करतात॰ अन् ह्या ओझ्यानं मरण भारी होतं. अनेकांच्या जीवनात हे घडतं. Bronnie Ware नं 'The Top Five Regrets' ह्या

तिच्या पुस्तका मध्ये एका ठिकाणी म्हटलं आहे-‘ They say that we do more to avoid pain than we do to gain pleasure. So it is when the pain becomes too much that we finally find the courage to make changes. “ आपल्या दुखा:नाच आपण खूप गोंजारत बसतो. त्यांना विसरून आनंदी होण्याचा फारसा प्रयत्नच आपण करत नाही॰ आणि मग, “ आपण त्या वेळी सष्ट बोललो असतो तर, किंवा तसं बोललो नसतो तर, किंवा तसं वागलो नसतो तर, हे रेग्रेट्स, हे खेद, ही खंत, अंत् समयी मनावरचं ओझं वाढवतात.

बहुतेकांचं दुसरं रिग्रेट म्हणजे. ज्या लोकांवर आपण प्रेम केलं, जे आपल्याला आवडले, त्यांच्या बरोबर आपण पुरेसा वेळ राहिलो नाही किंवा त्यांना पुरेसा वेळ दिला नाही हे॰ आपण ज्यांच्यावर प्रेम करतो, त्यांच्या बरोबर घालवलेला प्रत्येक क्षण भरभरून जगणं ही सुखी आणि खंतहिन (Regret free)

जीवनाची गुरुकिल्ली आहे. मला वाटतं, मी वाचलेललं, “ The Top Five Regrets Of the Dying “ अशी पुस्तकं, असं लेखन, त्याचं वाचन, आणि अशा विषयावरचं, अनुभवी आणि जाणकारांच प्रबोधन हे निश्चित, आपलं हे ओझं, हलकं करायला मदत करतात॰ पुढच्याची ठेच, मागच्याला शहाणं करते.

a

न पुसता येणाऱ्या आठवणी

त्या गावाच्या जुन्या वस्तीत ते पोस्ट ऑफिस होतं. भिंतींचा रंग उतरला होता. खिडक्या दारं उघडतांना किरकिर करत होते. आत जुन्या कागदांचा आणि जुन्या शाईचा वास येत होता. तिथल्याच एका कोपऱ्यात बसायचे पोस्टमन दामोदरकाका. पांढरे केस, डोळ्यावरचा जाड चश्मा आणि कापत असलेले हात. आणि चेहरा शांत, सुन्न. चाळीस वर्षापर्यन्त त्यांनी अनेकांपर्यंत खुशीचे संदेश पोहचवले. कधी मुलाचं बापाला आलेल पत्र, कधी एखादी लग्न पत्रिका, तर कधी कोणाला नोकरी मिळल्याच पत्र. पण एक पत्र असं होतं जे, ते कधी पोहचवू शकले नाही.

त्या दिवशी जोराचा पाऊस येत होता. दामोदरकाका पोस्ट ऑफिस चे जुने रेकोर्ड्स चाळत होते. छाननी करता करता अचानक त्यांच्या हाती पिवळा पडलेला एक जुना लिफाफा लागला. त्यांचे हात थांबले. त्या लिफाप्यावर लिहलं होतं " गायत्रीसाठी " आणि खाली लिहलं होतं, कॅप्टन दिनेश्कुमार. दामोदरकाकांचा श्वास भारी पडला. 25 वर्षापूर्वीचं ते एक पत्र होतं. त्तेच पत्र, ज्यामुळे त्यांना रात्र रात्र भर नीट झोप यायची नाही.

साल 2001, कारागिल युध्दानंतरचा काळ.- कॅप्टन दिनेशकुमार सुटीवर घरी येणार होते. युध्दावर जाण्या आधी त्यांनी आपली बायको

गायत्रीच्या नावाने एक पत्र लिहलं होतं. तो दामोदर काकांना म्हणाला होता, ' जर मी हे पत्र तिला देऊ शकलो नाही तर तुम्ही हे पत्र गायत्रीला द्या. ' हसत हसत दामोदरकाका बोलले होते, 'अरे असे शब्द तोंडातून काढू नका. तुम्हीच हे पत्र गायत्रीला द्याल.' परंतु नशीब चोरून हे ऐकत होतं. दोनच दिवसांनंतर बातमी आली की कॅप्टन दिनेश कुमार युध्दात मारले गेले. संपूर्ण गाव रडलं. गायत्री तर ती बातमी ऐकताच बेशुध्द होऊन पडली. आणि दामोदरकाका तर जसे कोलमडूनच गेले. ते कितीतरी वेळा गायत्रीच्या घरी गेले. पण दारापर्यंतच. पुढे आत जाण्याची त्यांची हिम्मत होईना. त्यांना वाटायचं ज्या बाईचं नशिबच फुटलं आहे तिला हे पत्र देऊन ते कसं सावरणार.

हळू हळू काही वर्ष निघून गेली. पोस्ट ऑफिस बदललं, तिथली माणसं बदलली. पण ते पत्र मात्र दामोदरकाकांच्या टेबलाच्या ड्रावर मध्ये तसंच होतं. एका रात्री दामोदरकाकांचा डोळ्याला डोळा लागेना. पुन्हा पुन्हा त्यांच्या डोक्यात तोच प्रश्न घोंगावत होता. 'गायत्रीचं वाट पाहणं अजूनही सुरू असेल तर?' सकाळ होताच त्यांनी निर्णय घेतला. आता ते पत्र त्याच्या गंतव्या(मंजिल) पर्यन्त पोहचलंच पाहिजे.

गायत्री आता गावाच्या एका कोपऱ्याच्या लहानशा घरात एकटी राहायची. दामोदरकाका जेव्हा तिथे पोहचले तेव्हा त्यांचे पाय कापायला लागले. दार उघडलं. समोर कोमेजल्या चेहऱ्याची, सर्व केस पांढरे झालेली पण शांत चेहऱ्याची गायत्री त्यांना दिसली. तिने त्यांना ओळखलं. 'अरे, दामोदरकाका तुम्ही?' ती म्हणाली. 'कशी आहेस गायत्री?' काकांनी विचारलं. 'जसं धडधडत नसलेलं, ठोके बंद पडलेलं हृदय असतं तशी' गायत्री म्हणाली. खोलीत शांतता पसरली. थोड्या वेळानं गहिवरलेल्या

आवाजात काका म्हणाले ‘कॅप्टन दिनेशचं हे शेवटचं पत्र. जे मी तुला कधी देऊच शकलो नाही.’ घरात क्षणभर काळ थांबला. गायत्री जमिनीवर बसली. तिचे हात कापत होते. तिने तो लिफाफा हृदयाशी धरला. बराच वेळ तो, ती उघडू शकली नाही. थोड्या वेळानं तिनं तो कापत्या बोटानं उघडला. आत लिहलं होतं-

प्रिय गायत्री,

जर तू हे पत्र वाचत असशील तर त्याचा अर्थ आहे मी परत येऊ शकलो नाही. मला मरणाची भीती नाही. मला भीती वाटते ती ह्याची की तू एकटी होऊन जाशील. ऐक, जर मी नाही राहिलो तर तुझे हे अश्रु जास्त दिवस डोळ्यातं राहू देऊ नकोस. नाही तर ते तुझा चेहऱ्यावरचं हसू हिराऊन नेतील. आणि हो आपल्या घरच्या आंगणात जे लिंबाच झाड आहे नं? त्याच्या खाली बसून माझी आठवण करत जा, मी हवा बनून तिथे येत राहीन.’

गायत्रील रडू कोसळलं. 25 वर्ष सांभाळलेलं दु:ख कागदावरून वाहायला लागलं. पत्राच्या शेवटी लिहलं होतं, ‘मी नक्की परत येईन. तू काढलेल्या आठवणीतून, किंवा एखाद्या पावसाळ्यात पावसा बरोबरस, नाही तर मग ह्या पत्रातून मी नक्की येईन.’

संध्याकाळ होत आली होती. आंगणातलं कडूलिंबाचं झाड हवेनं हालत होतं. गायत्री आता त्या झाडाखालीच बसलेली होती. हातात तेच पत्र घेऊन. दूर उभे राहून दामोदरकाका ते बघत होते. अनेक वर्षांनंतर त्यांच्या चेहऱ्यावर एक हलकं हसू उमटलं होतं. त्यांचे डोळे ओले झाले, पण काळीज हलकं झालं होतं. काही आठवणी कधीच पुसल्या जात नाहीत. एका पत्रानं ही त्या जागृत होतात.

भाड्याची खोली

शहाराच्या मुख्य रस्त्याच्या थोडं पुढे गेलं की एक गल्ली होती. त्या गल्लीच्या शेवटच्या टोकाला एक, दोन मजली जुनं घर होतं. भिंतीच प्लास्टर कुठे कुठे पडलेलं, घराचा रंग उडलेला, आत व्हरांड्यात एक जुना पंखा फिरत असलेलं ते घर होतं. घराच्या दारा बाहेर एक हाताने लिहलेला बोर्ड होता. त्यावर 'खोली भाड्याने देणे आहे' असं मोठ्या अक्षरात लिहलेलं होतं. त्या घरातल्या काही खोल्यांमध्ये आधीच काही विद्यार्थी भाड्याने राहायचे. एक खोली अजून रिकामीच होती. घर मालक, अगदी कमी भाड्याने त्या खोल्या फक्त विद्यार्थ्यांनाच भाड्याने द्यायचे. त्यातल्या त्यात कोणी विद्यार्थी जर खेड्यातून शहरात शिकायला आला असेल तर त्याला ते भाड्यात आणखी सवलत द्यायचे. घरमालकाचं नाव होतं सदाशिव. बरंच वय झालेले ते गृहस्थ, नेहमी पांढरा शर्ट पायजामा घातलेले असायचे. त्यांचा चेहरा शांत होता व ते बोलायचेही कमी. लोक म्हणायचे, 'म्हातारा माणूस आहे त्याला काही फारसा हिशोब ठेवता येत नाही म्हणून कमी भाड्यात खोल्या देतो.' पण वस्तुस्थिती काही वेगळीच होती.

जुलैचा महिना सुरू झाला आता कॉलेज ही सुरू होणार होतं. एक दिवस खेड्यातून आलेला एक मुलगा खोली पाहत पाहत तिथे पोहचला.

a
त्याचं नाव होतं अरुण. त्याच्या हातात एक छोटीशी सुटकेस होती. व एका बगलेत एक फाइल होती. त्याने घराच्या दाराची कडी वाजवली. आतून आवाज आला. ' कोण आहे? दार उघडंचं आहे. ये, आत ये.' अरुण आत आला. समोर एका पलंगावर सदाशिवकाका पेपर वाचत बसलेले होते॰ 'मला खोली भाड्याने हवी आहे.' अरुण त्यांना म्हणाला. कुठून आलास तू?' सदाशिवकाकांनी विचारलं. अरुणनं त्यांना आपल्या खेड्याच नाव सांगीतलं. 'शिकायला आला आहेस?' काका त्याला म्हणाले. अरुणनं होकारार्थी मान खालीवर केली. 'पैसे किती आहेत तुझ्याजवळ?' सदाशिवकाकानं त्याला विचारलं. 'फक्त दोन महीने पुरतील इतके आहेत.' अरुण म्हणाला. 'वरची खोली रिकामी आहे. जा वर पाहून घे. आणि आवडली तर जे पैसे तुला द्यायचे आहे ते दे' काका म्हणाले.. वर एक छोटीशी खोली होती. एक खिडकी, आत एक लोखंडी पलंग, एक जुनं टेबल व एक स्टूल होतं. पण अरुणसाठी ती खोली म्हणजे एक महालच होता. त्याच रात्री त्यानं आईला कळवलं की राहण्याची व्यवस्था झाली आहे. असेच दिवस चालले होते. हळू हळू अरुण च्या लक्षात आलं की सदाशिवकाका हे केवळ घरमालकच नाही आहेत. त्यांचं प्रत्येकाकडे लक्षं असतं. ते प्रत्येकाची काळजी पूर्वक चौकशी करतात कोणाला काही लागलं तर देतात. एखाद्या वेळी कोणी आजारी पडलं तर रात्रभर जागतात. काही वेळा न सांगता एखाद्या खोलीसमोर चहा ने भरलेला कप ठेवून जातात. आणि ह्या बदल्यात त्यांना काही ही नको असतं. एका रात्री अरुण उशिरापर्यंत वाचत होता. त्याला रात्री खोकल्याचा आवाज आला म्हणून तो काकांना पाणी द्यायला गेला. भिंतीवर टांगलेल्या एका तरुणाच्या फोटोकडे त्याचं पहिल्यांदा लक्ष गेलं. त्याच्या गळ्यात कॉलेजचं

ओळखपत्र/आय.डी.कार्ड लटकत होतं. अरुण नं काकांना विचारलं, 'काका हा कोणाचा फोटो आहे?' काका त्या फोटो कडे थोडावेळ पाहत राहिले व मग म्हणाले, ' तो माझा मुलगा आदित्यचा फोटो आहे. खूप हुशार होता तो. खेड्यातून शहरात शिकायला आला होता. पहिल्यांदा घर सोडून आमच्यापासून दूर गेला होता तो. ज्या वेळी फोन करायचा तेव्हा नेहमी म्हणायचा बाबा इथे फार एकटं वाटतं. एक दिवस त्याला खूप ताप आला. पैसे वाचवण्यासाठी डॉक्टर कडे गेला नाही. जो पर्यन्त आम्हाला कळलं तो पर्यन्त खूप उशीर झाला होता. त्या आजाराने त्याचा प्राण घेतला.' घरात शांतता पसरली. फक्त घड्याळाची टिक टिक ऐकायला येत होती. काका पुढे म्हणाले 'त्या दिवशी माझ्या लक्षात आलं की मोठ्या शहरात खोलीचं भाडं ही सगळ्यात महाग वस्तु नाही, आपलेपणा ही सर्वात महाग वस्तु आहे.'

त्या रात्री अरुणचा डोळ्याला डोळा लागला नाही. आता त्याच्या लक्षात आलं की सदाशिवकाका प्रत्येक मुलामध्ये आपल्या मुलाला का शोधतात. त्या घरात राहणाऱ्या प्रत्येक मुलाचं काकांशी एक आपुलकीचं नातं निर्माण होत असे. अशी किती तरी मुलं त्या घरात राहून गेली. पास होऊन पुढे चांगल्या नोकरीवर लागली. कोणी ऑफिसर झाला तर कोणी प्राध्यापक झाला. कोणी आपला व्यवसाय सुरू केला. पण त्यातले अनेक जण दिवाळीच्या वेळी त्या घरात जमायचे. कोणी मिठाई आणायचा. कोणी नवा पंखा बसवून द्यायचा तर कोणी काकांची औषधं घेऊन यायचा.

मग एका हिवाळ्या रात्री काकांची प्रकृती फार बिघडली. अरुण त्याच शहरात नोकरी करत होता. त्याला जेव्हा काकांच्या आजाराबद्दल कळलं, तेव्हा तो ताबडतोब आला आणि त्याने लगेच डॉक्टरला आणलं.

डॉक्टर म्हणाले ‘त्यांना ॲडमिट करा. त्यांचं वयही आता फार झालं आहे. फार दिवस जगतील असं वाटत नाही. कोणा ओळखीच्यांना बोलवायचं असेल तर बोलाऊन घ्या.’ अरुण ने एका जुन्या भाडेकरुला फोन केला. मग एका पासून दुसऱ्याला, दुसऱ्या पासून तिसऱ्याला असं बऱ्याच जणाना काकांच्या प्रकृतीबद्दल कळलं. वेगवेगळ्या ठिकाणाहून बरेच जण आले॰ दुसऱ्यादिवशी दवाखान्याची खोली भरली. सदाशिव काकांनी आपल्या सुकलेल्या डोळ्यांनी सर्वांकडे पाहीलं. आता मात्र त्यांच्या डोळ्यात पाणी आलं. अरुण ने त्यांचा हात हातात घेतला व तो म्हणाला, ‘ काका तुम्ही फक्त खोल्या भाड्यांनी नाही दिल्या, तुम्ही आम्हा सर्वांना घर दिलं.’

काकांचे अश्रु आता वाहू लागले. ’जीवनात पहिल्यांदा त्यांना जाणवलं की आपला मुलगा आपल्यापासून दूर गेलेला नाही. आपल्याकडे आपल्या खोल्यांमध्ये राहिलेल्या आणि इथे आलेल्या ह्या प्रत्येकाच्या रुपानं तो जीवंत आहे. आपण एकटे नाही

फ्रेशर्स नाइट

अमरावती ईंजीनिअरिंग कॉलेजमध्ये नऊ वर्ष नोकरी झाल्यानंतर मला आमच्या तंत्र शिक्षण विभागाने आय आय टी बॉम्बे मध्ये एम. टेक च्या अभ्यासासाठी दोन वर्षासाठी पाठवलं. प्रवेश मी माझ्या बळावर मिळवला. माझं लग्नही झालेलं होतं अन् मला तीन वर्षाची मुलगी होती, पण गेल्या गेल्याच आपल्या अभ्यासात व्यत्यय नको म्हणून मी पहिलं सेमिस्टर एकट्याने जायचं आणि होस्टेलमध्ये राहायचं असं ठरवलं. माझ्या बायकोलाही ते पटलं. मग मी आयआयटी पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांच्या हॉस्टेल मध्ये प्रवेश घेतला. त्यात सर्व एम.टेक. आणि पीएच.डी। करणारे विद्यार्थी राहायचे. आम्ही नवीन लोकांनी हॉस्टेलमध्ये राहायला सुरुवात केल्यानंतर साधारण दहा-बारा दिवसानंतर सीनियर विद्यार्थ्यांनी फ्रेशर्स नाईटचं आयोजन केलं. आम्ही साधारण पस्तीस-चाळीस फ्रेशर्स होतो. सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावं अशी सूचना कम निमंत्रणं आम्हाला मिळाली. संध्याकाळी आमच्या कॉमन हॉलमध्ये थोडा करमणुकीचा कार्यक्रम अन् नंतर सर्वांची ओळख असा तो कार्यक्रम होता. व नंतर मेस मध्ये सर्वांना फिस्ट आयोजित केली होती. सर्वजण जमल्यानंतर सुरुवातीला प्रत्येकानं समोर येऊन आपली पूर्ण ओळख

करून द्यावी व त्याला आवडेल ते आयटेम करून दाखवावं असं सांगण्यात आलं. म्हणजे गाणे, डान्स, मिमिक्री, कविता पाठ यापैकी काहीही चालेल. मग कुणी गाणी म्हटली, कुणी सिनेअभिनेत्यांचे आवाज काढले. माझी पाळी आली तेव्हा मी माझी एक हिंदी कविता म्हणून दाखवली. कविता विनोदी नव्हती. थोडी गंभीर स्वरूपाची होती. पण ती सर्वांना आवडली. इतर काही कार्यक्रम झाल्यानंतर डिनरला जाण्यापूर्वी त्या कार्यक्रमाच्या कम्पेअरनं अनाउंस केलं की आता फ्रेशर्सची फॅशन परेड होईल. सालाबादाप्रमाणे त्या परेड मधून हॉस्टेल क्वीन निवडण्यात येईल. दोन सीनियर एम.टेक. वाल्यांना ज्युरी म्हणून ठरविण्यात आलं. ते खुर्च्यांवर बसले. मध्यभागी दोन मोठे टेबल आणि त्याच्या भोवती आम्ही सगळ्यांनी हळूहळू चालत राऊंड घ्यायचा असं ठरलं. त्या दोन ज्युरींपैकी एक विर्दी नावाचा सरदार होता. मी दोन राऊंड मारले आणि बिर्दी म्हणाला" मिस्टर जाजू इज हॉस्टेल क्वीन ऑफ द इयर. त्या दिवशी मी एक काळा पेंट अन् वर ठिपक्या ठिपक्यांचा पांढरा मनिला परिधान केला होता. त्या वेळी मी शोले मधल्या अमिताभ बच्चन सारखे लांब केस ठेवायचो. तेव्हा ती फॅशनच होती. मला वाटलं कदाचित या सर्व गोष्टींनी मला होस्टेल क्वीन बनवलं. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. नंतर डिनर झालं, आणि कार्यक्रम संपला.

दुसऱ्या सेमिस्टर मध्ये मला फॅमिली अकामोडेशन मिळालं म्हणून मी होस्टेल सोडलं. माझा पहिल्या सेमिस्टरचा निकाल खूप चांगला लागला. मग माझा आत्मविश्वास वाढला.दुसऱ्या सत्रात मी माझी बायको आणि मुलगी असे एका छोट्या क्वार्टर मध्ये शिफ्ट झालो. पुढे मार्च महिन्यात होस्टेल वन मध्ये म्हणजे आमच्या होस्टेलमध्ये हॉस्टेल डे साजरा

होणार होता. त्या वेळी आमच्या होस्टेलचे सेक्रेटरी आणि त्याचे दोन मित्र मला निमंत्रण द्यायला माझ्या घरी आले. ते म्हणाले जाजू साहेब आपको और भाभी जी को कार्यक्रम को आना है. आपको तो आना जरुरी है, क्यु की प्राईज डिस्ट्रीब्युशन होता है, तब सबसे पहला प्राईज, हॉस्टेल क्वीन कोही दिया जाता है. थोडे कल्चरल प्रोग्राम है. बाद में डीनर है. हम अपने डायरेक्टर साहेब और कुछ विभाग प्रमुखकोभी बुलाते है. इसलिये जरूर आना जाजू साब. मी म्हटलं " शुअर. इट विल बी अ ग्रेट फन. विल कम डेफिनेटली" कार्यक्रमाच्या दिवशी संध्याकाळी मी माझी बायको, मुलगी आम्ही हॉस्टेलला गेलो. आमचे डायरेक्टर प्रमुख पाहुणे होते. काही निमंत्रित अध्यापक आले होते. बक्षीस समारंभ सुरू झाल्यानंतर पहिलं नाव माझं पुकारण्यात आलं. मिस्टर जाजू द क्वीन ऑफ होस्टेल प्लीज कम. मी माझं प्राईज घेतलं. माइक वर गेलो. आणि मला दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती केली. आमचा अँकर म्हणाला " व्हाय नॉट? कम ऑन." मग मी माईक वर गेलो आणि म्हणालो की आता मी तुम्हाला माझ्या निवडीचे रहस्य सांगतो. आणि त्याच्यासाठी मी दोन शेर म्हणणार आहे. पहिला शेर मिर्झा गालिब यांचा आहे आणि दुसरा माझा स्वतःचा. मिर्झा गालिब यांनी म्हटलं आहे-

" आईना देख के मुंह अपना सा लेकर रह गए, हुजूर को अपना दिल न देने पर कितना गुरूर था,

काशीद को अपने हाथ से गर्दन न मारीये , उसकी खता नहीं है यह, तेरा कसूर था.

इसका मतलब यह है की हुजूर अपने आप को बहुत स्मार्ट और तीस मार का समझते थे. लेकिन जब उन्होंने आईना देखा तब अपनी सूरत

देखकर वह अपना सा मुंह लेकर रह गए. उनको आईने पर गुस्सा आया और उन्होंने आईने को पत्थर फेंक कर तोड़ना चाहा. तब गालिब ने कहा है की भाई, तुम जैसे हो वैसे ही आईने ने दिखाया है. वह तो एक संदेशवाहक यानी काशीद है. उस पर क्यों बिगड़ रहे हो?

दोस्तों इसके बाद मैं अपना एक शेर सुनाता हूं--

" आईना देखकर अपने आप पर गुरुर आया, के इस बदसूरती पर भी हुस्न का सुरूर आया.

पर अंदर की बात बता देता हूं दोस्तों, के हमें ब्यूटी क्वीन चुनने में एक सरदार का दिल दिमाग काम जरूर आया."

दोस्तों जिस दिन हमारी फैशन परेड हुई और मुझे हॉस्टल क्वीन चुना गया, वह चुनाव के जज हमारे सीनियर सरदार विर्दी थे. "

ते ऐकताच सर्व जण मोठ्याने हसायला लागले. तो सरदार वीर्दी, तोही ऑडियन्स मध्ये बसलेला होता. तोही हसायला लागला. टाळ्या वाजल्या. आणि मी मला मिळालेली एक सुंदर लेडीज पर्स घेऊन आपल्या जागेवर गेलो अन् सर्वांसमोर माझ्या बायकोला मी ती पर्स भेट म्हणून दिली.

खरं म्हणजे हे ही रॅगिंगचे होतं. पण त्यात डिसेंसी होती. कुठलीही मर्यादा सोडण्यात आली नव्हती. पण बरेच वेळा हे रॅगिंग विद्रूप स्वरूप घेतं अन मग नियम कायदे करावे, पाळावे लागतात. पण तरी मला व्यक्तीश: असं नेहमी वाटतं की आई बाप, पालक, शिक्षक, प्राचार्य हे मुलांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना रॅगिंगचे गंभीर परिणाम समजावून सांगून बरंच काही करू शकतात. आणि विद्यार्थ्यांना या रॅगिंग पासून दूर ठेवू शकतात.

सुपरव्हिजन

2003 ला मी नागपूर जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग चा प्राचार्य होतो. अगदी फार थोड्या काळात त्या कॉलेजची नागपूरातलं एक अग्रगण्य इंजिनीरिंग कॉलेज म्हणून ख्याती झाली. शिक्षणाचा स्तर चांगला होता. सुविधा अन् स्टाफ ही चांगला होता. नवीन नवीन उपक्रम, सेमिनार्स, कॉन्फरन्सेस सारख्या चालत. एकदा आमच्या चेअरमन यांनी काही अमेरिकन एक्सपर्ट ना कॉलेज पाहयला बोलावलं. काही कोर्सेस साठी आम्हाला त्यांच्याशी कोलँबरेशन करण्याचा आमचा विचार होता. ते आणखीही काही संस्थांमधून भेट देऊन आले होते. आमच्याकडे दोन पूर्ण दिवस होते. त्यांच्यासमोर आम्ही आमचं प्रेझेंटेशन दिलं. त्यांना सर्व कॉलेज व प्रयोगशाळा लायब्ररी इत्यादी सर्व दाखवलं. ते जायला निघाले त्या दिवशी मी त्यांना सोडायला त्यांच्याबरोबर एअरपोर्टला गेलो. अकॅडमिक चर्चा पूर्वी कॉलेजमध्ये झाली होती म्हणून सहज जाता जाता आणि बोलता बोलता मी त्यांना गाडीत विचारलं " सर, व्हाट डिफरन्स डू यू फाईंड इन इंडियन वर्क कल्चर अँड अमेरिकन वर्क कल्चर? " त्यांच्यापैकी एकानं क्षणाचाही विलंब न लावता मला एका वाक्यात उत्तर दिलं. ते खरंच चिंतन करण्यासारखं होतं. तो म्हणाला ' 'इन जनरल, नो अमेरिकन वर्कर रिक्वायर्स सुपर विजन, अँड नो इंडियन वर्कर कॅन वर्क

विदाऊट सुपर्विजन. ‘कटू असलं तरी किती खरं बोलला तो. आपल्याकडे कुठलाही वर्कर असू दे, मग तो खालच्या लेव्हलचा चपराशी असो की त्या ऑफिसचा सर्वात मोठा साहेब असू दे. त्यांच्यावर सुपरविजन करणारा, नजर ठेवणारा, कुणीतरी लागतोच. त्याशिवाय ते काम होत नाही. झालंच तर पूर्ण होत नाही. पूर्ण झालं तर वेळेवर होत नाही. त्या दिवशी आणि त्यानंतर आजतागायत अशी अनेक उदाहरणं मी पाहीली आहेत. अर्थात या प्रक्रियेचा मी ही एक भाग होतोच. मग ते कुठल्या वयात का असेना, हे मला विसरून चालणार नाही.

माझा मुलगा व सून अमेरिकेला काही वर्ष शिकागोला असतांना मी व माझी पत्नी त्यांच्याकडे दोन अडीच महिन्यासाठी गेलो होतो. तिथे व्हीलींग म्हणून एका भागात आम्ही राहायचो. मोठी कॉलनी होती. बहुतांशी भाड्याने राहणारे भारतीय होते. तेथे समोर मोठे बगीचे होते. मेंटेनन्स चे काम एक वेगळं ऑफिस पाहायचं. तेही तिथेच होतं. मी रोज सकाळी फिरून आल्यावर घरासमोरच्या बागेत अर्धा तास तरी बसायचो. अगदी वेल मेंटेन्ड असा तो गार्डन होता. दर रविवारी सकाळी साडेसात आठलाच त्या गार्डन मध्ये दोन वर्कस यायचे. आले की ताबडतोब आपले कपडे वगैरे बदलायचे. अँप्रन, हातमोजे वगैरे घालून तयार व्हायचे. मग ते आणलेले गार्डन टूल्स काढायचे. आणलेले लॉन मुव्हर सुरू करायचे. साधारण दोन अडीच तासात झाडांचं, रोपांचं, मेहंदीच कटिंग वगैरे करायचे. लॉन वरून मशीन फिरवायचे आणि नंतर तो झालेला कचरा मोठ्या बॅग्जमध्ये भरून त्या बॅग्ज त्यांच्या व्हॅनमध्ये लोड करून घेऊन जायचे. काम इतकं व्यवस्थित आणि तन्मयतेनं, भराभर करायचे की विचारू नका. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, हे काम करताना त्यांच्यावर

देखरेख करणारा माणूस किंवा मुकादम मी कधीच पाहिला नाही. ती माणसं पूर्ण जबाबदारीने विदाऊट एनी सुपर्विजन दर रविवारी ही कामं करायची. मी नेहमी पाहत राहायचो. आणि मग मला माझ्याच कॉलनीतला अमरावतीचा देखावा आठवायचा. मी अमरावतीला कॅम्पमध्ये मधुबन कॉलनीत राहतो. वसुधाताई देशमुख (माजी मंत्री) यांच्या घरासमोरच. आणि आमच्या घरासमोरच एक छोटा गार्डन आहे. आता वसुधाताईच तिथं राहत असल्यामुळे आणि त्या भूतपूर्व मंत्री असल्यामुळे, त्या गार्डन चा मेंटेनन्स बऱ्यापैकी आहे. पण रोजचा सीन मजेदार असतो. सकाळी साफसफाईला दोन बाया येतात. त्यांच्या हातात टोपली झाडू असतात. मग त्या गार्डनच्या कोपऱ्यावर बसून थोडावेळ तंबाखू खातात, मग त्या येऊन झाल्यानंतर थोड्या वेळानं एक सायकल वरून त्यांचा मुकादम येतो. मग तोही त्यांच्यात मिसळून दहा-पंधरा मिनिटं गप्पा मारतो. मग त्यांच्या सगळ्यांचा वरिष्ठ येतो, आणि म्हणतो "अरे ऐसे बैठे क्या हो? उठो. जल्दी से सफाई करो. और कचरा जमा करके मत रखना उसको जला दिया करो या फेक के आया करो. ह्याच्या सूचना झाल्या की मग हळूच त्या बाया कामाला सुरुवात करतात. मग ते काम त्या त्यांच्या पद्धतीने करतात. हा सीन मी बरेच वेळा पाहिलेला आहे. आणि मग मला वाटतं त्या अमेरिकन एक्सपर्ट चा शेरा काही चुकीचा नव्हता. हे ह्याच लेव्हलला नाही तर याच्या पुढच्या लेव्हलला व त्यांच्या ही पुढच्या लेव्हलला लागू पडतं. कोणीतरी आपल्या डोक्यावर बसल्या शिवाय आपण काम व्यवस्थित करत नाही.

निर्णय

सुभाष पानसे हा एक साधा अकाऊंटंट, पुण्याला राहयचा. त्याची दिनचर्या म्हणजे रोजचं तेच रुटीन. घरून ऑफिसला जायचं. ऑफिस च्या टी स्टॉलवर एक कप चहा घ्यायचा. येतांना तोच ट्रॅफिक. रात्री डिनर आणि मग झोपणे. हया पलीकडे काही नाही.

एका पावसाळया रात्री ऑफिस वरून घरी येतांना, एका बस स्टॉप जवळ त्याला एक काळ्या रंगाचं पाकिट(वॉलेट) पडलेलं दिसलं. वरुन पडणाऱ्या पावसात आणि घाई गर्दीत कोणाचं त्या पाकिटाकडे लक्ष गेलं नसावं. सुभाष ने ते पाकिट उचललं. त्यानं ते उघडून पाहिलं. पाकिटात तीन चार क्रेडिट कार्डस, आय. डी. कार्ड, आणि बरेचसे पैसे होते. आय.डी. कार्ड वर नाव होतं, राजन मेहरा. आत एक हॉस्पिटल ची पावती व दुसऱ्या एका कागदावर चार पाच औषधा ची नावं होती. मेडिसीन प्रिस्क्रिप्शन असावं. सुभाष गोंधळात पडला. काय करावं त्याला सुचेना, गेल्या चार पाच महिन्यापासून तो खूप तंगीत व आर्थिक अडचणीत होता. त्याच्या आईची औषधं फार महागडी होती. गेल्या दोन महिन्यापासून तो घरभाडं ही देऊ शकला नव्हता. त्याचा पगार ही उशिरा मिळत होता. पाकीटातले पैसे त्याने एकदा मोजून पाहिले. एवढ्या पैशाने त्याच्या

बऱ्याचशा अडचणी दूर झाल्या असत्या. बराच वेळ तो स्वत:च्या मनाशी झगडत पावसात उभा होता. 'आपण हे पैसे घेतले तर कोणालाही काही कळणार नाही' त्याच एक मन म्हणालं. 'पण तुला तर ते माहीत असणारच न?' आतून दूसरा आवाज आला. बराच वेळ असा गेला आणि मग त्यानं निर्णय घेतला. त्या औषधाच्या कागदावर पाकीटवाल्याचा फोन नंबर होता, त्याने आपल्या मोबाइलवरुन तो नंबर डायल केला. आतुरतेनं फोनची वाट पाहत असणाऱ्या एका म्हाताऱ्या माणसानं लगेच तो कॉल घेतला. जेव्हा सुभाषने सांगीतलं की तुमचं पाकीट माझ्या जवळ आहे तेव्हा त्या माणसाचा आवाज कापरा झाला. बाजूच्या हॉस्पिटलच्या गेटपाशी भेटायचं त्या दोघांचं ठरलं.

जेव्हा मेहरा तिथे पोहचले तेव्हा ते फार थकल्या सारखे आणि अतिशय हळवे झालेले दिसले. त्यांनी आल्याबरोबर सुभाषला सांगीतलं की उद्या त्यांच्या बायकोची महत्वाची सर्जरी होती आणि त्याच्यासाठी काढलेले ते पैसे त्या पाकिटात होते. ते अतिशय भावनाप्रधान झाले व त्यांनी मनापासून सुभाषाचे पुन्हा पुन्हा आभार मानले. तसं करतांना त्यांचे डोळे भरून आले. जेव्हा सुभाषनं ते पाकीट मेहरांच्या हातात दिलं तेव्हा त्यालाही डोक्यावरचं ओझं उतरून हलकं व्हावं तसं वाटलं. जाण्यापूर्वी मेहरांनी त्याला विचारलं 'young man, what do you do for living?'

'I am serving as accountant in one office.' सुभाष म्हणाला. मेहरांनी त्याला त्याचा पगार विचारला. एका आठवड्या नंतर सुभाषला एक अनपेक्षित फोन आला. मेहरांचाच तो फोन होता. मेहरांची एक ग्रोईंग फायनान्शियल कंपनी होती आणि त्यांना एका विश्वासू अकाऊंटंट ची आवशकता होती. त्यांनी सुभाषाला त्याच्या आत्ताच्या

a
पगाराच्या दुप्पट पगाराची ऑफर दिली. आणि योग्य वाटल्यास ताबडतोब जॉइन व्हायला सांगीतलं. त्याप्रमाणे पूर्वीची नोकरी सोडून आठवड्याभरात सुभाष मेहरांच्या कंपनीत रुजू झाला. पण नोकरीत बदल, हा काही खरा बदल नव्हता. त्याचा स्वत:कडे पाहण्याचा दृष्टिकोन आता बदलला होता. त्याचा आत्मविश्वास ही वाढला होता. त्याचं भविष्य आता बदललं होतं. त्या पावसाळया रात्रीच्या एका निर्णयामुळे हा सर्व बदल घडून आला होता. पुढे सुभाष खूप यशस्वी झाला. जेव्हा लोक त्याला त्याच्या यशाचं रहस्य विचारायचे तेंव्हा सुभाष, नशीब, टॅलेंट किंवा पैसा अशी उत्तरं न देता आपल्या त्या रात्रीच्या निर्णयाबद्दल सांगायचा. 'मला कसा माणूस व्हायचं आहे हे त्या निर्णयानं मला ठरवता आलं.' सुभाष म्हणायचा.

गुपित

सीमा, श्रेया, मनीष आणि राकेश हे मुंबईच्या एका कॉलेजचे फायनल वर्षाचे विद्यार्थी. ते चौघं नेहमी बरोबर असत. कॉलेज मध्ये, बाहेर फिरायला, रोड साइड च्या कॅफे मध्ये, पार्टी ला; ते नेहमी बरोबर असत. आपल्या गप्पांमध्ये ते आपल्या भविष्याची स्वप्नं रंगवित. नेहमी मजेत असायचे. आणि मग एक दिवस ती रात्र आली. कॉलेज फेस्टिवल संपल्यानंतर त्या रात्री ते चौघं ही परतत होते. बाहेर पाऊस पडत होता. राकेश गाडी चालवत होता. तो थोडा प्यायलेला होता. हसत हसत तो गाडी चालवत होता. शेजारी बसलेली सीमा त्याला सारखं हळू चालवायला सांगत होती. पण गप्पात तो तिच्याकडे लक्ष देत नव्हता. अचानक रसत्यावर कार समोर एक माणूस आला आणि त्याला कारची जोरात धडक लागून तो खाली कोसळला. ते सगळे घाबरले. राकेशने जोराने ब्रेक लावले होते पण तरी त्या माणसाला कारंने ठोस दिलीच.

'आपण पोलिसांना बोलवायला पाहिजे,' सीमा म्हणाली. पण ते सगळेच भीतीने फार घाबरले व गोंधळले होते. राकेश चे वडील खूप श्रीमंत व्यापारी होते. ह्या बातमीमुळे त्यांच्या धंद्याला खूप धक्का बसला असता. मनीष म्हणाला तो माणूस बहुदा मेला असावा. श्रेया तर थथर कपात होती. नंतर राकेशने शेवटचा निर्णय घेतला. 'आपण निघून जाऊ'

राकेश म्हणाला. सीमाला ते काही पटलं नाही. पण भीतीपोटी हे सर्व चूप राहिले व कारनं निघून गेले. दुसरी दिवशी न्यूज पेपर मध्ये ह्या आपघाताची व तो माणूस मेल्याची बातमी आली. हीट अँड रन ची केस होती आणि पोलिसांना कोणताच पुरावा मिळाला नाही असं बातमीत लिहलं होतं. दिवस जात होते. ह्या गुपिताने त्या चौघांच्या मनात घर केलं होतं. सीमा तर अबोल झाली. श्रेयाला खूप डिप्रेस झाल्यासारखं वाटायला लागलं. मनीष खूप प्यायला लागला. राकेश मात्र काही झालंच नाही अशा थाटात वावरत होता.

अशीच काही वर्ष निघून गेली. ह्या चौघांच्या आता फार कमी भेटी होत होत्या. त्यांच्या मध्ये ती भीषण शांतता आणि भीती येऊन बसली होती. आणि मग एका रात्री सीमाला तिच्या मोबाईलवर एका अनोळखी माणसाचा मेसेज आला. त्यात लिहलं होतं 'त्या रात्री काय झालं ते सर्व मला माहीत आहे.'त्या मेसेज बरोबर त्या माणसानं त्या कारचा व त्या मेलेल्या माणसाचा अंधुकसा फोटो ही जोडला होता. त्या बरोबरच त्या माणसाने हे गुपित गुपितच ठेवायचं असेल तर पन्नास लाख रुपये मला द्यावे लागतील असं ही कळवलं होतं. तो मेसेज वाचून तर सीमा पार घाबरून गेली. तिचे हात थरथर कापायला लागले. ती आतल्या आत कोलमडून गेली. थोडा वेळ ती त्याच अवस्थेत होती, नंतर तिनं आपलं धैर्य एकवटलं. तिला वाटलं ह्या ब्लॅक मेलरच्या धमकीपेक्षा जास्त भीतीच्या अवस्थेत गेली पाच वर्ष आपण जगतो आहोत, ते पाच वर्षाच खोटं, ती पाच वर्षाची भीती, मिनिटा मिनिटाला सतावणाऱ्या त्या मृतत्म्याच्या स्मृति तर ह्या धमकीहूनही भयंकर होत्या,भयानक होत्या.

तीच आपण भोगलेली खरी शिक्षा. त्या रात्री सीमानं आपलं मन घट्ट केलं. व एक निश्चय केला.'

दुसऱ्या दिवशी सकाळी ती पोलिस स्टेशन मध्ये गेली. जे घडलं ते सर्व तिने खरं खरं पोलिसांना सविस्तर सांगीतलं व गुन्हा कबुल केला. त्या अपघाताच्या चौकशीची फाइल पुन्हा ओपन झाली. राकेशला अरेस्ट करण्यात आलं. मनीषने सर्वांसमोर आपला अपराध काबुल केला, श्रेया तर गेल्या पाच वर्षात पुरती खचून गेली होती तिने कबुलीबद्दल रडत रडत सीमाचे आभार मानले. पण पोलिसांना स्टेटमेंट दिल्या नंतर सीमाला वेगळ्याच प्रकारे हलकं वाटायला लागलं. मणा मणाचं ओझं आपल्या डोक्यावरुन उतरलं आहे असं तिला वाटू लागलं. आनंद नाही की क्षामेची शांति नाही फक्त रिलीफ वाटत होता तिला. अनेक वर्षांनंतर ती आज मोकळा श्वास घेत होती.

जेव्हा ती कोर्टातून बाहेर निघून जायला लागली तेव्हा एका रिपोर्टर ने तिला विचारलं, 'गुन्हा कबुल करायला तुम्हाला इतकी वर्ष का लागली? सीमानं सर्वांकडे हळू हळू नजर फिरवली व ती म्हणाली, ' कारण कितीही प्रयत्न केला तरी गुपितं अशी जास्त काळ आपल्या हृदयात लपून राहू शकत नाहीत. उलट त्यांचा आकार मोठा मोठा होत जातो. आणि मग सत्याची किंमत मोजावी लागली नसती त्या पेक्षा कितीतरी जास्त हे खोट्याचं गुपित लपविण्यासाठी मोजावी लागते.

++++++++++++++++++++++++++++++

a

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष

डॉ. बं. न. जाजू यांचं हे नववे पुस्तक.

डॉ. बंकटलाल जाजू हे इंजिनियरिंगचे प्राध्यापक. १९६६ पासून ते विविध इंजिनियरिंग कॉलेजांत प्राध्यापक व प्राचार्य होते. त्या काळचे ते IIT Doctorate. पण त्यांचा स्वभाव निगर्वी, मिळून मिसळून रहाण्याचा आणि सर्वांकडून जे जे मिळेल ते ते शिकण्याचा. इंजिनियरिंग आणि संगीतच नव्हे तर व्यवहारज्ञानही. यातून त्यांना मनुष्य स्वभावाचे व त्यातील गुंतागुंतीच्या व्यवहारांचे जे दर्शन घडले ते त्यांनी आपल्या समर्थ लेखणीतून अक्षरी आणले आणि अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध केले. त्यांची या वयातली स्मरणशक्ती अगदी तल्लख आहे, आणि मनाचे रसिक्त्व अगदी ताजे टवटवित आहे हे पुस्तक वाचताना जाणवलेच असेल. त्यामुळे वेगवेगळ्या काळातील जग ते आपल्या डोळ्यांसमोर थेट उभे करतात.

डॉ. बंकटलाल जाजू यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर

जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), **डॉ. नितीन मोरे (६४ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१२), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (८), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), **डॉ. वृषाली जोशी (६४)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४२), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१४), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (५), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८),

मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे, सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(४), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), कैलास बडगुजर, अंजुषा पाटील, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी॥